इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - २१५ ▸ सोमवार,ता.८ डिसेंबर २०२५ ▸ पाने १२ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

### वडील रागावल्याने मुलीची आत्महत्या

नाशिक,ता.७ –

मोबाईलच्या सतत होणाऱ्या वापरामुळे वडील रागावल्याने शाळकरी मुलीने आत्महत्या केल्याची घटना नाशिक रोड परिसरामध्ये घडली. रुक्खिमनी संपत काळे असे मृत बालिकेचे नाव आहे. तिच्या आत्महत्येचे नेमके कारण समोर आले नसले तरी ती सतत मोबाईल पाहत होती. त्यातून कुटुंब रागावल्याने तिने हे पाऊल उचचले असावे, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. रुक्खिमनी (रा. जुन्या मारुती मंदिराजवळ, सामनगाव, नाशिकरोड) ही पाचवी इयत्तेत शिक्षण घेत होती. आई -वडील मोलमजुरीसाठी गेले असतानाच, तिने घरात दोरीने गळफास घेऊन जीवनयात्रा संपविली.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

### चांदी वधारली ; सोने दरात घट

जळगांव,ता.७ -

स्थानिक बुलियन मार्केटमध्ये चढ-उतारांच्या मालिकेला आणखी रंग चढला. चांदीच्या भावात तब्बल २,२०० रुपयांची उसळी नोंदवली गेली असून दर १,८२,००० रुपयांवर पोहोचला आहे. दुसरीकडे सोन्याने मात्र घसरणीचा कल कायम ठेवत ६०० रुपयांनी खाली येत १,२८,२०० रुपये प्रति तोळा असा नीचांक गाठला. किरकोळ चढ-उतारांमुळे सोने १,२८,८०० रुपये प्रति तोळा इतके खाली आले. आणखी ६०० रुपयांची घसरण नोंदवत सोने १,२८,२०० रुपयांवर बंद झाले. दरम्यान, चांदी दरातील वाढीने व्यापाऱ्यांमध्ये पुन्हा चर्चेला ऊत आला आहे.

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

# गोव्यात अग्नितांडव!

- अर्पोरात नाईट क्लबमध्ये सिलिंडर स्फोटानंतर आगीत 25 जणांचा मृत्यू
- मृतांत चार पर्यटकांसह 14 क्लब कर्मचारी
- मुख्यमंत्र्यांकडून दुर्घटनेच्या चौकशीचे आदेश
- मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 2 लाखाची मदत

■ पणजी,ता.७ –

**गोव्यातील प्रसिद्ध नाईट क्लब, बिर्च बाय रोमियो लेन येथे शनिवारी मध्यरात्री १ च्या सुमारास सिलिंडरचा स्फोट झाला. काही क्षणातच संपूर्ण इमारत आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. त्यातील काही लोकच बचावले. आगीत पंचवीस जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामध्ये बहुतेक क्लब कर्मचारी होते. या दुर्देवी घटनेत २० जणांचा मृत्यू गुदमरून झाल्याची माहिती आहे.**

प्राथमिक माहितीनुसार, नाईट क्लब सुरक्षा नियमांचे पालन करत होता. गेल्या वर्षीच हा नाईट क्लब सुरू झाला होता. त्यांनी क्लबच्या जबाबदार व्यवस्थापनावर आणि परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

अर्पोरा गावातील नाईट क्लबमध्ये रात्री १ च्या सुमारास सिलिंडरचा स्फोट झाला. मृत्युमुखी पडलेले लोक बिर्च बाय रोमियो लेनचे कर्मचारी होते. ५० जखमींना उपचारासाठी गोवा मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करण्यात आले आहे. मृतांमध्ये चार पर्यटक आणि १४ क्लब कर्मचारी आहेत. हा क्लब गोव्याची (पान २ वर)



## नाईट क्लबचा मालक सौरभ लुथरा,गौरवविरुद्ध एफआयआर

■ पणजी,ता.७–

**नाइट क्लबमधील दुर्घटनेप्रकरणी अर्पोरा-नागोआ पंचायतचे सरपंच रोशन रेडकर यांना ताब्यात घेतले आहे. तसेच नाईट क्लबचे मालक सौरभ लुथरा आणि जनरल मॅनेजर गौरव लुथरा यांच्याविरोधात पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.**

हे नाइट क्लब तात्पुरत्या बांधकामावर चालत होता आणि त्याच्या बांधकामामध्ये मोठ्या प्रमाणात (पान २ वर)

# विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय अध्यक्ष, सभापती घेतील

■ नागपूर,ता.७–

**विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय विधानसभेचे अध्यक्ष आणि विधान परिषदेचे सभापती घेतील, तो आमचा निर्णय नाही. अध्यक्ष आणि सभापती जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल, असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. सोमवारपासून हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होणार असली तरी विधानसभा आणि विधान परिषदेला विरोधी पक्षनेता नाही. त्यावर विरोधकांनी सरकारवर टीका केली. त्या टीकेला फडणवीस यांनी उत्तर दिले.**



हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने आयोजिलेल्या चहापानावर विरोधकांनी बहिष्कार टाकला. त्यावरून फडणवीसांनी विरोधकांचा समाचार घेतला. यंदाच्या अधिवेशनात आम्ही १८ विधेयके मांडणार असून ती सर्व मंजूर करण्याचा प्रयत्न करू, असेही फडणवीस म्हणाले.

### अधिवेशनात १८ विधेयके मांडणार : फडणवीस

चहापानाचा कार्यक्रम होता. विरोधी पक्षाने परंपरा पाळत बहिष्कार टाकला. त्यामुळे आम्हाला आमचा चहा प्यावा लागला. विरोधी पक्षाची पत्रकार परिषद त्रागा करणारी होती. अनेक गमती झाल्या, भास्कर जाधवांनी विजय वडेट्टीवार यांच्या माईकची बॅटरी बंद केली. विरोधी पक्षाचे पत्र उशिरा आले, त्यावर शरद पवार गटाच्या कोणाचीच सही नाही. याचा मी वेगळा अर्थ काढणार नाही. वडेट्टीवार विदर्भावर बोलले. मात्र त्यांनी २०१४ पूर्वीचा विदर्भ आणि आताचा विदर्भ बघावा. त्यांच्या जिल्ह्याच्या बाजूला असणारे गडचिरोली बघावे.

कोणावरच आता विरोधकांना विश्वास उरला नाही आहे. संवैधानिक संस्थांवर आगपाखड करत आहेत. राज्य दिवाळखोर (पान २ वर)

### नेपाळला पुन्हा भूकंपाचा धक्का

■ काठमांडू, ता.७ –

**नेपाळची जमीन रविवारी पुन्हा एकदा भूकंपाच्या धक्क्यांनी हादरली. हा भूकंप नेपाळच्या पश्चिमेकडील सुदूरपश्चिम प्रदेशात झाला. राष्ट्रीय भूकंप निरीक्षण आणि संशोधन केंद्रानुसार भूकंपाची तीव्रता ४.६ इतकी नोंदवली गेली. या भूकंपामुळे अद्याप कोणत्याही प्रकारच्या नुकसानीची माहिती मिळालेली नाही.**

राष्ट्रीय भूकंप निरीक्षण आणि संशोधन केंद्रानुसार , हा भूकंप सकाळी ८:२८ वाजता नोंदला गेला, ज्याचे केंद्र दारचुला जिल्ह्यातील (पान २ वर)

# विरोधकांचा चहापानावर बहिष्कार

## विरोधी पक्षनेते पद रिक्त ठेवणे संविधानाचा अपमान : वडेट्टीवार

■ नागपूर,ता. ७ –

**राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सत्ताधाऱ्यांनी आयोजित केलेल्या चहापानावर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी बहिष्कार टाकला. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील विरोधी पक्षनेते पद रिक्त ठेवणे हा संविधानाचा अपमान असून, सरकारला विरोधकांचा आवाज दाबायचा आहे, अशी घणाघाती टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.**



स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या आचारसंहितेदरम्यान विधिमंडळाचे अवघ्या आठवडाभरासाठी हिवाळी अधिवेशन होणार आहे. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने प्रथेनुसार विरोधकांना चहापानाचे आमंत्रण दिले होते. मात्र, या आमंत्रणाला विरोधकांनी बहिष्कार घालत सरकार विरोधात नाराजी व्यक्त केली. याबाबत नागपूरमध्ये विरोधकांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत महायुती सरकारवर टीका केली.

वडेट्टीवार म्हणाले की, परंपरेनुसार विरोधी पक्षाला चहापानाचे निमंत्रण दिले जाते. आम्हाला वैयक्तिक निमंत्रणे मिळाली, मात्र दोन्ही सभागृहांतील घटनात्मक महत्त्वाची असलेली विरोधी पक्षनेते पदे रिक्त आहेत. सत्ताधाऱ्यांचा (पान २ वर)

# सप्तश्रृंगी गडाच्या घाटात कार कोसळून सहा भाविकांचा मृत्यू

■ नाशिक,ता.७–

**नाशिकच्या सप्तश्रृंगी गडाच्या दिशेला जाणाऱ्या घाटावर भीषण अपघात झाला. सप्तशृंगी गडावरुन दर्शन घेऊन परतत असताना इनोव्हा कार ६०० फूट खोल दरीत कोसळली. यात गाडीतील सर्व सहा भाविकांचा मृत्यू झाला. सर्व भाविक हे पिंपळगाव बसवंतचे रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे.**

सप्तश्रृंगी गडावर दर्शनासाठी गेलेल्या भाविकांची गाडी घाटात भवरी धबधब्याजवळ ओव्हरटेकच्या नादात कठडे तोडून ६०० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात पटेल परिवारातील सहा जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. या घटनेत किर्ती पटेल (वय ५०), रशिला पटेल (वय ५०), विठ्ठल पटेल (वय ६५), लता पटेल (वय ६०), पचन पटेल (वय ६०), मनी बेन पटेल (वय ७०) यांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच सप्तश्रृंगी गड आणि वनी पोलीस ठाणे येथील पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून मदत कार्य करण्यास सुरुवात केली. पण अपघातातील गाडी ही खोल दरीत कोसळल्याने आणि दिवस मावळत असल्याने बचाव कार्यात अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे नाशिकवरून रेस्क्यू टीमला पाचरण करण्यात आलेले आहे. एकाच कुटुंबातील सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

# तैवानजवळ चीनच्या लष्करी हालचाली

## दोन विमानांसह सात नौदल जहाजे आढळली

■ ताइपे,ता.७ –

**तैवानच्या हद्दीत चीनी सैन्याच्या (पीएलए) दोन विमानांची उड्डाणे आणि पीएलएएन सात नौदल जहाजांची हालचाल दिसून आली. त्याच वेळी एक चीनी बलून देखील आढळला, असे राष्ट्रीय संरक्षण मंत्रालयाने (एमएनडी) सांगितले.**

मंत्रालयाने एक्सवर माहिती देताना म्हटले, रविवारी सकाळी सहा वाजेपर्यंत (स्थानिक वेळेनुसार) तैवानच्या आसपास पीएलएची दोन विमाने आणि पीएलएएनची सात जहाजे हालचाल करताना नोंदली गेली. त्याच वेळी एक चीनी बलूनही आढळला. तैवानच्या संरक्षण दलांनी परिस्थितीवर लक्ष ठेवले आणि योग्य प्रतिसाद दिला. (पान २ वर)



(छाया.- सागर घाडगे)

# अखेर पोलीस बंदोबस्तात वादग्रस्त अतिक्रमण हटविले

■ मिरज,ता. ७ (प्रतिनिधी)–

लक्ष्मी मार्केट परिसरातील वादग्रस्त 'रंगीला पान शॉप' या खोक्याचे अतिक्रमण अखेर रविवारी दुपारी पोलिस बंदोबस्तात हटविण्यात आले. शनिवारी अतिक्रमण कारवाईसाठी गेलेल्या महापालिका पथकाला मालकाने अंगावर पेट्रोल ओतत आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने कारवाई थांबवून (पान २ वर)

# व्हन्नूर फाट्याजवळ २०० बकरी मृत्युमुखी



■ कागल,ता.७ (प्रतिनिधी)–

**बकरी घेऊन जाणाऱ्या कंटेनरचा अपघात झाला. या अपघातात कंटेनर मधील सुमारे २०० बकरी मृत्युमुखी पडल्या आहेत. अपघात पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास झाला. ही घटना कागल -निढोरी( मुरगूड) रस्त्यावरील व्हन्नूर फाट्याजवळील आवटे मळा नजीकच्या ओढ्यावर घडली. टोल नाका चुकविण्याच्या उद्देशाने तो कागल-निढोरी मार्गावरून कर्नाटककडे जात असल्याचे पोलिसातून सांगण्यात आले. अपघाताची नोंद कागल पोलिसांत झाली आहे.**

### चालकाचा ताबा सुटल्याने कंटेनर पुलाच्या कठड्यावर आदळला

### टोल नाका चुकविण्याच्या नादात चालकाला डुलकी पडली महागात

कंटेनर ( के ए- ११-०९२७) मध्ये २२० बकरी भरलेली होती. तो गारगोटी मार्गे कर्नाटककडे जाणार होता. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार वर कोगनोळी येथे टोलनाका आहे. सीमा तपासणी नाका व टोल नाका चुकविण्यासाठी चालकाने पर्यायी मार्गाचा अवलंब केला. कागल माळावरील मुरगूड नाका येथून (पान २ वर)

# नृसिंह कॉलनीत घरफोडी; पाच लाखांचा ऐवज लंपास

■ कोल्हापूर, ता.७ (प्रतिनिधी)–

**नृसिंह कॉलनी, बोंद्रेनगर येथे घराचा कडी-कोयंडा उचकटून चोरट्याने सहा तोळ्यांचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने असा पाच लाखांचा मुद्देमाल लंपास केला. या प्रकरणी प्रशांत तानाजी इंगळे (वय ३६) यांनी करवीर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.**

इंगळे हे कुटुंबीयांसह बाहेरगावी गेले होते. या मुदतीत चोरट्याने त्यांच्या घराचा कडी-कोयंडा उचकटून घरात प्रवेश केला. कपाटातील सहा तोळे सोन्याचे गंठण, चांदीचे ब्रेसलेट, चांदीचा छल्ला, पैंजण जोड असा पाच लाखांचा मुद्देमाल लंपास केला. बंद घरांचे कुलूप उचकटून चोरी केली जात असल्याने पोलिसांकडून गस्त घालताना उपनगरांतील शेवटच्या घरापर्यंत गस्तीची वाहने जात नसल्याचे दिसून येते.

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
| --- | --- |
| १२८३०० रु. | १८०५०० रु. |

अंडी ७१५ रुपये शेकडा

### हास्यतुषार - सुरेंद्र दास



सत्ताधाऱ्यांच्या चहापाण्याच्या कार्यक्रमाच्या बोलावण्याला विरोध करण हा विरोधकांचा नेहमीचा ठरलेलाच कार्यक्रम असतो वाटत..!

# सादळे मादळे घाटात अपघातात दुचाकीस्वार ठार

■ टोप,ता.७ (प्रतिनिधी)–

**सादळे मादळे घाटात आयशर ट्रकला दुचाकीची मागील बाजूस धडक बसून दुचाकीस्वार जागीच ठार झाला. हा अपघात रविवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास घडला. नारायण सदाशिव खोत (वय ४०, रा. निकमवाडी, ता.पन्हाळा) असे मृताचे नांव आहे.**



रविवार असल्याने घाट परिसर ते जोतिबा देवास जाणाऱ्या - येणाऱ्या पर्यटकांची रोडवर गर्दी असल्याने आयशर ट्रक (एमएच ४२ एक्यू १६३१) हा सादळे मादळे येथून शिरोली एमआयडीसीत येतेवेळी समोरील कार चालकाने घाट वळणावर अचानक ब्रेक मारल्याने तो जागीच थांबला म्हणून ट्रक चालकानेही ब्रेक मारल्यानंतर ट्रक ही रस्त्यावरून घसरल्याने ट्रकची मागील बाजू विरूद्ध दिशेला आल्याने भरधाव दुचाकीस्वारास त्याचा अंदाज न आल्याने तो ड्रायव्हर बाजूच्या मागे जाऊन धडकला. (पान २ वर)

# वांगचुक यांच्यासंदर्भातील याचिकेवर आज सुनावणी

■ लेह, ता.७ –

**तुरुंगात बंद असलेल्या पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या नजरकैदेविरुद्ध दाखल केलेल्या याचिकेवर सोमवारी ८ रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.**

वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली जे. अंगमो यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी होईल. या याचिकेत राष्ट्रीय सुरक्षा कायदा (एनएसए) अंतर्गत झालेल्या वांगचुक यांच्या नजरकैदेला आव्हान देत ते बेकायदेशीर असून मौलिक हक्कांचे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे. न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांचे खंडपीठ या प्रकरणाची सुनावणी करू शकते.

२९ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने अंगमो यांच्या सुधारित याचिकेवर केंद्र तसेच (पान २ वर)



# पूर्व लडाखमध्ये १२ हजार फुटांवरील श्योक बोगदा सैन्यासाठी खुला

■ नवी दिल्ली,ता. ७–

**पूर्व लडाखमध्ये १२ हजार फूटांपेक्षा जास्त उंचीवर बांधलेला श्योक बोगदा रविवारी लष्करासाठी खुला झाला. ज्यामुळे भारतीय सैन्याला पूर्व लडाखमधील डेपसांग-डीबीओ सेक्टरमध्ये जलद, सुरक्षित आणि सुलभ प्रवेश मिळाला. जोरदार हिमवृष्टी दरम्यानही सैन्य, शस्त्रे**

### संवेदनशील एलएसी भागात ऑपरेशनल तयारी मजबूत होणार

**आणि रसद यांच्या हालचालीचा वेग लक्षणीयरीत्या वाढेल, ज्यामुळे संवेदनशील एलएसी भागात ऑपरेशनल तयारी आणखी मजबूत होईल.**

पूर्व लडाखमधील (पान २ वर)

**(पान १ वरून)**

## विरोधकांचा चहापानावर बहिष्कार

ही पदे भरण्याचा कोणताही मनसुबा दिसत नाही. संविधानावर अविश्वास दाखवणाऱ्या आणि मनमानी कारभार करू पाहणाऱ्या सरकारच्या चहापानाला जाणे आम्हाला योग्य वाटत नाही.ते म्हणाले, १९८० मध्ये जनता दलाचे अवघे १४ आमदार असताना आणि १९८५ मध्ये भाजपचे १६ आमदार असतानाही काँग्रेसने त्यांना विरोधी पक्षनेते पद दिले होते. काँग्रेसने सत्ताधारी म्हणून हे घटनात्मक पद कधीही रिक्त ठेवले नाही. मात्र, सध्याच्या सरकारला विरोधकांची भीती वाटते का? की त्यांना कोणाचाही अंकुश नसताना मनमानी कारभार करून राज्याचा गाडा हाकायचा आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. राज्यात दररोज सहा ते सात शेतकरी आत्महत्या करत आहेत. मतांसाठी कर्जमाफीचे आश्वासन देणाऱ्या सरकारने आता तारीख पे तारीखचा खेळ सुरू केला आहे. आता जूनचा मुहूर्त सांगितला जात असला तरी शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा काहीही पत्ता नाही, अशा शब्दांत त्यांनी शेतकऱ्यांच्या फसवणुकीचा आरोप केला.

## नेपाळला पुन्हा भूकंपाचा धक्का

घुसा परिसरात होते. या भूकंपाचे हलके धक्के आसपासच्या जिल्ह्यांतही जाणवले.पश्चिम नेपाळात वारंवार भूकंप जाणवत असतात. यापूर्वी ३० नोव्हेंबर रोजीदेखील याच प्रदेशातील बाजहांग जिल्ह्यातील सैपाल पर्वत क्षेत्रात ४.४ तीव्रतेचा भूकंप झाला होता.

## पूर्व लडाखमध्ये १२ हजार फुटांवरील श्योक बोगदा सैन्यासाठी खुला

श्योक नदीजवळ बांधलेला श्योक बोगदा हा मोक्याचा बोगदा आहे,जो दर्बुक-श्योक-दौलत बेग ओल्डी रस्त्याला सर्व हवामानात जोडण्यासाठी डिझाइन केलेला आहे. ३२२ किलोमीटर लांबीच्या दर्बुक-श्योक-दौलत बेग ओल्डी रोडचा एक भाग आहे, जो भारतीय सैन्याच्या सर्वात मोक्याच्या पुरवठा मार्गांपैकी एक आहे. हा रस्ता चीन सीमेवरील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या (एलएसी) अगदी जवळून जातो, ज्यामुळे हा बोगदा लष्करासाठी महत्त्वाचा बनतो. हिवाळ्यात जोरदार हिमवर्षाव आणि हिमस्खलनामुळे उंच पर्वतीय मार्ग अनेकदा बंद असतात, ज्यामुळे सैन्य आणि पुरवठा प्रभावित होतो. नवीन श्योक बोगदा ही समस्या लक्षणीयरीत्या कमी करेल.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले, ऑपरेशन सिंदूर दरम्यान सीमावर्ती भागातील नागरिकांसह आमच्या सैन्याने आणि नागरी प्रशासनातील सहकार्य कौतुकास्पद होते. आमचे परस्पर संबंध हेच आम्हाला जगात वेगळे करतात. लडाखसह सर्व सीमावर्ती भागांशी आमचा संपर्क मजबूत करण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. सैनिकाच्या आयुष्यातील प्रत्येक मिनिट आणि प्रत्येक सेकंद महत्त्वाचा आहे. म्हणून, कनेक्टिव्हिटी केवळ नेटवर्क, ऑप्टिकल फायबर, ड्रोन आणि रडारपुरती मर्यादित नसावी; ती सुरक्षेचा कणा म्हणून पाहिली पाहिजे. सीमावर्ती भागात बांधलेले रस्ते सुरक्षा, अर्थव्यवस्था, सशस्त्र दलांची गतिशीलता आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी जीवनरेखा आहेत.

## वांगचुक यांच्यासंदर्भातील याचिकेवर आज सुनावणी

लडाख प्रशासनाकडून उत्तर मागितले होते. मात्र केंद्र आणि केंद्रशासित प्रदेश लडाखच्या वतीने उपस्थित सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी उत्तर देण्यासाठी

काही वेळ मागितला होता. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने २४ नोव्हेंबर रोजीची सुनावणी पुढे ढकलली होती.अंगमो यांच्या याचिकेत म्हटले आहे की, सोनम वांगचुक यांना जुन्या एफआयआर, अस्पष्ट आरोप आणि केवळ अंदाजांवर आधारित कारणांमुळे नजरकैदेत ठेवले आहे. या कारवाईला कायदेशीर आधार नाही आणि प्रतिबंधात्मक अधिकारांचा असा मनमाना वापर संवैधानिक स्वातंत्र्यावर आघात करतो.या याचिकेत वांगचुक यांची नजरकैद रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## व्हन्नूर फाट्याजवळ २०० बकरी मृत्युमुखी

निढोरी -मुरगूडकडे पहाटे जात होता. दरम्यान,व्हन्नूर फाट्याजवळ आवटे मळा येथील ओढ्यावर आल्यानंतर चालकाला डुलकी आवरली नाही. डोळ्यात असलेल्या झोपेच्या धुंदीत त्याचा कंटेनर वरील ताबा सुटला व रस्त्याकडेला पुलाच्या कठड्यावर जावून आदळला. समोर असलेल्या झाडाला आदळून कंटेनरचा मागचा भाग ओढ्यात पलटी झाला.

यामध्ये २२० बकऱ्यांपैकी २०० बकऱ्यांचा गुदमरून मृत्यू झाला. कठड्यावर व कंटेनरच्या कांही भागावर मांसाचे तुकडे पडले होते. उर्वरित वीस बकऱ्यांनाही दुखापत झाली आहे. अपघात स्थळी बकऱ्यांचा ओरडण्याचाआवाज येत होता. अपघाताची बातमी परिसरात वाऱ्यासारखी पसरली.कंटेनरचा पुढील भाग व बाजूच्या भागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले,मुंबईहुन गारगोटीकडे ठिकठिकाणच्या व्यापाऱ्याना तो बकरी देण्यासाठी चालला होता,असे प्रथमदर्शनी समजते.ट्रक चालकास कागल पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. कागल पोलीस ठाण्याचे निरीक्षक गंगाधर घावटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक वैभव जमादार तपास करीत आहेत.

## अखेर पोलीस बंदोबस्तात वादग्रस्त अतिक्रमण हटविले

परत फिरावे लागले होते. महानगरपालिकेने यापूर्वी लक्ष्मी मार्केट परिसरातील अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबवून इतर सर्व अतिक्रमणे काढली होती; मात्र या खोक्याचा कोर्टात वाद प्रलंबित असल्याने कारवाई करण्यात आली नव्हती. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शनिवारी कारवाई सुरू करण्यात आली. त्यावेळी खोक्याचा मालक रियाज पठाण यांनी अंगावर व दुकानावर पेट्रोल ओतून काचा फोडण्याचा प्रयत्न केला तसेच उपस्थित नागरिकांवरही पेट्रोल टाकण्याचा प्रयत्न केला.

दुसऱ्या दिवशी रविवारी महापालिका उपायुक्त स्मृती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व योग्य पोलीस बंदोबस्तासह पुन्हा कारवाई करत संबंधित वादग्रस्त खोके हटविण्यात आले. यानंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण राहिले मात्र परिस्थिती नियंत्रणात होती.

# गोव्यात अग्नितांडव!

(पान १ वरून)

**उत्तर गोव्यातील अर्पोरा येथील एका नाईट क्लबमध्ये आग लागल्याची माहिती मिळताच गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत आणि स्थानिक आमदार मायकल लोबो घटनास्थळी दाखल झाले. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी, गोव्यासारख्या पर्यटन राज्यासाठी ही घटना अत्यंत दुर्दैवी असून सरकार या घटनेची चौकशी करेल, असे सांगितले.**

राजधानी पणजीपासून २५ किलोमीटर अंतरावर आहे. तो रात्री उशिरा होणाऱ्या पार्ट्यांसाठी प्रसिद्ध आहे. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी सांगितले की, क्लबमध्ये पुरेशा अग्निसुरक्षा उपाययोजनांचा अभाव होता.या घटनेचे कारण शोधण्यासाठी चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी २ लाख रुपयांची भरपाई जाहीर केली. गोवा सरकार याची सखोल चौकशी करेल आणि दोषी आढळणाऱ्यांना अटक करेल.

गोव्याच्या पर्यटन क्षेत्रातील ही सर्वात मोठी दुर्घटना आहे. ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या अगदी आधी लागलेल्या या आगीने संपूर्ण गोवा हादरून गेला आहे.आमदार मायकल लोबो यांनी म्हटले आहे की, मृतांपैकी बहुतेक जण रेस्टॉरंटच्या तळघरात काम करणारे स्थानिक होते. या घटनेनंतर, गोव्यातील इतर सर्व क्लबचे सुरक्षा ऑडिट करणे आवश्यक आहे.

पर्यटक नेहमीच गोव्याला एक अतिशय सुरक्षित ठिकाण मानतात, परंतु आगीची घटना खूप त्रासदायक आहे.अशा घटना पुन्हा घडू नयेत. पर्यटक आणि या ठिकाणी काम करणाऱ्यांची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे.

गोव्याचे डीजीपी आलोक कुमार यांनी सांगितले की, पोलीस नियंत्रण कक्षाला रात्री १२:०४ वाजता अर्पोरा येथील एका रेस्टॉरंटमध्ये आग लागल्याचा फोन आला. पोलिस, अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. एकूण २५ जणांचा मृत्यू झाला आहे.

सर्व मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. पोलीस घटनेचे कारण तपासतील आणि त्यांच्या निष्कर्षांवर आधारित पुढील कारवाई करतील.

## तैवानजवळ चीनच्या लष्करी हालचाली

(पान १ वरून) शनिवारी तैवानच्या आसपास चीनच्या लष्करी हालचालींमध्ये वाढ झाली होती. त्या दिवशी चीनची २९ लढाऊ विमाने उड्डाण करताना आणि सहा नौदल जहाजांची हालचाल नोंदली गेली. दरम्यान, जो बायडन प्रशासनातील माजी संरक्षण अधिकारी एली रॅटनर यांनी म्हटले की, तैवानच्या संरक्षणात जपान सहभागी होण्याच्या शक्यतेवर चीनची प्रतिक्रिया अनुचित आहे. एली रॅटनर २०२१ पासून या वर्षापर्यंत हिंद-प्रशांत सुरक्षा विषयक सहाय्यक संरक्षण सचिव म्हणून कार्यरत होते. तैवानबाबत ताकाइची यांनी फक्त जपानचे अधिकृत धोरणच पुन्हा मांडले आहे.जपानचे पंतप्रधान ताकाइची यांनी संसदेत म्हटले होते की, जर चीन तैवानवर हल्ला करतो, तर त्याला जपानच्या अस्तित्वावरील धोका मानले जाऊ शकते आणि जपानला पावले उचलावी लागू शकतात.

## नाईट क्लबचा मालक सौरभ लुथरा, गौरवविरुद्ध एफआयआर

**(पान १ वरून)** ताडाच्या पानांचा वापर झाला असल्याचे सांगितले जात आहे. यामुळे आग अतिशय वेगाने पसरली.प्राथमिक चौकशीत नाइट क्लबमध्ये अनेक सुरक्षादोष असल्याचे समोर येत आहे.आग प्रतिबंधक नियमांचे उल्लंघन आणि लोकांच्या सुरक्षेशी झालेली मोठी हलगर्जी यांचा समावेश आहे. याबरोबरच आर्पोरा नदीच्या बॅकवॉटरमध्ये उभारण्यात आलेल्या या क्लबचे बांधकाम देखील कथितपणे परवानगीशिवाय करण्यात आले असल्याचे सांगितले जात आहे. प्रत्यक्षदर्शी सांगतात की, आग प्रथम नाइट क्लबच्या पहिल्या मजल्यावर लागली, जिथे मोठ्या संख्येने पर्यटक नाचत होते.आग लागताच लोक घाबरून खाली धावले. काही लोक जेव्हा जिने उतरून ग्राउंड फ्लोरवर आले तेव्हा तेथील किचनमध्ये लागलेल्या आगीमुळे उठलेल्या धुरामुळे ते अडकले. ग्राउंड फ्लोरवर वेंटिलेशन नसल्याने अनेक लोक धुरात गुदमरले. त्यामुळे अनेक मृतदेह जिन्यांतूनच सापडले. नाइट क्लबचे प्रवेशद्वार आणि निर्गमद्वार खूपच अरुंद असल्याने लोक बाहेर पडू शकले नाहीत आणि गर्दीत चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली.नाइट क्लब पाण्यावर उभारलेला होता आणि जमिनीशी फक्त एका अरुंद मार्गाने जोडलेला होता. त्यामुळे आगीवर नियंत्रण मिळवणे कठीण झाले. वीकेंड असल्याने नाइट क्लबमध्ये प्रचंड गर्दी होती आणि डान्स फ्लोअरवर जवळपास १०० लोक नाचत होते. मृतांमध्ये १४ नाइट क्लब कर्मचारी आणि ४ पर्यटक असल्याची पुष्टी झाली असून इतरांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

## गोवा दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना मदत जाहीर

■ नवी दिल्ली, ता.७ –

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गोवा दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त करत मृतांच्या कुटुंबीयांना तात्काळ आर्थिक मदत जाहीर केली आहे. मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक कुटुंबाला पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून २ लाख रुपये मदत दिली जाईल. तर जखमींना ५० हजार रुपये मिळतील.**

पंतप्रधान म्हणाले,ही घटना अत्यंत दुःखद आहे. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले त्यांच्याबद्दल माझ्या संवेदना आहेत.गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याशी परिस्थितीबद्दल बोललो. राज्य सरकार बाधित लोकांना सर्वतोपरी मदत करत आहे.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटले आहे की, उत्तर गोवा जिल्ह्यातील आगीच्या दुर्घटनेने मला खूप दुःख झाले आहे. ज्यामध्ये अनेक मौल्यवान जीव गेले. शोकाकुल कुटुंबांना माझ्या मनापासून संवेदना.या कठीण काळात त्यांना धैर्य मिळो.जखमींच्या लवकर पुनर्प्राप्तीसाठी मी प्रार्थना करते.

## मराठी शाळा वाचवण्यासाठी मराठी अभ्यास केंद्र सरसावले

■ मुंबई,ता.७–

**राज्यात एकीकडे शाळांमध्ये हिंदीच्या सक्तीवरुन सातत्याने वाद निर्माण होत असताना दुसरीकडे मराठी शाळा मात्र बंद पडत असल्याचे चित्र आहे. मुंबईतील मराठी शाळा या ठरवून बंद पाडल्या जात असून त्या वाचवण्यासाठी मराठी अभ्यास केंद्राकडून येत्या १४ डिसेंबर रोजी परिषदेचे आयोजन केले आहे.त्यासाठी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांना निमंत्रित करण्यात आले आहे.**

मराठी अभ्यास केंद्राच्या पदाधिकाऱ्यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली आणि त्यांना या परिषदेचे निमंत्रण दिले. मुंबईतील शिवाजी मंदिर येथे १४ डिसेंबर रोजी मराठी शाळांची परिषद आयोजित करण्यात आली आहे.

आनंद भंडारे म्हणाले की, मुंबईतील अनेक मराठी शाळा बंद पडल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. मुंबई महानगरपालिकेकडून ठरवून या शाळा बंद पाडण्याचा कारभार केला जात आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीसाठी आम्ही राज ठाकरे यांना त्यांच्या जाहीरनाम्यात मराठी शाळांचा मुद्दा घ्या अशी विनंती केली. ती विनंती राज ठाकरे यांनी मान्य केली. मुंबईत मराठी शाळा ठरवून बंद पाडल्या तर भविष्यात राज्यभरातील सर्व मराठी शाळा बंद पडतील. गेल्या दोन वर्षात २८ पैकी १७ मराठी शाळा बंद पडल्या आहेत. मराठी शाळा टिकल्या तरच मराठी भाषा टिकेल. त्यामुळे येत्या १४ डिसेंबर रोजी यावर परिषद घेणार आहोत.

## सादळे मादळे घाटात अपघातात दुचाकीस्वार ठार

(पान १ वरून)

त्यात त्याच्या डोक्यास जोराचा मार लागल्याने तो जागीच ठार झाला. नारायण हा पेठवडगाव येथील भाजी मार्केटमध्ये कामास होता. आपले काम संपल्यानंतर तो कासारवाडी मार्गे पन्हाळा येथील निकमवाडीकडे जात असताना अपघात झाला.

नारायण याच्या लहानपणी त्याच्या वडीलांचे निधन झाल्याने कुटुंबीयांची सर्व जबाबदारी त्याच्यावर होती. या अपघातानंतर ट्रक चालक अभिषेक युवराज यादव ( वय २४, रा. दरेवाडी जि.सातारा ) याला या अपघाताची माहीती नव्हती. तो कासारवाडी गावात येवून येथील दुकानात काही साहित्य घेण्यासाठी थांबल्यावर मागून येणाऱ्या लोकांनी त्याला या अपघाताची माहिती देताच तो तिथेच थांबला. तेथून त्याला पोलिसानी ताब्यात घेतले.नारायण याच्या पश्चात आई, पत्नी, ६ वर्षाचा मुलगा व ५ वर्षाची मुलगी आहे.

## मुंबईत मेट्रो सेवा विस्कळीत

■ मुंबई,ता.७–

**डीएन नगर ते गुंदवली स्थानकादरम्यान मेट्रो सेवा विस्कळीत झाली असून प्रवाशांचा खोळंबा झाल्याचे चित्र आहे. काही तांत्रिक बिघाडामुळे दीड तासांपासून मेट्रो मार्गिका २ अ आणि ७ वरील सेवा विस्कळीत झाली. त्यामुळे प्रवाशांचे मात्र चांगलेच हाल झाल्याचे दिसून आले.**

संध्याकाळी सहाच्या दरम्यान मुंबईकर प्रवाश करत असताना मेट्रो मार्गिका २ अ आणि ७ वरील सेवा विस्कळीत झाल्याचे दिसून आले. त्याचा मोठा फटका प्रवाशांना बसला. त्यामुळे मेट्रो स्टेशनवर मोठी गर्दी झाल्याचेही दिसून आले.

# विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय अध्यक्ष, सभापती घेतील

(पान १ वरून)

**विरोधी पक्षनेत्यांचा निर्णय अध्यक्ष आणि सभापतींच्या हाती आहे. अध्यक्ष आणि सभापती घेतील तो निर्णय आम्हाला मान्य असेल. आग्रह नाही आणि दुराग्रह देखील नाही. विरोधकांकडे मुद्दे नाहीत आणि ते रेटून नेण्याची मानसिकता देखील नाही. नागपूरचे अधिवेशन रात्री उशिरा चालते. प्रत्येक दिवशी १० तास कामकाज चालते.**

दाखवण्याची घाई विरोधकांना झाली आहे. ओढाताणीची परिस्थिती असली तरी राज्य कुठेही दिवाळखोरीकडे चालले नाही. याचा अर्थ हा मूळीच नाही,आमच्याकडे खूप पैसे आहेत. योजना पूर्ण करायला पैसे आहेत आणि आम्ही ते देत आहोत. केवायसीचा प्रश्न आम्ही सोडवत आहोत. शेतकऱ्यांना देखील मदत मिळणार आहे.पण इतके निश्चितपणे सांगतो की,ज्या योजना आम्ही हाती घेतल्या आहेत. त्या पूर्ण करण्यासाठीचा निधी आमच्याकडे आहे.९२ टक्के शेतकऱ्यांना मदत मिळालेली आहे. ८ टक्के शेतकऱ्यांचा केवायसीचा प्रश्न आम्ही सोडवत आहोत. ९० लाखपैकी हे १२ लाख शेतकरी आहेत. त्यापैकी अर्ध्याहून अधिक शेतकऱ्यांचा प्रश्न आपण सोडवत आहोत. उर्वरित शेतकऱ्यांचा केवायसीचा प्रश्न सोडवल्यावर ते पैसे देणारच आहोत. त्यामुळे विरोधकांनी हे म्हणणे की शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही हे अभ्यास न करता केलेले विधान आहे. अतिवृष्टीची मदत दिली आहे आणि १० हजारांची वेगळी मदतही आपण दिली आहे. अधिवेशनाच्या निमित्ताने या सगळ्या विषयांवर आम्ही चर्चा करायला तयार आहोत. विरोधी पक्षाकडून जे प्रश्न उपस्थित होतील त्या प्रश्नांना आम्ही समर्पक उत्तर देऊ. शेतीच्या संदर्भातली चर्चा असेल किंवा इतर प्रश्न असतील आमची उत्तर देण्याची तयारी आहे.

अधिवेशनात आम्ही सर्व गोष्टींवर चर्चा करायला तयार आहोत. आम्ही समर्पक उत्तर देऊ. अधिवेशन लहान आहे हा मुद्दा मांडला. आचारसंहितेमुळे पूर्ण अधिवेशन घेऊ शकत नाही. जास्तीत जास्त कामकाज करायला आम्ही तयार आहोत. पळून जायची मानसिकता आमची नाही.

**अधिवेशन विरोधी पक्ष नेत्याविना**

विधान परिषदेत ठाकरेंच्या शिवसेनेचे अंबादास दानवे विरोधी पक्ष नेता होते. मात्र गेल्या सत्रात त्यांचा कार्यकाळ संपला असल्याने विधानपरिषदेतही विरोधी पक्ष नेता नाही. यंदाच्या हिवाळी अधिवेशनामध्ये दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्ष नेता निवडण्याची शक्यता धूसर आहे. विधिमंडळाच्या कामकाज पत्रिकेमध्ये विरोधी पक्षनेता निवडी संदर्भात कुठलाही उल्लेख नाही. त्यामुळे या अधिवेशनात दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेता निवडीवर निर्णय होणार नसल्याची शक्यता आहे. विधान परिषदेमध्ये काँग्रेसकडून सतेज पाटील आणि विधानसभेमध्ये शिवसेना ठाकरे गटाकडून भास्कर जाधव यांच्या नावाचं पत्र देण्यात आलेल आहे.

# ओव्हरटेक नडला; एसटीला धडकला

## ईश्वरपूरचा दुचाकीस्वार ठार; दोघे गंभीर जखमी

■ कोल्हापूर, ता.७ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर- रत्नागिरी मार्गावर चिखली फाट्याजवळ रविवारी रात्री साडेसातच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात एकाचा मृत्यू तर दोघे गंभीर जखमी झाले. कोल्हापुरातून पन्हाळ्याकडे जात असलेल्या दुचाकीस्वाराने कारला ओव्हरटेक करताना समोरून येणाऱ्या एसटी बसला जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वार दिग्विजय दिलीप पाटील (३९, रा. उरुण-ईश्वरपूर, जि. सांगली) यांचा जागीच मृत्यू झाला. पाठीमागे बसलेला अर्णव संतोष कबुरे (२०, रा. ईश्वरपूर) गंभीर जखमी आहे.**



मयत- दिग्विजय पाटील

दिग्विजय पाटील आणि अर्णव कबुरे हे दोघे २१ वर्षीय युवतीसह कोल्हापुरातून पन्हाळ्याकडे निघाले होते. चिखली फाट्याजवळ ओव्हरटेक करताना त्यांच्या दुचाकीने विशाळगड-कोल्हापूर एसटीला समोरासमोर धडक दिली. धडकेत दोन्ही युवक रस्त्यावर फेकले गेले, तर मध्ये बसलेली युवती बाजूला पडल्याने गंभीर दुखापतीपासून बचावली. तिघांनाही तत्काळ सीपीआर हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. मात्र दिग्विजय पाटील यांचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.त्या वेळी जोतिबा दर्शन करून कोल्हापूरच्या दिशेने येत असलेल्या आमशी येथील सैन्य दलातील जवान आदित्य पाटील आणि जिल्हा परिषद शिक्षक स्वप्निल पाटील यांनी तत्परता दाखवत जखमी तरुणीला खाजगी वाहनातून दवाखान्यात पोचवले.

**मलकापूर आगाराच्या एसटी बसचे चालक प्रकाश पाटील आणि वाहक दिनेश नंदिस्कर यांना पुढील चौकशीसाठी पोलिसांनी ताब्यात घेतले असून करवीर पोलिस ठाण्यात रात्री उशीरा पर्यंत अपघाताची नोंद सुरू होती.**

उर्वरित दोघांना १०८ रुग्णवाहिकेतून उपचारासाठी दाखल करण्यात आले. अपघातानंतर महामार्गावरील वाहतूक काही वेळ विस्कळीत झाली होती. करवीर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून वाहने बाजूला करून रस्ता मोकळा केला.

## गौरव खन्ना ठरला बिग बॉस १९ चा विजेता

■ मुंबई,ता.७–

**सर्वांचे लक्ष लागून असलेल्या बिग बॉस शोच्या १९ व्या पर्वाचा विजेता गौरव खन्ना ठरला तर फरहाना भट्ट उपविजेता ठरला. मराठमोळा प्रणीत मोरे तिसऱ्या क्रमांकावर राहिला. गौरव खन्नाने ५० लाखांच्या बक्षिसासह बिग बॉसची ट्रॉफी जिंकली.**


बिग बॉस १९ शो सलमान खानने होस्ट केला होता. चाहत्यांनी बिग बॉस १९ शोला भरभरून प्रतिसाद दिला. टीआरपी रेटिंगमध्ये कार्यक्रम टॉप १० मध्ये होता. या शो मध्ये भांडणे आणि मैत्रीचे अनेक रुप पाहायला मिळाले.मराठमोळा प्रणीत मोरे हा टॉप २ मध्ये स्थान मिळवू शकला नाही. फक्त गौरव खन्ना आणि फरहाना भट्ट टॉप २ मध्ये राहिले. तान्या मित्तल, फरहाना भट्ट, गौरव खन्ना आणि प्रणीत मोरे यांनी टॉप ४ फायनलिस्टमध्ये स्थान मिळवले होते. सर्व स्पर्धकांनी चांगला परफॉर्मन्स केला. तान्या मित्तलने तिच्या बडबडीने भरपूर कंटेंट दिला, तर गौरव खन्नाने त्याच्या शांत आणि बुद्धिमान व्यक्तिमत्त्वाने अनेकांच्या मनावर राज्य केले. फरहाना भट्टचा रागीट स्वभाव आणि प्रणीतची विनोदी शैली चांगलीच गाजली.

## मुंडेंना चौकशीला बोलवा : मनोज जरांगे

बीड,ता.७–

धनंजय मुंडे यांनी माझी २.५ कोटींची सुपारी दिली होती. याबाबत तीन आरोपींनी कबुली दिली आहे. धनंजय मुंडे यांना चौकशीला बोलवा. नाही तर तुम्हाला भारी पडेल,असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. ते पुढे म्हणाले, प्रत्येक गावातील मराठा माझ्या मागे आहेत. जिथे तू मला मारायला येशील तिथे मराठ्यांची पोरं दगड घेवून येतील.गरिबात लय ताकद आहे. आपल्याला आपली ताकद कळली नाही. बेसावध राहिल्यामुळे आपला कार्यक्रम झाला. बाकीचे सावध राहिल्याने पुढे गेले. आता सावध राहिलो तरच टिकून राहू.

|| प्रथम पुण्यस्मरण ||



कै. सिद्राम शंकर शेटके (तात्या)

आमचे स्नेही
कै. सिद्राम शंकर शेटके (तात्या)
यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त
भावपूर्ण आदरांजली!

विलास बिरु इंगवले
रमेश शंकर इंगवले (दादा)
शिवाजी दत्तू घोडके (निपाणी)

प्रथम पुण्य स्मरण!

अजूनही होतो भास,
तुम्ही आहात जवळपास
शांती लाभो तुमच्या आत्म्यास
हीच प्रार्थना परमेश्वरास!



कै. सिद्राम शंकर शेटके (तात्या)

आमचे वडील कै.सिद्राम शंकर शेटके (तात्या)
यांच्या प्रथम पुण्यस्मरणदिनी भावपूर्ण आदरांजली!

संतोष सिद्राम शेटके
सिद्धू फिश सेंटर, इचलकरंजी.

|| प्रथम पुण्यस्मरण ||

आई
तुझं असणं आमच्यासाठी
सर्वस्व होतं,
ते आमच्या आयुष्यातील
सुंदर पर्व होतं,
आता सर्वकाही असण्याची
जाणीव आहे
पण तू आमच्यात नाहीस
ही मोठी उणीव आहे.



कै. सौ. सरोजिनी केदारलिंग जोगोजे

केदारलिंग बाळाप्पा जोगोजे
सुनिल केदारलिंग जोगोजे
स्वप्निल केदारलिंग जोगोजे
जोगोजे परिवार,इचलकरंजी.

# सुहास थोरात खूनप्रकरणी मोबाईल, दुचाकी ताब्यात

इचलकरंजी,ता.७-

**येथील सुहास थोरात खूनप्रकरणी अटक केलेल्या दोघांकडून कसून तपास केला जात आहे. या तपासात महत्त्वाचे धागेदोरे हाती येत आहेत. मुख्य संशयित ओंकार शिंदे व ओंकार कुंभार यांच्याकडून पोलिसांनी मृत सुहासचा मोबाईल तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी ताब्यात घेतली आहे.**



सुहास थोरात याचे अपहरण करून खून करण्यात आला. या खूनप्रकरणी मुख्य संशयित ओंकार शिंदे व ओंकार कुंभार हे दोघे पाच दिवसांच्या पोलिस कोठडीत आहेत. या खून प्रकरणाची पोलिसांनी गंभीर दखल घेऊन तपास चालविला आहे. अपहरणापासून खून होईपर्यंतच्या घटनेत आणखी कोणी सामील होते का याचा त्यांच्याकडून पोलीस बारकाईने मागोवा घेत आहेत. गुन्ह्याचा घटनाक्रम संशयास्पद असल्याने पोलिसांच्या काही पथकांनी वेगवेगळ्या दिशांनी तपास सुरू केला आहे.

दरम्यान गुन्ह्यात वापरलेला कोयता घटनास्थळीच आढळून आला असून पोलिसांनी अद्याप तो जप्त केलेला नाही. या कोयत्यावरून मिळू शकणारे फॉरेन्सिक पुरावे अत्यंत महत्त्वाचे ठरणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. संशयित आरोपींच्या चौकशीतून आणखी काही नावे समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# उमेदवार निवडीसाठी भाजपा कोअर कमिटीची परिक्षा

## इच्छुकांच्या भाऊगर्दीमुळे महायुतीमध्ये उमेदवारीसाठी रस्सीखेच होणार

इचलकरंजी,ता.७-

**महानगरपालिका निवडणुकीमध्ये भाजपकडून उमेदवारांची निवड ही स्थानिक नेतृत्वाकडून केली जाणार आहे. मात्र, एका प्रभागात अनेकजण इच्छुक असल्याने आणि घटक पक्षांकडूनही उमेदवारीची मागणी केली जाणार असल्यामुळे पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. तेव्हा भाजपाकडून कोअर कमिटीकडून नेमके कोणते निकष लावणे जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून उमेदवारी न मिळाल्यास बंडखोरीचे आव्हान देखील उभे राहणार आहे. त्यामुळे उमेदवार निवडीपासूनच भाजपा तसेच महायुतीमध्ये रस्सीखेच होणार असल्याचे दिसून येत आहे.**



इचलकरंजी महानगरपालिका निवडणूक

इचलकरंजी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचा इचलकरंजी दौरा सध्या चर्चेत आहे. भाजपा पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत त्यांनी उमेदवार निवडीचे अधिकार भाजपा प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर, माजी आमदार प्रकाश आवाडे, आमदार राहुल आवाडे आणि संघटन मंत्री मकरंद देशपांडे या चार सदस्यांच्या कोअर कमिटीकडे सोपविले आहे. त्यामुळे कोअर कमिटी उमेदवार निवडीसाठी निकष लावणार आहे. यात पास होणाऱ्यांनाच उमेदवारी मिळणार आहे.

दरम्यान, आम. राहुल आवाडे हे सुरवातीपासूनच स्वबळावर लढण्याची तयारी करत होते. तथापि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत महापालिका निवडणुक महायुतीच्या माध्यमातून लढवणार असल्याचे बोलून दाखविले आहे. यामुळे उमेदवारीसाठी आणखी पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. शहरात राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि शिवसेना शिंदे गटाचे प्राबल्य आहे. त्यामुळे घटक पक्षांना नाकारून चालणार नाही. सध्या भाजपकडून प्रत्येक प्रभागातून किमान चार ते पाचजण उमेदवारीसाठी इच्छुक आहेत. त्याचबरोबर राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि शिवसेनेकडूनही अनेकजण इच्छुक आहेत. परिणामी उमेदवारीसाठी संघर्ष निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. याशिवाय एकाच प्रभागात आवाडे आणि हाळवणकर गटाचे देखील कार्यकर्ते इच्छुक आहेत. अशावेळी उमेदवारीवरून तू-तू मैं-मैं असा वाद निर्माण झाल्यास या प्रकारात मध्यस्थी कोण करणार? असा प्रश्न निर्माण होत आहे. त्यातूनच पक्षासमोर बंडखोरांचे मोठे आव्हान निर्माण होऊ शकते.

उमेदवार निवडीसाठी कामाचा अहवाल देण्याची सूचना सर्व इच्छुक उमेदवारांना करण्यात आली आहे. त्यानुसार येत्या काही दिवसात उमेदवारांना आपला अहवाल द्यावा लागणार आहे. सदरचा अहवाल हा पक्षाकडे पाठविला जाणार असला तरी उमेदवारी संदर्भातील निर्णय हा स्थानिक पातळीवरच घेतला जाणार आहे. त्यामुळे कोअर कमिटीचीच आता खरी परिक्षा असल्याचे दिसते.

### पदाचे अवमूल्यन होऊ नये

एकाच प्रभागातून अनेकजण इच्छुक असल्यामुळे प्रत्येकाला उमेदवारी मिळेलच याची शाश्वती देता येत नाही. तथापि इच्छुकांना नाराज न करता त्यांना कमी कालावधीसाठी स्वीकृत नगरसेवक पदाची संधी दिली जाईल, असे आम. राहुल आवाडे बोलून दाखवत आहेत. त्यामुळे गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असलेल्या इच्छुकांना खरचं संधी मिळणार काय? तसेच मिळालीच तर त्याचा कालावधी किती असेल? असे प्रश्न निर्माण होत आहेत. यामुळे राजकीय खेळाच्या सारिपाटात नेतेमंडळींनी पदाचे अवमूल्यन करू नये, अशी अपेक्षा राजकीय जाणकारातून व्यक्त केली जात आहेत.

# फोटोच्या बहाण्याने महिलेची बोरमाळ लंपास

सांगली,ता.७(प्रतिनिधी)-

**दागिन्याचा फोटो काढण्याचा बहाणा करुन एका महिलेच्या गळ्यातील अर्ध्या तोळ्याची बोरमाळ चोरट्याने लंपास केली. ही घटना शनिवारी रात्री साडेनऊच्या सुमारास शहरातील स्वामी समर्थ हॉटेलच्यामागील बाजूस असणाऱ्या मोकळ्या जागेत घडली. याप्रकरणी शांताबाई महादेव बोरगे (वय ७४, रा. हनुमाननगर, सांगली) यांनी सांगली शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.**

घटनेची माहिती अशी, फिर्यादी शांताबाई बोरगे या स्वामी समर्थ हॉटेलमध्ये कर्मचारी म्हणून कामास आहेत. सकाळच्या सुमारास त्या हॉटेलच्या मागील बाजूस असणाऱ्या मोकळ्या जागेत उभ्या होत्या. त्यावेळी त्यांच्याकडे एक ४० वर्षीय इसम दुचाकीवरुन तेथे आला. त्याने शांताबाईशी काही वेळ बोलून विश्वास संपादन केला. त्यानंतर चोरट्याने, मला तुमच्या गळ्यातील बोरमाळेसारखाच दागिना करायचा आहे. त्याचे छायाचित्र काढण्यासाठी मला तुमची बोरमाळ द्या असे शांताबाईंना सांगितले.

त्यांनीही लगेच आपल्या गळ्यातील अर्ध्या तोळ्याची बोरमाळ चोरट्याकडे दिली. यानंतर बोरमाळ हातात घेवून चोरटा छायाचित्र काढण्याच्या उद्देशाने शांताबाईंपासून काही अंतरावर गेला आणि तेथून दुचाकीवर बसला. त्याने दुचाकी सुरु केल्यावर फिर्यादी शांताबाई यांनी आरडाओरडा केला. मात्र, तोपर्यंत चोरटा तेथून पसार झाला होता. पोलिसांनी चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# चारचाकीच्या धडकेत महिला गंभीर

सांगली,ता.७(प्रतिनिधी)-

**भरधाव वेगात असणाऱ्या चारचाकीने दुचाकीस धडक दिल्याने महिला गंभीर जखमी झाली. शुभांगी सुनील खवाटे (वय ४५,रा.गावभाग, सांगली) असे जखमी महिलेचे नाव आहे. याप्रकरणी सांगली शहर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.**

घटनेची माहिती अशी, सकाळी दहाच्या सुमारास फिर्यादी शुभांगी खवाटे या दुचाकीवरुन (क्र.एमएच १० एएम २७१७) सांगलीहून हरिपूरच्या दिशेने निघाल्या होत्या. त्यावेळी भरधाव वेगाने आलेल्या चारचाकीने समोरील वाहनास ओलांडून पुढे जाताना शुभांगी खवाटे यांच्या दुचाकीस जोरदार धडक दिली.

यामध्ये शुभांगी या रस्त्यावर फेकल्या गेल्या. चारचाकी चालकाने घटनास्थळावरुन पलायन केले. दरम्यान उपस्थितांनी तातडीने शुभांगी खवाटे यांना रुग्णालयात दाखल केले. त्यांना गंभीर दुखापत झाली असून दुचाकीचेही नुकसान झाले आहे. पोलिसांनी अज्ञात चारचाकी चालकावर गुन्हा दाखल केला आहे.

# सांगलीत घरफोडी

सांगली,ता.७(प्रतिनिधी)-

**शहरातील वसंतनगर येथील बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने सुमारे १९ हजाराचे दागिने लंपास केले. ही घटना गुरुवार ते शनिवार या दरम्यान घडली. याप्रकरणी वैष्णवी विठ्ठल शिंदे (रा.वसंतनगर, सांगली) यांनी संजयनगर पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली आहे.**

फिर्यादी वैष्णवी शिंदे या तीन दिवस घरास कुलूप लावून बाहेरगावी गेल्या होत्या. त्या दरम्यान चोरट्याने घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. आतील १२ हजार रुपये किंमतीची ५ ग्रॅम वजनाची कानातील सोन्याची फुले आणि रोख ७ हजार रुपये असा ऐवज लंपास करुन पोबारा केला. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# शिरढोण ग्रा.पं.चा कारभार अडकला सहीच्या वादात

शिरढोण,ता.७(प्रतिनिधी)-

**शिरढोण (ता.शिरोळ) येथील ग्रामपंचायतीचे सरपंच राजीनामा प्रकरण कोल्हापूर जिल्हाधिकारी यांच्या कोर्टात न्याय प्रविष्ट झाले आहे. यामुळे ग्रामपंचायतीचा कारभार सरपंच की उपसरपंच यांच्या सहीने करायचा या विषयी मतभिन्नता दिसते. त्यामुळे सहीवरून ग्रामपंचायत सदस्य व प्रशासनामध्ये वाद होवून ग्रामपंचायतीचा कारभार ठप्प झाला आहे. सदस्यांनी सहीचा विषय प्रतिष्ठेचा केला आहे. या ग्रामपंचायतीच्या संपूर्ण कारभाराविषयी ग्रामस्थांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

सरपंच राजीनामा प्रकरण न्याय प्रविष्ठ झाल्याने ग्रामपंचायतीचा कारभार कुणाच्या सहीने करायचा या विषयी सदस्य व प्रशासन यामध्ये वाद होताना दिसत आहे. मासिक मिटिंगची नोटीस सरपंच यांच्या सहीने काढली असता सदस्य नोटीस स्वीकारत नाहीत. त्यामुळे मासिक मिटिंग झाली नाही. मासिक मिटिंग झाली नसल्याने तसेच सहीच्या वादामुळे ग्रामपंचायतीचा कारभार ठप्प झाला आहे.आर्थिक उलाढाली थंडावल्या आहेत. सरपंच सागर भंडारे यांनी ग्रामपंचायतीला ग्रामसभा घेण्या संदर्भात लेखी पत्र दिले आहे तरी देखील ग्रामसभा घेण्याबाबत टाळाटाळ केली जात आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामपंचायतीकडून निवासी मालमत्ता कर व अन्य कर थकबाकी वसुलीत ५०टक्के सवलत देण्यात संदर्भात १३ नोव्हेंबर २०२५ रोजी शासन निर्णय झालेला आहे.पण यासाठी ग्रामपंचायतीने विशेष ग्रामसभा घेऊन त्यात बहुमताने ठराव मंजूर करणे आवश्यक असून सदरची सवलत ३१डिसेंबर २०२५पर्यंत आहे. अद्याप ग्रामपंचायतीने ग्रामसभेची नोटीसच काढलेले नाही. त्यामुळे मालमत्ताधारक ५०% सवलती पासून वंचित राहतात असे दिसू लागले आहे. ग्रामसभा झालीच नाही तर मालमत्ता धारकाबरोबर ग्रामपंचायतीचे देखील नुकसान होणार आहे.आणि या होणाऱ्या नुकसानीला ग्रामपंचायत सदस्य व प्रशासन जबाबदार असणार आहे.

नोटीस वरील सहीचा विषय ग्रामपंचायत सदस्यांनी प्रतिष्ठेचा करण्यापेक्षा घरपट्टी, पाणीपट्टी वसुली तसेच गावच्या विकासाला गती कशी मिळेल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. दोन दिवसात ग्रामपंचायतीने थकबाकी सवलती संदर्भात ग्रामसभा घेतली नाही तर ग्रामस्थ आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

# शंभूतीर्थ लोकार्पण सोहळ्यानिमित्त धर्म रक्षा महायज्ञास मोठा प्रतिसाद

इचलकरंजी, ता.७-

**कॉ.के.एल.मलाबादे चौकातील श्री शंभूतीर्थाच्या लोकार्पण सोहळ्यानिमित्त आयोजित धर्म रक्षा महायज्ञाला मोठा प्रतिसाद मिळाला. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाचे स्मरण करून हिंदू समाजाने धर्म संरक्षण, गौसेवा आणि राष्ट्रभक्तीची प्रतिज्ञा या महायज्ञामध्ये केली. यावेळी जिहाद, जबरदस्ती धर्मांतरण आणि हिंदू संस्कृतीवर होणाऱ्या आघातांना विरोध करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.**

मुख्य पूजेचा मान इचलकरंजी महानगरपालिकेच्या आयुक्त पल्लवी पाटील यांच्या हस्ते पार पडला. लोकार्पण सोहळ्याचे अध्यात्मिक दर्शन सर्वांसाठी खुले व्हावे, यासाठी हा यज्ञ आयोजित करण्यात आला होता. या महायज्ञात हजारोंच्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती दर्शवून आहुती दिली आणि रक्षा सूत्र बांधून धर्मरक्षणाचा संकल्प केला. मंत्रोच्चार, ध्वनिसाथ आणि पारंपरिक पूजा पद्धतीमुळे संपूर्ण परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले.



धर्म रक्षा महायज्ञाप्रसंगी आम.राहूल आवाडे,महाजन गुरूजी व इतर

या प्रसंगी आमदार राहुल आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, मदन कारंडे, सागर चाळके, संजय कांबळे, प्रकाश मोरबाळे, संजय तेलनाडे यांसह अनेक राजकीय, सामाजिक आणि हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

या महायज्ञाच्या आयोजनात ब्राह्मण युवा मंच, इचलकरंजीचे विशेष सहकार्य लाभले. मंचाचे पंकज त्रिपाठी, अमित शर्मा, अरविंद शर्मा, मुकेश दायमा, संदीप व भगवान खंडेलवाल, विनोद दायमा, करणसिंग राजपुरोहित यांसह कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी केला.

# टाकळी-जुने दानवाड दरम्यान रस्त्याची दुरवस्था

## नागरिक, वाहनधारक हैराण; अपघाताची समस्या कायम

सैनिक टाकळी,ता.७(प्रतिनिधी)-

**कर्नाटकला जोडणारा प्रमुख मार्ग असलेल्या टाकळी – जुने दानवाड दरम्यान दानवाड हद्दीतील रस्त्याची अतिशय दुरावस्था झाली आहे.सांगली, जयसिंगपूर, नृसिंहवाडी, बेळगाव, चिकोडी, एकसंबा आणि रायबाग येथे जाणारे प्रवासी या रस्त्याचा वापर करतात. महामार्गावरील टोल टाळण्यासाठी जड वाहनाची देखील वाहतूक याच मार्गावरून होत असते.**



टाकळी – जुने दानवाड रस्त्याची झालेली दुरवस्था.

दोन वर्षांपूर्वी जुन्या दानवाडमधील मुस्लिम कब्रस्तानजवळील एक किलोमीटर रस्त्याचे मुरमीकरण आणि डांबरीकरण करण्यात आले होते . तथापि, अवघ्या दोन वर्षांत रस्ता खराब झाला आहे, मोठे खड्डे पडले आहेत, ज्यामुळे प्रवाशांसाठी हा रस्ता धोकादायक बनला आहे.

दररोज हजारो वाहने या रस्त्यावरून जातात आणि रस्त्याच्या खराब स्थितीमुळे वाहन चालक आणि प्रवासी, स्थानिक नागरिकांतून असंतोष निर्माण झाला आहे.

अलीकडेच साखर कारखाने सुरू झाल्यामुळे या रस्त्यावर वाहतूक वाढली आहे, ज्यामुळे वाहतूक कोंडी होत आहे आणि अपघातांची चिंता निर्माण झाली आहे.

रस्त्याच्या दुरवस्थेला जबाबदार कोण? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. लोकप्रतिनिधी, बांधकाम विभागाकडून रस्ता दुरुस्तीसाठी त्वरित कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

दूधगंगा नदीला येणाऱ्या पुराचा नेहमीच या रस्त्याला फटका बसतो. वाढती वाहतूक लक्षात घेता या भागातील पुराच्या पाण्याचा फटका बसणाऱ्या रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्याची गरज असल्याचे मत स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# घोसरवाड येथील मुख्य रस्त्यावर गतिरोधक बसविण्याची मागणी

घोसरवाड,ता.७(वार्ताहर)-

**घोसरवाड, ता. शिरोळ येथील घोसरवाड ते पाच मैल या मुख्य रस्त्यावर वाहनांची वर्दळ प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढली असून त्यामुळे लहान मोठे अपघात घडत आहेत. वाढत्या अपघातामुळे या रस्त्यावर ठिकठिकाणी स्पीड ब्रेकर बसविण्याची मागणी होत आहे.**

घोसरवाड येथुन इचलकरंजी, सांगली ,जयसिंगपूर, शिरोळ व कुरुंदवाड कडे मोठ्या प्रमाणात एसटी बसेस बरोबरच इतर ही वाहनांची वर्दळ प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढली आहे.त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी असते येथुन दत्तवाड रोड व पाचमैल रोड असा मुख्य रोड आहे.

तसेच कर्नाटक मधील सदलगा, बोरगाव, निपाणी या मुख्य शहरांना देखील या मार्गावरुन वाहनांची वर्दळ प्रचंड मोठ्या प्रमाणात असते.तसेच घोसरवाड येथील मुख्य रोडवर शैक्षणिक विद्यालय व शाळा आहेत. तसेच रस्त्याकडे लाच मोठमोठ्या वस्ती व इमारती आहेत. त्यामुळे या रस्त्यावरती गर्दी प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढली आहे.त्यामुळे रस्त्यावरती मुख्य ठिकाणीं स्पीड ब्रेकर असणे अत्यंत गरजेचे बनले आहे.या रस्त्यावर तर काही वाहने भरधाव वेगाने चालवित असतात. काही मोटारसायकल धारकांना तर स्पीडची सीमाच राहिली नाही. बेधुंद व बेदरकारपणे मोटारसायकल चालवत असतात. यांच्यावर देखील पोलिसांचे वचक असणे आवश्यक आहे.

त्यामुळे रस्त्यावर स्पीड ब्रेकर असणे गरजेचे आहे .लोकप्रतिनिधी व शासनाचे संबंधित अधिकारी यांनी यामध्ये विशेष लक्ष घालून या मार्गावर मुख्य ठिकाणी स्पीड ब्रेकर बसवावे अशी मागणी जनतेतून होत आहे.

# समाजात दुही निर्माण करण्याचा विरोधकांकडून प्रकार दुदैवी

## जमाल सिद्दीकी

इचलकरंजी,ता.७-

**सबका साथ सबका विकास हा मूलमंत्र घेऊन देशातील मोदी सरकार काम करत आहे. तथापि केवळ आपली राजकीय दुकानदारी टिकविण्यासाठी मुस्लिम समाजात भ्रम निर्माण करुन माथी भडकविण्याचे काम विरोधकांकडून जाणीवपूर्वक केले जात आहे. पण विरोधकांचे हे कार्य यशस्वी होणार नाही, असा विश्वास भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केला.**

कृष्णानगर येथे संघटनेच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने श्री. सिद्दीकी इचलकरंजीत आले असताना त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. याप्रसंगी ते म्हणाले, परिवार वादाला त्रासलेल्या जनतेला गरीब कल्याणच्या माध्यमातून देशातील मोदी सरकारने मोठा दिलासा दिला आहे. दिनदयाळ उपाध्यय यांच्या शेवटच्या घटकापर्यंतचा उध्दार व्हावा हाच विचार घेऊन मोदी सरकारची वाटचाल सुरु आहे. त्याच माध्यमातून अल्पसंख्यांक मोर्चाही कार्यरत आहे. प्रथम राष्ट्र, मग पक्ष आणि त्यानंतर मी याद्वारे देश मजबूतीसाठी प्रयत्न केले जात आहेत.



भाजपा हा मुस्लीम द्वेष्टा असल्याचा अपप्रचार विरोधकांकडून केला जात आहे. आजपर्यंत विरोधकांनी विशेषत: कॉंग्रेसने केवळ वोट बँक म्हणून अल्पसंख्यांकाचा वापर करुन घेतला आहे. युवकांची माथी भडकावून भाजपाच्या विरोधात भरकटवले जात आहे. देश निर्माणमध्ये कोणा एकाचे नव्हे तर सर्वांचे योगदान आहे.

देश मजबूत झाला तर धर्म आणि आपण मजबूत होणार आहोत. भाजपाने प्रत्येक योजना ही कोणत्या एका जाती-धर्मासाठी नसून ती सर्वांसाठी आहे. त्यामध्ये कोणताही भेदभाव केला जात नाही. तथापि विरोधकांकडून मात्र निष्कारण योजनांचे भांडवल केले जात आहे.

एमआयएमचे खास. असाउद्दीन ओवेसी हे पाकच्या जीनाप्रमाणे देशातील मुस्लिमांमध्ये फाळणी करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु त्यांचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत. त्यांनी देशात राहून नकारात्मकता सोडावी, असा सल्ला देऊन सिध्दीकी यांनी अल्पसंख्यांकांना भाजपाकडून उमेदवारी दिली जात नाही या प्रश्नाचे खंडन करताना त्यांनी, आम्ही सक्षम उमेदवार शोधत आहोत. परंतु गैरसमजातून अनेकजण इच्छुक असूनही उमेदवारीसाठी येण्यास धजत नाहीत. ज्याच्यात क्षमता आहे, जनतेशी नाळ जोडली आहे अशांना आम्ही निश्चितपणे उमेदवारी देऊ. त्यांनी पुढे यावे.

याप्रसंगी अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष आकाशा मुल्ला, जिल्हाध्यक्ष औरंग शेख, अलीहुसेन खान, पश्चिम मंडल अध्यक्ष अबु पानारी, फारुक बागेवाडी, समीर जमादार, इम्रान बागवान, नजमा शेख, आयेशा शेख आदी उपस्थित होते.

# खोटा धनादेश देवून फसवणूक एकास ३ महिने सश्रम कारावास

शिरढोण,ता.७(प्रतिनिधी)-

**खोटा धनादेश देवून फसवणूक केल्या प्रकरणी शिरढोण (ता.शिरोळ) येथील दगडू आप्पासो मोरडे याला कुरुंदवाड प्रथमवर्ग न्यायालयाचे न्यायाधीश सौ.व्ही. एम. माने यांनी ३ महिने सश्रम कारावास व दीड लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावली. महादेव शंकर पाणदारे (रा.शिरढोण,ता.शिरोळ) यांनी मोरडे यांच्या विरोधात कुरुंदवाड येथील न्यायालयात फसवणुकीची फिर्याद दिली होती दिली.**

शिरढोण (ता.शिरोळ) येथील महादेव शंकर पाणदारे यांचेकडून आरोपी दगडू आप्पासो मोरडे यांनी त्यांच्या गरजे खातर एक लाख ५० हजार घेतले होते.

सदर रकमेच्या परतफेडीसाठी मोरडे यांनी आयसीआय बँकेचे दि.२३/०८/२०१८ रोजीचे ५० हजार रूपयांचे तीन धनादेश दिले होते व सदरचे धनादेश बँक वसुलीसाठी महादेव पाणदारे यांनी भरले असता ते धनादेश वठले नाहीत.याबाबत पाणदारे यांनी कुरुंदवाड येथील फौजदारी न्यायालयात खटला दाखल केला होता.

या खटल्याची सुनावणी होऊन सुनावणी मध्ये ॲड. देवराज मगदूम यांनी मांडलेले मुद्दे ग्राह्य धरून दिवाणी व फौजदारी न्यायाधीश सौ.व्ही.एम.माने यांनी आरोपी दगडू मोरडे यास ३ महिने सश्रम कारावास व दीड लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावली. फिर्यादी पाणदारे यांचे वतीने ॲड. देवराज मगदूम व ॲड. यु.पी. पाटील यांनी काम पाहिले.

■ संपादकीय ■

# हक्काचा साथीदार

रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांचा बहुप्रतिक्षित आणि बहुचर्चित भारत दौरा झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या बैठकीत उभय देशांतील संबंध अधिक घट्ट करण्याबाबत चर्चा झाली. विशेषत: ऊर्जा व्यापार, संरक्षण आणि आर्थिक सहकार्य दृढ करण्यावर भर दिला गेला. पुतीन त्या देशाचे प्रतिनिधी आहे जो अनेक दशकांपासून भारताचा मित्र आहे. सध्याच्या एकध्रुवीय जगात 'अमेरिका बोले आणि जग चाले'अशी स्थिती आहे. ते नाकारण्याचे काही कारण नाही आणि रशिया जो कधीकाळी अमेरिकेचा थेट प्रतिस्पर्धी होता तोही हे नाकारणार नाही. मागच्या काळात भारत आणि रशिया हे दोन्ही देश त्यांच्या त्यांच्या पातळीवर वेगवेगळ्या संघर्षात गुंतले होते. रशियाचे युक्रेनसोबतचे युद्ध अजूनही सुरू आहे.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना जगात शांतीदूत म्हणून मिरवायचे असल्यामुळे त्यांनी रशियावर या युद्धाच्या मुद्द्यावर तर ऑपरेशन सिंदूरच्या अनुषंगाने भारतावर बराच दबाव आणला. स्वत:ची प्रतिमा चमकवण्यासोबतच भारत-रशिया संबंधातील जवळीक कमी करण्याचा हा प्रयत्न होता. त्यात त्यांना यश आले असल्याचे आतापर्यंत दिसत नाही आणि भविष्यातही अमेरिका यशस्वी होणार नाही, असे पुतीन यांच्या दौऱ्याने अधोरेखित केले. सामान्यत: आंतरराष्ट्रीय संबंधांच्या बाबतीत प्रत्येक देशाच्या नागरिकांचे आपले एक मत तयार झालेले असते. कोणता देश आपला मित्र आणि कोणता शत्रू आणि कोणता बेभरवशाचा हे त्यांना समजते. भारतीयांना कारण ठामपणे सांगता येणार नाही, तरी रशिया जवळचा वाटतो आणि रशियातही भारताच्या संदर्भात हीच भावना आहे.युक्रेनविरूद्ध संघर्ष सुरू केल्यामुळे पुतीन यांना खलनायक ठरवले गेले आहे. अमेरिका आणि युरोप यांचा त्यांच्यावर राग आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने पुतीन यांच्या विरोधात अटक वॉरंटही जारी केले आहे.युक्रेनचा घास गिळंकृत केल्यानंतर रशिया युरोपातल्या देशांसाठी धोका ठरेल अशी त्या देशांची ठाम धारणा आहे व ती निराधार नाही. त्याचे कारण पुतीन यांना त्यांचा जुना सोव्हियत संघ हवा आहे. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर अमेरिका आणि तत्कालीन सोव्हियत संघ यांच्यात सुप्त संघर्ष होता.दोन्ही देशांतील स्पर्धा विकोपाला गेली होती. शस्त्रांपासून अंतराळ मोहिमापर्यंत सर्वत्र ती होती. त्यानंतर सोव्हियत संघाचे विघटन झाले.त्यातून १५ स्वतंत्र देश निर्माण झाले. विभाजन झाल्यावर नव्याने निर्माण झालेले सगळे देश पूर्वी एकसंध असताना होते तेवढे बलशाली राहत नाहीत. त्याचे कारण साधनसंपत्ती विभागली गेली असते. शिवाय लष्कर,व्यापार,आर्थिक शक्ती, भूगोल सगळेच बदलते. तो काळ होता की अमेरिकेला थेट आव्हान देणारा कोणताही देश नसेल असा त्यांचा समज होता.तथापि,रशियाने तो समज खोटा ठरवला. युरोपातील देशांपेक्षा जास्त लोकसंख्या, तेलाचे भांडार, युरोप आणि आशियापर्यंत पसरलेला भूभाग, संरक्षण उद्योग ही रशियाची शक्ती ठरली. युरोपला आपल्या ऊर्जेच्या पूर्ततेसाठी रशियावर अवलंबून राहावे लागते आणि हीच बाब रशियाचे बलस्थान ठरली.पुतीन यांना रशिया वाढवायचा आहे. विस्तारवादाची त्यांची भूमिका असल्यामुळे त्यांनी युक्रेन विरूद्ध संघर्ष सुरू केला. कुठेतरी युरोपनेही त्यांना डिवचून यासाठी उद्युक्त केले. रशिया-युरोप-अमेरिका यांच्या कथित प्रेमसंबंधात एरव्ही भारताला स्वारस्य असण्याचे कारण नाही. तथापि, जगात आता अलिप्त राहूनही चालणारे नाही. तुम्ही ठरवले तरी तुम्हाला तसे राहता येत नाही. तुम्हाला कशाततरी लिप्त व्हावेच लागते. पाकिस्तानसोबतच्या प्रत्येक पारंपरिक संघर्षात अमेरिकेने पाकिस्तानची कड घेतल्याचा इतिहास आहे. भारताच्या कोणाच्या अध्यातमध्यात नसलेल्या धोरणामुळे जसे फायदे झाले तसे तोटेही झाले. विशेषत: पाकिस्तानच्या बाबतीत अमेरिकेमुळे बराच काळ भारताला पाकचा सर्वप्रकारचा उपद्रव सहन करावा लागला. त्यावेळी संरक्षण सामग्रीपासून ते इंधनाच्या पुरवठ्यापर्यंत प्रत्येक वेळी रशिया भारताच्या बाजूने उभा राहिला आहे. हा इतिहास आणि वर्तमान नाकारता येणार नाही.युक्रेनच्या संदर्भात भारत तटस्थ आहे असे म्हटले तरी त्याचा खुलासा पंतप्रधान मोदी यांनीच केला आहे. भारत तटस्थ नाही तर शांततेच्या बाजूने असल्याचा पुनरूच्चार त्यांनी केला. विशेष म्हणजे भारताच्या युक्रेन व त्यांच्याशी संबंधित भूमिकेला रशियाचा आक्षेप असल्याचे दिसले नाही.भारत रशियाकडून तेल खरेदी करतो व त्याचाच पैसा रशिया युक्रेनच्या विरोधातील युद्धात वापरतो असा ट्रम्प यांचा आरोप आहे. त्यामुळे त्यांनी भारतावर दुप्पट आयात शुल्क लावले. त्याचे हादरे भारतीय अर्थव्यवस्थेला बसण्यास सुरुवात झाली असली तरी शांतीदूत होण्याच्या आकांक्षेने पछाडलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांना भारताकडून अपेक्षित शरणागती मिळाली नसल्याचे वेळोवेळी व्यक्त होणाऱ्या त्यांच्या उद्वेगातून समोर येत असते. संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत भारताला स्थायी सदस्यत्व मिळावे यासाठी सर्वप्रथम पाठिंबा देणारा रशियाच होता. संरक्षण क्षेत्रातील सहकार्य आणि चीनवर वेळ पडलीच तर संतुलन साधण्याकरता रशिया उपयुक्त ठरू शकतो. बाकी करार-मदार होतात. प्रश्न असतो तो वेळीच मदतीला धावण्याचा, ते केले तर नाते घट्ट राहते.

# संसदीय लोकशाहीत संवादाला पर्याय नाही

**संसदीय लोकशाहीत सत्ताधारी आणि विरोधक ही दोन समान महत्त्वाची चाके मानली गेली आहेत.या दोन्ही चाकांमध्ये योग्य समन्वय राहिले तरच लोकशाहीची गाडी निर्विघ्न चालते. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात सतत संवाद राहणे ही या व्यवस्थेची मुलभूत गरज आहे, कारण संवाद तुटला की लोकशाहीचा मार्गच विस्कटण्याची शक्यता निर्माण होते.मतदार यादीचे गंभीर पुनरीक्षण अर्थात एस. आय. आर. च्या मुद्द्यावर मागील अधिवेशन जवळजवळ वाया गेले आणि त्यामुळे संसदेची प्रतिष्ठाच कमी झाली.**

त्या सत्रात सरकारने आपल्या बहुमताच्या जोरावर अनेक विधेयके मंजूर केली खरे, पण त्या प्रक्रियेत विरोधकांचा सहभाग नव्हता. प्रत्यक्षात लोकशाहीची अटच अशी आहे की कोणतेही विधेयक पुढे न्यायचे असेल तर विरोधकांनाही तितकाच सहभाग दिला पाहिजे. बहुमताचे राज्य असते हे मान्य असले तरी विरोधकांचा सहभाग अनिवार्य ठरतो,कारण विरोधकांमध्ये बसलेले सदस्यही जनतेनेच एकमताच्या अधिकाराने निवडून दिलेले असतात. अल्पमतामध्ये असले तरी जनतेचा आवाज संसदेत मांडणे ही त्यांची जबाबदारी असते. म्हणूनच संसद चालू राहणे आणि दोन्ही बाजूंचे मुद्दे मांडले जाणे आवश्यक ठरते. बहुमत जिंकणे हा लोकशाहीतील नियम असला तरी बहुमत म्हणजे केवळ हुकूमशाही नसून विरोधकांना घेऊन चालण्याचे भान ठेवणारी जबाबदार तरतूद असते. सरकारच्या धोरणांचा प्रत्यक्ष परिणाम काय आहे हे विरोधक सरकारला सतत सांगत राहतात आणि हीच त्यांची सर्वात महत्त्वाची भूमिका ठरते,कारण अखेरीस सरकार जनतेपुढेच उत्तरदायी असते.

सध्याचे अधिवेशन सुरू होऊन चार दिवस झाले आहेत आणि एस. आय. आर. वर चर्चा करण्यास सरकार तयार झाले आहे, याचे सर्वत्र स्वागत होत आहे. संसदीय नियमांनुसार विरोधक थेट एस. आय. आर. वर चर्चा करू शकत नाहीत, कारण निवडणूक आयोग ही स्वतंत्र व स्वायत्त संस्थाच आहे. मात्र निवडणूक व्यवस्थेवर चर्चा होऊ शकते, कारण भारतातील



निवडणूक सुधारणांचा विषय १९७४ पासून प्रलंबित आहे. त्यावर्षी जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनाच्या माध्यमातून देशभरात निवडणूक सुधारणांची मागणी झाली होती. जेपी यांची इच्छा होती की निवडणुका स्वस्त व्हाव्यात, जेणेकरून कोणताही सुजाण नागरिक निवडणूक लढवण्याची हिंमत करू शकेल.निवडणूक प्रचारासाठी भारत सरकारने एक स्वतंत्र निधी तयार करावा आणि सरकारी माध्यमांतून प्रचाराची सोय व्हावी, अशी त्यांची कल्पना होती. या आंदोलनादरम्यान जेपी यांनी न्यायमूर्ती व्ही.एम.तारकुंडे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती आणि निवडणूक निधीची कल्पना याच समितीने मांडली होती.तरकुंडे समितीने अनेक महत्त्वाच्या शिफारसी केल्या, पण त्या अमलात आल्या नाहीत. १९७५ मध्ये देशात आणीबाणी लागू झाली आणि १९७७ मध्ये आणीबाणी उठल्यानंतर झालेल्या निवडणुकीत इंदिरा गांधींचा पराभव झाला.जेपी यांच्या मार्गदर्शनाखाली मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वात जनता पार्टीचे सरकार सत्तेत आले.मात्र या सरकारने तरकुंडे समितीच्या शिफारसी बाजूला ठेवून माजी मुख्य निवडणूक आयुक्त एस.एल.शकधर यांच्या अध्यक्षतेखाली नवीन आयोग नेमला. त्यांचा अहवाल तयार होईपर्यंत १९८० चे मध्यावधी लोकसभा निवडणुका जाहीर झाल्या आणि इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान झाल्या. त्यामुळे शकधर आयोगाचा अहवालही बाजूला पडला. हा सर्व इतिहास जरी बाजूला ठेवला तरी सध्याची परिस्थिती वेगळी आहे आणि आज एस.आय.आर.वर चर्चेला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. सरकार एस.आय.आर.वर चर्चा घेण्यास तयार झाले हे लोकशाही परंपरेशी सुसंगत आहे.

## दैनंदिनी

पुढील आठवड्यात मंगळवारी लोकसभेत एस.आय.आर.वर चर्चा होणार असून त्यानंतर राज्यसभेतही तीच चर्चा अपेक्षित आहे. एस. आय. आर.मुळे देशभरात मोठा वाद निर्माण झाला आहे आणि पुनरीक्षण प्रक्रियेत सहभागी बीएलओ संगणकांनी आत्महत्या केल्याच्या घटनांमुळे राजकीय वातावरण आणखीनच तापले आहे. सरकार यापूर्वी 'वंदे मातरम' राष्ट्रगीतावरही चर्चा व्हावी अशी भूमिका घेत आहे. ८ डिसेंबरला लोकसभेत राष्ट्रगीतावर चर्चा होईल आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी एस. आय.आर.वर सविस्तर चर्चा होणार आहे.याबाबतचे सामंजस्य लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांच्या हस्तक्षेपानंतर शक्य झाले. त्यांनी सर्व पक्षांच्या संसदीय नेत्यांना दोन वेळा बोलावून मार्ग काढला. प्रत्यक्षात लोकसभा चालवण्याची जबाबदारी अध्यक्षांवरही असते. सरकारमध्ये संसदीय कामकाज मंत्री असतात, पण जेव्हा सदनात एखाद्या मुद्यावर अडथळा तयार होतो तेव्हा तो तोडण्याची जबाबदारी अध्यक्षांनाच घ्यावी लागते, कारण ते संपूर्ण सदनाचे संरक्षक मानले जातात. त्यांचा संरक्षणाधिकार सर्व सदस्यांवर समान राहतो आणि म्हणूनच त्यांच्या हस्तक्षेपाला मोठे महत्त्व प्राप्त होते.सत्ता आणि विरोधक यांच्या तर्कांचा विचार करूनच अध्यक्षांनी या विषयावर सामंजस्य घडवून आणले. लोकशाहीची मूलभूत शिकवण अशी आहे की रस्त्यावर निर्माण होणाऱ्या असंतोषाची प्रतिध्वनी संसदेत उठली पाहिजे.त्यामुळे एस. आय.आर. वरील चर्चा सत्ता आणि विरोधक दोघांनाही समाधान देईल आणि संसदेला तिचे मूळ स्वरूप परत मिळवण्यास मदत करेल.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि गोंधळ



स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगरपालिका,महानगरपालिका)या खऱ्या अर्थाने लोकशाहीचा पाया आहेत, कारण त्या सत्तेचे विकेंद्रीकरण करतात,थेट जनतेला निर्णय प्रक्रियेत आणतात, तळागाळातील लोकांचा सहभाग वाढवतात आणि स्थानिक गरजांनुसार विकासाला चालना देतात,ज्यामुळे खालून वर लोकशाही मजबूत होते आणि नागरिकांना शासनाचा अनुभव मिळतो मात्र महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकातील गोंधळ, पैशांचा पाऊस व निवडणूक आयोगाची भूमिका बघता या निवडणुका नसून केवळ तमाशा चाललाय काय असे वाटायला लागले आहे.

महाराष्ट्रात २ डिसेंबरला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्या.यावेळी बऱ्याच ठिकाणी वाद आणि तक्रारी पाहायला मिळाल्या. कुठे मतदारांचं नावच यादीत सापडलं नाही, तर कुठे बोगस मतदारांना पकडल्याचा दावा करण्यात आला,तर कुठे आमदार महोदय खुद्द मतदान कक्षात महिलेला कुठलं बटण दाबायचं,हे सांगत होते.तर कुठे उभे असलेले उमेदवार निवडणूक कक्षात जाऊन गोंधळ घालत होते.

महाराष्ट्रातील नगरपालिका निवडणुका मतदानाच्या दिवशी पैसे वाटपाच्या अनेक घटनांमुळे गाजल्या. राज्यभरात ठिकठिकाणी पैसे वाटपाचे प्रकार कॅमेऱ्यात कैद झाले. चंद्रपूरच्या राजुरात भाजपचे नेते अमोल जिल्हावार यांच्या हातात पाचशेच्या नोटांचे बंडल दिसल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा नगरपरिषदेच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवारांच्या नातेवाईकांकडून पैसे वाटप केल्याचा आरोप झाला. खामगाव येथे ५० हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली, तर धुळ्याच्या शिंदेखेडा येथेही ५० हजार रुपये पकडण्यात आले. याशिवाय, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही पैसे वाटपाचा आरोप ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते वैभव नाईक यांनी केला. मालवणमध्ये सभेसाठी येताना शिंदेंनी दोन जड बॅगा आणल्या, ज्यात पैसे असल्याचा नाईकांचा दावा होता. शिंदेंच्या शिवसेनेने मात्र त्यात कपडे असल्याचे स्पष्ट केले. एकूणच, या निवडणुकांमध्ये पैशांचा वापर मोठ्या प्रमाणावर झाल्याचे चित्र समोर आले आहे.

नगरपालिका निवडणुकीत पैशांचा महापूर येणार अशी चर्चा सुरुवातीपासूनच रंगली होती. दररोज मतदारांना मोठ्या प्रमाणात लक्ष्मी दर्शन होत असल्याच्या चर्चाही सर्वत्र होत्याच. विविध प्रभागांमध्ये दररोज जेवणाच्या पार्टी, पैशांचे वाटप, भेट वस्तूंचे वाटप सुरू असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. काही उमेदवारांनी मतदानाच्या आदल्या रात्री मतदारांना पैसे वाटपाचे नियोजन केले होते. मात्र पोलिसांची यावर करडी नजर होती. या निवडणुकीत कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी पोलिसांनी काटेकोर बंदोबस्त केला होता.दरम्यान भंडाऱ्यात मतदारांना लक्ष्मी दर्शन घडवणाऱ्या सात जणांना रंगेहात पकडून त्यांच्यावर अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली.

### निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर अनेक प्रश्न

स्थानिक निवडणुकीत निवडणूक आयोगाची भूमिकेवर देखील प्रश्न उपस्थित होत असून आयोग संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. २४६ नगरपालिका आणि ४२ नगर पंचायतींच्या निवडणुकांसाठी २ डिसेंबरला मतदान झाल्यावर ३ तारखेला मतमोजणी होणार होती. आता न्यायालयाचे कारण देत १२ जिल्ह्यांत २० डिसेंबरला मतदान आणि २१ डिसेंबरला निकाल लागतील. निवडणूक आयोगाने हा ठरवून घोळ घातल्याचा गंभीर आरोप आयोगावर होत आहे.

राज्यातील नगरपालिका नगरविकास खात्याच्या अंतर्गत येतात. तेव्हा काही निवडणुका ऐन वेळी पुढे ढकलण्याचा घोळ घालण्यामागे नगरविकास खात्याची काही भूमिका आहे का? असा सवालही अनेकांनी उपस्थित केला. राज्य निवडणूक आयोगाने प्रचाराची सांगता होत असताना व मतदानाची तयारी सुरू असताना निवडणुका पुढे ढकलल्या जाव्यात, हे संशयास्पद आहे.मराठवाडा, विदर्भ,नाशिक, पुणे भागातील महत्त्वाच्या नगरपालिका आणि नगर पंचायती यात आहेत.

या सर्व प्रकारात सरकार व प्रशासनाची भूमिका देखील संशययाची आहे. सत्ताधारी पक्ष म्हणेल तीच दिशा खरी..असा प्रकार स्थानिक निवडणुकात दिसून आला. सरकारने प्रभाग रचनेचा घोळ घालून निवडणुका लांबणीवर नेल्या. राज्यातील काही नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुका मतदानाच्या एक दिवस आधीच पुढे ढकलण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला. आयोगाच्या या भूमिकेशी राज्य शासन असहमत असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.मात्र विरोधी पक्ष सरकारवर तोंडसुख घेत आहे.

एकंदरीत काय तर स्थानिक शासन हे लोकशाहीचे प्राथमिक केंद्र आहे, जिथे लोकांसाठी, लोकांद्वारे या लोकशाही तत्त्वांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते.मात्र आज स्थानिक शासन कमकुवत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्थानिक शासन कमकुवत करू नये कारण ते लोकशाहीचा पाया आहेत. नागरिकांना निर्णय प्रक्रियेत थेट सहभागी करतात,आणि शाळा, आरोग्य, पाणी, स्वच्छता यांसारख्या मूलभूत गरजांची पूर्तता करतात; त्यांना पुरेसे अधिकार, निधी आणि संसाधने न दिल्यास किंवा निवडणुका पुढे ढकलल्यास ते कमकुवत होतात आणि त्याचा थेट परिणाम जनतेच्या जीवनावर होतो, ज्यामुळे विकासाचे चक्र थांबते व हुकूमशाही प्रवृत्ती वाढतात, म्हणून त्यांना सक्षम करणे आवश्यक आहे.

■ प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल

## आयटी पार्क बेळगावला कधी?

कर्नाटकची राजधानी बेंगळूरुनंतर बेळगाव जिल्हा सर्वात मोठा जिल्हा म्हणून ओळखला जातो. उपराजधानी म्हणून देखील संबोधले जाते पण येथील आयटी हबचे केवळ दिवास्वप्नचं ठरले आहे.उद्योग आणि माहिती तंत्रज्ञानाच्या जगात बेळगाव शहराला इंडस्ट्रीयल हबचे केवळ दिवास्वप्नचं उरले आहे.बेळगाव जिल्ह्याने आयटी आणि औद्योगिक क्षेत्रात अद्याप अपेक्षित विकासाची नोंद केली नसल्याचे समोर येते आहे. रोजगार निर्मितीचे प्रमुख केंद्र असून देखील राजकीय इच्छाशक्तीअभावी बेळगावला आयटी पार्कपासून दुर रहावे लागले आहे. राजकीयदृष्या सक्षम असलेला जिल्हा असला तरी आयटी आणि औद्योगिक क्षेत्रात मागे असल्याने येथील अभियांत्रिकी, आयटी, फार्मसीसह व्यावसायिक शिक्षण घेतलेले तरुण रोजगारासाठी बेंगळूरु, हैद्राबाद, मुंबई, पुणे यासह विदेशात जाण्यास प्राधान्य देत आहेत त्यामुळे साहजिकच स्थानिक अर्थ व्यवस्थेला खीळ बसत आहे. बेळगाव जिल्ह्यात आयटी हबसाठी पोषक वातावरण आहे मात्र लघू आणि मध्यम उद्योगांना चालना देणे गरजेचे आहे.जिल्ह्यातील खासदार, आमदारांनी मतभेद बाजूला सारुन बेळगावला उत्तर कर्नाटकातील प्रमुख रोजगार निर्मिती केंद्र म्हणून पुढे आणण्यासाठी अधिवेशनात आवाज उठवणे अपेक्षित आहे.

■ राजू जाधव,मांगूर

## वाचकांचा पत्रव्यवहार

### साधूंमध्ये संधी?

तपोवन म्हणजे साधू-संत, ऋषी-मुनी तपश्चर्या करतात ते शांत, पवित्र, निसर्गरम्य स्थळ. नाशिकमध्ये 'तपोवन' हा एक ऐतिहासिक व पौराणिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा परिसर आहे. सिंहस्थ कुंभ मेळा तयारीसाठी येथे साधुग्राम किंवा आणखीन काही साधू-संतांच्या सेवे करिता तयार करण्यात येणार आहे.तपोवन भागात तकडी झाडांची दाटी असल्यामुळे, त्या जागेवर साधूग्रामसाठी सोयी सुविधा करणे नैसर्गिकदृष्ट्या कठीण आहे. भगवान राम, सीता आणि लक्ष्मण यांनी या तपोवनात वास्तव्य केले अशी मान्यता आहे.इथेच लक्ष्मणाने शूर्पणखेचे नाक-कान कापले ही कथा अतिशय प्रसिद्ध आहे.याच परिसरात रामकुंड, पर्णकुटी, पवित्र झरे, मंदिरे, आश्रम आहेत. संपूर्ण भाग हरित, जंगलासारखा आणि शांततेचा मानला जातो.मग ह्या पौराणिक पार्श्वभूमीवर कुऱ्हाड चालवून शांतता का बरी भंग करण्यात येत आहे? त्याच प्रमाणे हे पण



निश्चित आहे की, या निर्णयाला पर्यावरणीय, सामाजिक व नागरी संवेदनशीलतेपासून मोठा विरोध होत आहे.होणारच कारण,तपोवन किंवा आणखीन कोणतेही वने ही संरक्षित आणि पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून प्रतिबंधित आणि जवळपासच्या शहरांच्या प्राणवायूच्याकरिता फुफ्फुसे असतात.पवित्र गोदावरीचा तट मोठा आहे त्याचाही विचार करून साधूंची सोय होऊ शकते नव्हे काय? प्रभू रामचंद्र तर याच वनात होते तर मग प्रभु रामांच्या पदस्पर्शाने पावन झालेले आणि ऋषी मुनींच्या वास्तव्याने पवित्र झालेल्या ह्या पौराणिक तपोवनावर कुऱ्हाड चालवणार? की साधूंचे नाव आणि नंतर आपलेच गाव असा प्रकार करून संधी साधूपणा तर होणार नाही ना? असा प्रश्न निर्माण होत आहे.

■ दत्तप्रसाद शिरोडकर

## संकटातील संधीसाधूपणा

गेल्या २-३ दिवसांत इंडिगो एअरलाईन्सच्या अचानक उड्डाण रद्दीकरणांमुळे हजारो प्रवासी अडचणीत सापडले. प्रवासाची पूर्वतयारी, वेळेचे नियोजन आणि आर्थिक भार या सगळ्यांवर विपरीत परिणाम झाला. मात्र या संपूर्ण गोंधळात सर्वात विचलित करणारी गोष्ट म्हणजे इतर एअरलाईन्सनी दाखवलेला संधीसाधूपणा. इंडिगोची परिस्थिती बिकट होताच इतर कंपन्यांनी आपल्या तिकिटांचे दर अक्षरशः दुप्पटतिप्पट केले.




डायनॅमिक प्राइसिंग हे आधुनिक हवाई प्रवासाचे वैशिष्ट्य असले तरी अशा संकटात त्याचा अतिरेक करणे हे केवळ व्यावसायिक नव्हे, तर नैतिकतेच्या कसोटीवरही चुकीचे ठरते.प्रवासी आधीच अडकलेले असताना त्यांच्याकडून जास्तीत जास्त नफा कमावण्याचा प्रयत्न हा उद्योगाच्या प्रतिष्ठेलाही धक्का देणारा आहे.अशा परिस्थितीत एअरलाईन्सनी मानवी दृष्टिकोन ठेवणे अपेक्षित असते.

सरकार किंमतींवर थेट नियंत्रण ठेवत नसले, तरी अशा विशेष प्रसंगी तात्पुरता 'फेअर कॅप' लागू करणे किंवा डीजीसीए मार्फत इतर एअरलाईन्सना सुसंगत मार्गदर्शक सूचना देणे आवश्यक आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेप्रमाणेच त्यांची आर्थिक सुरक्षितताही तितकीच महत्त्वाची आहे. या संपूर्ण प्रसंगातून स्पष्ट होते की हवाई प्रवासातील पारदर्शकता, दरांची स्थिरता आणि ग्राहकहिताची बांधिलकी ही सरकार आणि एअरलाईन्सकडून केवळ शब्दांत नव्हे तर कृतीतही दिसणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रवाशांच्या प्रत्येक तिकिटामागे त्यांचा वेळ, पैसा आणि अपेक्षांची गुंतवणूक दडलेली असते. त्या गुंतवणुकीला तडा जाऊ नये यासाठी संकट काळात हवाई वाहतूक उद्योगाने अधिक संवेदनशील आणि जबाबदार वर्तन करणे अत्यावश्यक आहे. संकटाच्या काळात दाखवलेली संवेदनशीलता उद्योगाप्रती दीर्घकालीन विश्वासाची वीट ठरते, आणि जिथे ग्राहकांचा विश्वास मजबूत असतो तिथे नफ्याची वाढ आपोआपच होते.

■ अनिकेत शेटे

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**सोमवार, ता.८.१२.२०२५,** विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५२, शालिवहन शके १९४७, विश्वावसुनाम संवत्सरे दक्षिणायणे, हेमंत ऋतो, मार्गशीर्ष मासे, कृष्ण पक्षे, चतुर्थी तिथी, १६.०४ नंतर पंचमी तिथी पुष्य नक्षत्र २६.५३ नंतर आश्लेषा नक्षत्र, कर्करास, ब्रह्मयोग १७.०२ नंतर ऐंद्रयोग, बालव करण, १६.०४ नंतर कौलव करण २७.११ पर्यंत, दिनमान ११.०२, सुर्योदय ६.५४, सुर्यास्त १७.५३(कोल्हापूर) राहूकाळ सकाळी ७.३० ते ९, मध्यम दिवस दु.४ पर्यंत नंतर उत्तम दिवस, धान्य कापणी, संग्रह व्यापार, नविन धान्य खाणे, सर्व दिवस सोने खरेदी, घबाड १६.०४ पर्यंत.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष-** थोड्याशा मानसिक ताणावातदेखील आरोग्य चांगले राहील.गुंतवणुकीचा फायदा होण्याची पूर्ण शक्यता आहे. आयुष्याबद्दलचा दृष्टीकोन स्पष्ट आणि चोख असू द्या.

**वृषभ-** आपला मूड बदलण्यासाठी एखाद्या सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी व्हा. आज घरातून बाहेर जाताना मोठ्यांचा आशीर्वाद घेऊन निघा यामुळे तुम्हाला धन लाभ होऊ शकतो.

**मिथून-** तुमचे मित्र तुम्हाला पाठिंबा देणारे भेटतील, परंतु बोलताना सांभाळून बोला.क्रिएटिव्ह कामामध्ये स्वत:ला गुंतवा. रिकाम्या वेळेचा योग्य वापर करणे शिकावे लागेल.

**कर्क-**आजच्या दिवशी आपल्या खर्चावर नियंत्रण मिळवा, चैनीसाठी पैशांची उधळपट्टी होणार नाही याची काळजी घ्या. घरातील कामे पूर्ण करण्यासाठी मुलं तुम्हाला मदत करतील.

**सिंह-** कार्यालयीन काम फत्ते होईल कारण सहकारी आणि वरिष्ठ दोघांचेही उत्तम शंभर टक्के सहकार्य तुम्हाला मिळेल. अध्यात्मिक गुरु अथवा वडीलधाऱ्यांकडून मार्गदर्शन लाभेल.

**कन्या-** आजच्या दिवशी आपल्या कुठल्या ही जवळच्या लोकांचा सल्ला मिळू शकतो.ज्यामुळे आर्थिक लाभ ही मिळण्याची शक्यता आहे.

**तुळ-** संयम बाळगा,आपले निरंतर प्रयत्न आणि समजून घेण्यामुळे आपणास हमखास यशप्राप्ती होणार आहे. जर तुम्ही विवाहित आहेत तर आपल्या मुलांची विशेष काळजी घ्या.

**वृश्चिक -** कामकाजाच्या ठिकाणी होणाऱ्या बदलांमुळे तुम्हाला फायदा होईल. अडचणी आल्या की चपळाईने काम करण्याची तुमची क्षमता तुम्हाला मान्यता मिळवून देईल.

**धनु-** त्रस्त आणि व्यस्त असे कामाचे वेळापत्रक तुम्हाला शीघ्रकोपी बनवेल. ज्या लोकांनी कुणाकडून उधार घेतलेले आहे त्यांना आज कुठल्या ही परिस्थितीत उधारी द्यावी लागेल.

**मकर-** तुम्ही जर अधिक उदारपणे वागत असाल तर तुमच्या जवळची व्यक्ती तुमचा गैरफायदा घेण्याची शक्यता आहे. तुमच्या अपेक्षेप्रमाणे लाभ होण्याची शक्यता कमी आहे.

**कुंभ-** यश मिळविण्यासाठी वेळकाळ पाहून तुमच्या संकल्पनांमध्ये बदल करा.त्यामुळे तुमचा दृष्टिकोन विस्तारेल. तुमचे क्षितीज व्यापक बनेल.

**मीन-** दिवसाच्या उत्तरार्धात आर्थिक स्थिती सुधारेल. परदेशस्थ नातेवाईकांकडून मिळालेल्या भेटवस्तूमुळे तुम्हाला आनंद मिळेल. आजचा दिवस आपल्यासाठी उत्तम असेल.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अ‍ॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई-दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री.दि.पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# वाढत्या चोऱ्या रोखा,अन्यथा बदली करून घ्या

## आम.शशिकला जोल्ले यांचा निपाणी पोलीस अधिकाऱ्यांना दम

निपाणी,ता.७(प्रतिनिधी)–

**निपाणी शहर व उपनगरात चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत ही निंदनीय बाब असून या चोऱ्या रोखण्यासाठी ठोस पावले उचला,अन्यथा कामे जमत नसतील तर बदली करून घ्या, असा सज्जड दम आम.सौ.शशिकला जोल्ले यांनी निपाणी पोलीस अधिकाऱ्यांना दिला. वाढत्या चोरीच्या पार्श्वभूमीवर येथील भाजप कार्यालयात आम.जोल्ले यांनी पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेऊन चांगलीच खरडपट्टी केली.**



निपाणीः येथील भाजप कार्यालयात पोलीस अधिकाऱ्यांसोबत बैठकीत बोलताना आम.शशिकला जोल्ले,सोबत सीपीआय बी.एस.तळवार यांच्यासह इतर पोलीस अधिकारी.

आम.जोल्ले पुढे म्हणाल्या, शहरात दिवसाढवळ्या चोऱ्या होत आहेत.त्यामुळे पोलीस प्रशासन नेमके काय करत आहे, असा प्रश्न नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे सुरू नसून त्या शोभेच्या वस्तू बनल्या आहेत.ते सुरू करण्यासाठी पोलीस व पालिकेमध्ये समन्वय साधून कार्यान्वीत करण्यात यावेत.सध्या शहरात पार्किंगची व्यवस्था सुरळीत नसून मटका, गांजा यामुळे परिस्थिती अस्ताव्यस्त झाली आहे. त्यामुळे या गोष्टींकडे गांभीर्याने लक्ष देऊन ठोस उपाययोजना पोलीस प्रशासनाने कराव्यात. ८पासून अधिवेशन काळात पोलीस बंदोबस्तासाठी जाणार आहेत.

त्यामुळे शहरात नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होणार आहे.गरज भासल्यास पुढील काळात आणखीन पोलीस बळ वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत.सध्या वाढत्या चोऱ्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.त्यामुळे पुढील काळामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस प्रशासनाने कर्तव्यात कोणतीही कसूर न ठेवता काम करण्याच्या सुचना त्यांनी केल्या.बैठकीत पोलिसांनी चोरीच्या घटना रोखण्याच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना करण्याची ग्वाही दिली.

बैठकीस सीपीआय बी.एस.तळवार, शहर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक शिवानंद कारजोळ, ग्रामीणचे शिवराज नाईकवाडी, रमेश पोवार, हालशुगर संचालक भाटले, राजू गुंदेशा, महालिंग कोठीवाले, सुनील पाटील, बंडा घोरपडे, प्रशांत केस्ती, भाजप शहराध्यक्ष सुरज खवरे, महेश सूर्यवंशी, विजय टवळे, सागर मिरजे, रवी इंगवले, अभी कासार यांच्यासह भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## बुद्धीराज माने याची निवड

मुरगूड,ता.७.(प्रतिनिधी)–

**येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचा खेळाडू बुद्धीराज विजय माने (मुरगूड) याची शिवाजी विद्यापीठाच्या व्हॉलीबॉल संघात निवड झाली आहे. नांदेड येथे होणाऱ्या क्रीडा महोत्सव स्पर्धेत तो शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे.**



राणाप्रताप व्हॉलीबॉल क्लबमध्ये सराव करणाऱ्या बुद्धीराज माने यास व्हॉलीबॉल संघ व्यवस्थापक व उप.प्रा.डॉ.शिवाजी पोवार, प्रशिक्षक संभाजी मांगले, श्रावण कळांद्रे यांचे मार्गदर्शन लाभले.तर जय शिवराय एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी माजी खास.संजय मंडलिक,अध्यक्ष गजाननराव गंगापुरे,विरेंद्र मंडलिक, प्रा.डॉ.शिवाजी होडगे व वडील विजय माने यांचे प्रोत्साहन लाभले.



आदमापूर येथे उड्डाणपुलावर सुरू असलेले रस्त्याचे डांबरीकरण.

# आदमापूरात उड्डाण पुलावरील रस्त्याच्या डांबरीकरणास सुरूवात

## दै.महासत्ताच्या वृत्ताची दखल; प्रवासी, वाहतूकदारांमध्ये समाधान

निढोरी,ता.७(वार्ताहर)–

**आदमापुर (ता.भुदरगड) येथील पश्चिम महाराष्ट्रातील प्रसिद्ध देवस्थान संत सद्‌गुरू बाळुमामा देवालयाजवळील उड्डाण पुलावरील खराब रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामकाज वेगात सुरू आहे.सर्वप्रथम दैनिक महासत्ताच्या वारंवार वृत्ताने प्रशासन खडबडून जागे झाले आहे.**

आदमापुर उड्डाणपूलाच्या रस्त्याची चाळण! या शिर्षकाखाली प्रसिद्ध करण्यात आलेल्या दै.महासत्ताच्या वृत्ताची दखल कोल्हापूर जिल्ह्यातील सा. बां. खात्याने तात्काळ घेऊन काम जलदगतीने पूर्ण करण्याचे आदेश संबंधित ठेकेदार यांना दिलेले आहेत.त्यामुळे प्रवासी, वाहतूक धारकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.तर सोशल मीडियावर दैनिक महासत्ताचे अभिनंदन केले आहे.आदमापुर उड्डाण पुल असून अडचण नसून खोळंबा अशी मुख्य परिस्थिती आहे.कारण ही ज्या उध्दिष्टाकरीता हा ब्रीज बांधण्यात आला आहे. खरा मात्र वाहतूक कोंडीची समस्या जैसे थे राहिली आहे, उड्डाण पुलाच्या खालील रस्ताही अतिशय अरुंद आणि सांडपाणी निचरा योग्य पध्दतीने होत नसल्याने समस्या निर्माण झाली आहे. मंदिर प्रशासनाने केलेला आराखडा तात्काळ अंमलात आणून उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.



## कोगनोळी येथील घोरपडे मळ्यात दत्त जयंती उत्साहात साजरी

कोगनोळी,ता.७(प्रतिनिधी)–

**येथील पुणे–बेंगलोर राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या घोरपडे मळ्यात श्री दत्त जयंती सोहळा भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

सकाळी सचिन घोरपडे यांच्या हस्ते श्री दत्त मूर्तीस अभिषेक अर्पण करुन विधीवत पूजन करण्यात आले. मंत्रोच्चारांनी संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. सायंकाळी ५.३० वाजता भाविकांच्या उपस्थितीत दत्त जन्मोत्सव सोहळा झाला. दिगंबरा... दिगंबरा... च्या जयघोषात भाविकांनी पुष्पवृष्टी केली. महिलांनी पाळणा गीत गायन केले तर कोगनोळीतील भजनी मंडळाच्या गायक कलाकारांनी भजन सादर केले.यावेळी बळवंत घोरपडे परिवारातर्फे भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एकनाथ घोरपडे, किरण कागले, चंदन डवरी, अमोल कागले, राहुल पाटील, महेश कागले, राहुल मोरडे, पांडुरंग कागले, दादू किसके, दिगंबर कागले, किरण चव्हाण, शितल गुरव आदींनी परिश्रम घेतले.

# पिकांसाठी जैविक खतांचा वापर करावा

## अमोल पाटील; जत्राट येथे ऊस पीक चर्चासत्र संपन्न

निपाणी,ता.७(प्रतिनिधी)–

**सध्या शेत जमिनीमध्ये रासायनिक खतांचा अतिवापर तसेच खतांच्या किंमतीत झालेली वाढ यामुळे शेतकऱ्यांना शेती व्यवसायामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागत असून जमिनीचा पोत खराब होत आहे.यामुळे शेणखत व जैविक खताचा वापर करून आपण शेतीत पिके घेतली तर आपले आरोग्य निरोगी व चांगले राखू शकतो, असे मत पाटील बायोटेकचे जनरल मॅनेजर अमोल पाटील यांनी व्यक्त केले.**

एस. एम. चेंडके अॅग्रो सर्व्हिसेस व पाटील बायोटेक प्रा. ली.यांच्या संयुक्त विद्यमाने ऊस पीक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात



जत्राटः येथील आयोजित ऊस पीक चर्चासत्र कार्यक्रमात दिपप्रज्वलन करताना अमोल पाटील,प्रविणभाई शाह,अतुल पाटील,चेतन पाटील,शिवसागर पाटील व इतर प्रमुख मान्यवर.

मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

पाटील पुढे म्हणाले, सध्याच्या मजुरांच्या टंचाईमुळे शेती व्यवसाय करणे खूप अवघड होत आहे यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक शेती करताना नवनवीन तंत्रज्ञानाचा व अवजारांचा योग्य वापर करावा.यावेळी उद्योजक प्रवीण शहा, पाटील बायोटेकचे जनरल मॅनेजर अमोल पाटील, चेंडके अॅग्रो सर्व्हिसेसचे शिवानंद चेंडके, अतुल पाटील, चेतन पाटील यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी गावकामगार शिवसागर पाटील, रमेश भिवशे, विनय पाटील, गिरीश खोत, काकासो पाटील, संजय जबडे, विजय जबडे,राघवेंद्र कुलकर्णी, लक्ष्मीकांत खोत, सचिन संकपाळ, निरंजन कमते, संजय पाटील, दगडू मुजावर, बाबासाहेब मेंस्त्री, राघवेंद्र कांबळे यांच्यासह जत्राट, श्रीपेवाडी, नांगनूर, भिवशी, पडलीहाळ, लखनापूर, अकोळ, ममदापूर, खडकलाट, रामपूर, पट्टणकुडी यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रास्ताविक करून सूत्रसंचालन निवास खोत यांनी केले तर आभार बाळकृष्ण चेंडके यांनी मानले.



कोगनोळी येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रतिमापूजनप्रसंगी ईश्वर कुंभार व प्रथमेश कुंभार शेजारी कुमार पाटील व अन्य मान्यवर.

## कोगनोळीत महापरिनिर्वाण दिन साजरा

कोगनोळी,ता.७(प्रतिनिधी)–

**येथील इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, आर्ट्स प्रि मिलिटरी कॉलेज व युवा सायन्स अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने सैनिकी शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थापक कुमार पाटील हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्रगतशील शेतकरी ईश्वर कुंभार हे उपस्थित होते.**

प्रारंभी ईशा कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.यावेळी प्रथमेश कुंभार यांची अग्नीवीरमध्ये निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी संस्थेच्या अध्यक्षा रेखा पाटील, प्राचार्य अनमोल पाटील, मुख्याध्यापिका कोमल पाटील यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. श्रावणी खानापूरे यांनी सूत्रसंचालन केले तर समीक्षा पाटील यांनी आभार मानले.

# पंचमसाली समाजाच्या आंदोलनात सहभागी व्हा

## बसव स्वामीजी

बेडकिहाळ,ता.७(वार्ताहर)–

**पंचमसाली समाजाचे १० डिसेंबर रोजी आंदोलन होणार असून यामध्ये सहभागी व्हावे,असे आवाहन बसव जयमृत्युंजय स्वामीजी यांनी केले.बेडकिहाळ येथील राजू हनबरट्टी यांच्या घरी स्वामीजी यांच्या उपस्थितीत पंचमसाली लिंगायत समाज बांधव बैठक आयोजित करण्यात आली होती.**



लिंगायत समाज बैठकीत बोलताना बसव जयमृत्युंजय स्वामीजी, बाजूला रावसाहेब हनबरट्टी, किरण पांगिरे व इतर मान्यवर.

स्वागत व प्रास्ताविक रमेश पाटील यांनी केले.पुढे बोलताना स्वामीजी म्हणाले, गेल्या वर्षी बेळगाव येथील अधिवेशनामध्ये पंचमसाली समाजाकडून २ अ आरक्षणाच्या मागणीसाठी निदर्शने करण्यात आली होती. पण समाजातील नागरिकांवर हल्ला झाला.याचा निषेध करण्यासाठी बुधवार १० डिसेंबर रोजी बेळगाव शहरातून मूक मोर्चा काढून आंदोलन करण्यात येणार आहे .१० डिसेंबर हा लिंगायत समाजावरील अत्याचार दिवस म्हणून पाळला जाईल.

शहरातील गांधी भवन येथून निषेध फेरी सुरू होणार असून सर्व समाज बांधवानी काळी रेबिन बांधून निषेध फेरीत निपाणी तालुका अध्यक्ष किरण पांगिरे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे,असे आवाहन स्वामीजीनी केले.यावेळी मलगौड पाटील,राजू हनबरट्टी, अनिल देशपांडे, राजू भिक्कनवर, रमेश हनबरट्टी,शिवराज चौगुले, अशोक आरगे, रावसाहेब हनबरट्टी, यांच्यासह भोज, सदलगा, गळतगा येथील समाजबांधव उपस्थित होते.आभार किरण पांगीरे यांनी मानले.

## मुरगूडमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

मुरगूड,ता.७(प्रतिनिधी)–

**विश्वरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिवसानिमित्त मुरगूडमध्ये अभिवादन करण्यात आलेयावेळी उपस्थितांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव केला.**

यानिमित्त मुरगुड येथील कॉ.फ्रान्सिस उर्फ बबन बारदेस्कर, सर्जेराव भाट, ओंकार पोतदार यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि गौतम बुद्धांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी भिकाजी कांबळे, मोहन कांबळे,माजी नगरसेवक अनिल कांबळे,दिलीप कांबळे,रमेश कांबळे,राहुल कांबळे,ओंकार कांबळे,अमर कांबळे,प्रवीण कांबळे,विजय कांबळे,विक्रम कांबळे,विशाल कांबळे,अमित भोसले उपस्थित होते.




## संकेश्वरातील मुशब्बरीन कडलगी हिचा राज्यपालांच्या हस्ते गौरव

संकेश्वर,ता.७(प्रतिनिधी)–

**संकेश्वरातील टेलर अमीन कडलगी यांची कन्या मुशब्बरीन हिने बेळगाव राणी चन्नम्मा विश्वविद्यालयाच्या इंग्रजी विषयात सुवर्णपदक पटकावले आहे. मुशब्बरीन कडलगी हिचा राज्यपाल थावरचंद गेहलोत यांच्या हस्ते सुवर्णपदक देऊन गौरव करण्यात आला.**

वडील अमीन कडलगी यांचा टेलर व्यवसाय,घरची परिस्थिती तशी बेताची असल्याने मुशब्बरीनला दहावी पर्यंतचे शिक्षण ऊर्दू माध्यमातून घ्यावे लागले.संकेश्वर कला–विज्ञान महाविद्यालयातून बी.ए.पदवी प्राप्त करुन ती बेळगाव राणी चन्नम्मा विश्वविद्यालयात इंग्रजी विषय घेऊन 'एम ए'करीत आहे. मुशब्बरीनने राणी चन्नम्मा विश्वविद्यालयात इंग्रजी विषयात सर्वाधिक ९०.२८ टक्के गुण मिळवून सुवर्णपदक पटकावले आहे. तिला संकेश्वरातील एस.एस.आर्टस महाविद्यालयाचे इंग्रजी विषय प्रमुख प्राध्यापिका एम.जी खडेद, प्रा.कुमार मराठे, आई शकीला, वडील अमीन यांचे प्रोत्साहन लाभले.

## श्रीपेवाडीत आज नाडी परीक्षण शिबीर-आनंदवारी सांगता सोहळा

निपाणी,ता.७(वार्ताहर)–

**आनंदवारी ग्रुप श्रीपेवाडी यांच्यावतीने सोमवार ता.८ रोजी नाडी परीक्षण शिबीर व आनंदवारी सांगता सोहळा संपन्न होणार आहे.**

यानिमित्त संपूर्ण भारतामध्ये प्रसिद्ध असणाऱ्या नाडी तज्ञ हभप मनीषाताई गुरव–तासगाव यांच्याकडून आरोग्य तपासणी होणार आहे.यामध्ये सोमवारी सकाळी १० ते ४ नाडीपरीक्षण व मार्गदर्शन तसेच सकाळी ११ ते ३ महाप्रसाद, सायंकाळी प्रवचन होणार आहे.तरी सदर कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## संकेश्वर पालिकेची शववाहिका नादुरूस्त

संकेश्वर,ता.७(प्रतिनिधी)–

**संकेश्वर पालिकेची शववाहिका हत्तरगी टाटा मोटर्स गॅरेजमध्ये सर्व्हिसिंग व दुरुस्तीसाठी दाखल करण्यात आली आहे.त्यामुळे शववाहिका दुरुस्त होऊन सेवेत दाखल होईपर्यंत एखादी व्यक्ती मरण पावली तर भाडोत्री वाहन बोलाविणे हाच पर्याय राहणार आहे.**

संकेश्वर पालिकेची सद्य उपलब्ध असणारी शववाहिका वारंवार दुरुस्तीला येत असल्याने पालिका सभेत सर्व सदस्यांनी नवीन छोट्या शववाहिकेचा प्रस्ताव ठेवला होता.सभेत नवीन शववाहिका खरेदीला मंजुरी मिळालेली असली तरी या ना त्या कारणाने नवीन शववाहिका खरेदीचे कार्य लांबणीवर पडताना दिसत आहे.सध्या उपलब्ध असलेली शववाहिका गल्लीबोळात पोहचू शकत नसल्याने छोटी शववाहिका खरेदी करण्याचा सर्वांनुमते निर्णय घेण्यात आला आहे.संकेश्वर पालिकेतर्फे विनाशुल्क चालवली जाणारी शववाहिका दुरुस्तीला गेली तर गोरगरीब कष्टकरी शेतकरी सर्वसामान्य कुटुंबातील एखादी व्यक्ती मरण पावली तर पंचाईत होते.खासगी वाहन चालक स्मशानभूमीपर्यंत शव वाहून नेण्यासाठी ज्यादा भाडे आकारतात गोरगरिबांना ते परवडणारे नसते.त्यामुळे पालिकेने आणखी एक शववाहिकेची व्यवस्था करावी,अशी लोकांतून मागणी केली जात आहे.



मोहनलाल दोशी विद्यालयात राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिनानिमित्त प्रदूषण रोखण्यासाठी काढण्यात आलेली रॅली प्रसंगी विद्यार्थी.

## दोशी विद्यालयात नो व्हेईकल डे साजरा

निपाणी,ता.७(प्रतिनिधी)–

**अर्जुननगर येथील मोहनलाल दोशी विद्यालयात राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवसानिमित्त नो व्हेईकल डे साजरा करण्यात आला. यावेळी एनसीसी, स्काऊट गाईड, एअर फोर्स व विद्यार्थी यांनी बसवाननगर येथे पायी रॅली काढून त्यामध्ये विविध प्रदूषण रोखण्यासाठी घोषणा दिल्या.**

यावेळी मुख्याध्यापिका एस.एम.गोडबोले यांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखवून उद्‌घाटन केले.प्रारंभी यु.एम.सातपुते यांनी प्रास्ताविक केले. तर व्ही.के.परीट यांनी प्रदूषणाबाबत माहिती सांगितली.

याप्रसंगी शिक्षक प्रतिनिधी एस.एम.चौगुले,कर्मचारी प्रतिनिधी ए.आर.कोळी,ए.डी.लकमले, डी.बी.बेनाडे,एस.एल.मेंगाणे, एन.बी.पाटील, व्ही.व्ही.पाटील, ए.एच.आळवे यांच्यासह सर्व शिक्षक,कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# व्यापार संकुल उभारण्याचा संकल्प कौतुकास्पद

## डॉ.आनंद गोसावी; कुर येथे व्यापारी संकुलाचे भूमीपूजन

कुर,ता.७(वार्ताहर)–

**सहकार चळवळीमुळे आपल्या राज्याची प्रगती झाली असून सहकारी साखर कारखाने, सहकारी पतपुरवठा संस्था, शेतकरी संघ यामुळे राज्यातील अर्थकारणाला गती मिळाली आहे.**

भुदरगड तालुका शेतकरी सहकारी संघाने सहकार चळवळ अधिक बळकट करून गाव पातळीवर सहकारी संस्थांच्या माध्यमातून विविध प्रकारच्या सुविधा पुरविण्यासाठी भुदरगड तालुका शेतकरी संघाचा कुर येथे व्यापारी संकुल उभारण्याचा संकल्प कौतुकास्पद,असे प्रतिपादन पीठाधीश पुरातन प.पू.श्रीहरी डॉ.आनंद महाराज गोसावी यांनी केले.



कूर येथे भुदरगड तालुका शेतकरी संघाच्या व्यापारी संकुलाच्या भूमीपूजन प्रसंगी श्रीहरी डॉ.आनंद महाराज गोसावी सोबत मान्यवर.

भुदरगड तालुका शेतकरी सहकारी संघ लि. गारगोटी या संस्थेचे (कूर ता.भुदरगड) येथील व्यापारी संकुलाच्या भूमिपूजन प्रसंगी बोलत होते.प्रमुख उपस्थितीत चेअरमन बाळ देसाई, व्हा चेअरमन शामराव देसाई होते.चेअरमन प्रा बाळ देसाई म्हणाले,ग्रामीण भागातील जास्तीत जास्त आर्थिक व्यवहार भुदरगड तालुका शेतकरी सहकारी संघाच्या माध्यमातून व्हावेत व ग्रामीण भागातील नागरिकांना सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.स्वागत व प्रास्ताविक संघांचे संचालक प्रा.एच.आर.पाटील यांनी केले.

यावेळी कूरचे सरपंच मदन पाटील,मा.पं.स.सदस्य मदन देसाई, मा.सरपंच वसंतराव प्रभावळे, पी.एस.कांबळे,उपसरपंच संदिप हळदकर,बाजीराव राजिगरे, केरबा खाडे, आर.सी.पाटील, विजयकुमार भांदीगरे,मारुती पाटील,प्रा. एच. आर. पाटील,प्रा.विजय कोटकर,मानसिंग पाटील,नामदेव देसाई,प्रताप मेंगाने, शामराव इंदूलकर, बाजीराव देसाई, शहाजी देसाई,नारायण पाटील, अरुण बेलेकर,कॉ.सम्राट मोरे,बाबूराव देसाई,शंकर पाटील,अनिल तळकर, संग्राम सावंत, अशोक यादव, बजरंग सुतार, प्रकाश कांबळे,बचाराम गुरव, दत्तात्रय मांगोरे, संभाजी डेळेकर, संजय देसाई आदीं उपस्थिती होते. आभार प्रा.विजय कोटकर यांनी मानले.

## निधन वार्ता

### सलाऊद्दीन किल्लेदार

संकेश्वर.ता.७(प्रतिनिधी)–



येथील सलाऊद्दीन बाबालाल किल्लेदार (वय ६०) यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात आई, भाऊ, बहिण असा परिवार आहे.

### करेप्पा हेगडे

संकेश्वर.ता.७(प्रतिनिधी)–



येथील करेप्पा सिध्दप्पा हेगडे (वय ७५) यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले,सूना, दोन विवाहित मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### बाळाबाई पाटील

पट्टणकोडोली,ता.७(प्रतिनिधी)–



येथील आर.जी.मळ्यातील रहिवाशी श्रीमती बाळाबाई बाळगोंडा पाटील (वय १००) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

### मधुकर केसरकर

निपाणी,ता.७(प्रतिनिधी)–



श्रीपेवाडी (ता.निपाणी) येथील प्रतिष्ठित नागरिक मधुकर बाळगोंडा केसरकर (वय ६५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात भाऊ, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सोशल मिडिया प्रदेशाध्यक्षपदी ऋषीकेश पाटील

कोल्हापूर,ता.७ (प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सोशल मीडिया विभागाच्या प्रदेशाध्यक्षपदी ऋषीकेश सर्जेराव पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती संसदेचे विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी, काँग्रेस सोशल मीडियाच्या राष्ट्रीय प्रमुख सुप्रिया श्रीनेत, प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ तसेच आमदार सतेज पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार व शिफारशीनुसार मंजूर करण्यात आली आहे.**

सोशल मीडिया हा आजच्या राजकारणातील सर्वात प्रभावी घटक असून, पक्षाच्या विचारसरणीचा प्रसार, जनसंपर्क, जनजागृती आणि युवा वर्गाशी संवाद साधण्यामध्ये सोशल मीडिया विभागाची अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. या पार्श्वभूमीवर संघटनात्मक कामाचा दांडगा अनुभव, डिजिटल माध्यमातील प्रभुत्व आणि नव्या पिढीशी सखोल संवाद साधण्याच्या क्षमतेचा विचार करून ऋषीकेश पाटील यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

# ‘लोकायुक्त’चे सीपीआय सालीमठ यांचा कारमध्ये होरपळून मृत्यू

बेळगाव,ता.७ (प्रतिनिधी)–

**धारवाड–गदग सीमेवर हुबळी–कोप्पळ मार्गावर भरधाव कारची दुभाजकाला धडक बसून इंधन टाकीचा स्फोट झाल्याने कारला भीषण आग लागली.या अपघातात हावेरी येथील लोकायुक्त विभागाचे सीपीआय पंचाक्षरी सालीमठ (पी. व्ही. सालीमठ) यांचा कारमध्येच होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेची नोंद अन्नीगेरी (जि. धारवाड) पोलीस ठाण्यात झाली आहे.**



सालीमठ हे मूळचे मुरगोड (ता. सौंदत्ती) येथील रहिवासी असून ते सध्या हावेरी लोकायुक्त विभागात सेवेत होते.दरम्यान ते बेळगाव येथे शनिवारी न्यायालयाचे काम असल्याने कारने बेळगावकडे येत होते. दरम्यान त्यांची कार धारवाड–गदग सीमेवर हुबळी–कोप्पळ मार्गावर अन्नीगेरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत आली असता कारची दुभाजकाला धडक बसून कार विरुद्ध दिशेला जाऊन थांबली.दरम्यान याचवेळी कारच्या इंधन टाकीचा स्फोट होऊन कारने लगेच पेट घेतला. सालीमठ हे कारमध्येच अडकून पडल्याने या आगीत त्यांचा होरपळून मृत्यू झाला.

घटनास्थळी मुळगुंदचे सीपीआय संगमेश शिवयोगी, अन्नीगिरीचे सीपीआय रवी कपतणावर, उपनिरीक्षका उमादेवी यांनी भेट देऊन पाहणी केली. सालीमठ हे अत्यंत मनमिळावू व हळव्या स्वभावाचे कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून कार्यरत होते.त्यांची पोलीस खात्यात २५ वर्षे सेवा झाली आहे.ते लोकाभिमुख अधिकारी होते.त्यांच्या पश्चात आई –वडील, पत्नी, एक मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

## महिलेची आत्महत्या

सांगली,ता. ७ (प्रतिनिधी)–

**सांगलीतील वडर कॉलनीत राहणाऱ्या सुरेखा आशिष गुंजी (वय २७) या महिलेने राहत्या घरी ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नाही.याबाबत विश्रामबाग पोलिसात नोंद झाली आहे.**

सुरेखा गुंजी यानी गळफास घेतल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांचे दीर मोहन गुंजी यांनी सुरेखा यांना सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले.मात्र तत्पुर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता.वैद्यकीय अधिकारी डॉ. मानसी जाधव यांनी विश्रामबाग पोलिसांना याबाबत कळवले आहे.त्यानंतर पोलिसांनी सिव्हिलमध्ये येऊन पंचनामा केला.

# कॅनॉट पीक पॉईंटजवळ युवकाची आत्महत्या

महाबळेश्वर, ता,७ (वार्ताहर)–

**येथील प्रसिद्ध कॅनॉट पीक पॉईंट परिसरातील जंगलात युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना शनिवारी दुपारी उघडकीस आली. गणेश शंकर शिंदे (वय ४०, रा. साई निवास, कोळी आळी, महाबळेश्वर) असे मृताचे नाव आहे.**

गणेश शिंदे हे बाहेर जाऊन येतो असे सांगून घरातून निघून गेले होते. रात्रभर ते घरी न परतल्याने कुटुंबियांनी त्यांचा महाबळेश्वर शहर व परिसरात शोध घेतला, परंतु ते मिळून आले नाहीत. दुसऱ्या दिवशी,शनिवारी दुपारी १२ च्या सुमारास राजू शिंदे यांचा मुलगा संकेत याला गणेश शिंदे यांनी कॅनॉट पीक पॉईंट जवळ आत्महत्या केल्याचे समजले. यानंतर राजू शिंदे आणि त्यांचे मित्र सुनिल भाटीया, सुनिल ढेबे, सचिन ढेबे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.तेथे गणेश शिंदे हे एका जांभळीच्या झाडाला नायलॉनच्या दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले.घटनेची माहिती मिळताच महाबळेश्वर पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.राजू शंकर शिंदे (वय ४९, रा. रॉकडेल बंगला, महाबळेश्वर) यांनी महाबळेश्वर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## अलास्का–कॅनडा सीमेवर भूकंप

ओटावा,ता. ७ –

अलास्का आणि कॅनडा यांच्या सीमेजवळ भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. रिक्टर स्केलवर भूकंपाची तीव्रता ७.० नोंदवली गेली आहे. अलास्का आणि कॅनडाला दोन्ही बाजूंनी समुद्राने वेढलेले असल्यामुळे भूकंपानंतर सर्वांना त्सुनामीची भीती वाटत होती, मात्र अद्यापपर्यंत कोणतीही त्सुनामीचा इशारा देण्यात आलेला नाही.हा भूकंप अलास्का आणि कॅनडाच्या युकोन प्रदेशाच्या सीमेच्या जवळ जाणवला. भूकंपाची तीव्रता प्रचंड असली तरी कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. अमेरिकन भूवैज्ञानिक सर्वेक्षणानुसार भूकंप अलास्काच्या जूनो शहरापासून सुमारे २३० मैल (३७० किलोमीटर) उत्तर–पश्चिम आणि युकोनमधील व्हाइटहॉर्सपासून १५५ मैल (२५० किलोमीटर) अंतरावर झाला.युकोन हा डोंगराळ प्रदेश आहे, जिथे लोकसंख्या खूपच कमी आहे. भूकंपाचे धक्के बसताच लोकांच्या घरांमधील कपाटांमधून आणि भिंतींवरून वस्तू खाली पडू लागल्या. लोक घाबरून तत्काळ घराबाहेर पडले.

# टीईटी अटीत शिथिलता देणारे कर्नाटक ठरले देशातील पहिले राज्य

बेंगळुरू,ता. ७ (प्रतिनिधी)–

**प्राथमिक शाळांमधील पदवीधर शिक्षकांसाठी कर्नाटक राज्य सरकारने अखेर दीर्घकाळ प्रलंबित असलेली मागणी मंजूर केली आहे.पहिली ते पाचवीच्या चौकटीत अडकलेल्या शिक्षकांना आता सहावी आणि सातवीतही अध्यापन करता येणार आहे. यासाठी टीईटी प्रमाणपात्रतेच्या अनिवार्य अटीत शिथिलता देण्यात आली आहे.**

मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) प्रमाणपत्राच्या अनिवार्य अटीत सवलत देण्यास मंजुरी देण्यात आली. पदवी आणि संबंधित विषयांचा अनुभव असलेल्या पहिली ते पाचवीच्या शिक्षकांना सहावी व सातवीच्या अध्यापनासाठी पात्र मानण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नियमांमध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीस मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्याने राज्यातील जवळपास दीड लाख पदवीधर प्राथमिक शिक्षकांना याचा थेट फायदा होणार आहे.टीईटी पास असूनही केवळ प्रशासनाच्या जुन्या नियमांमुळे सहावी आणि सातवीत शिकवण्याची संधी नाकारली गेली होती. अनेकांनी अन्याय झाल्याचे सांगत आंदोलन, निवेदने आणि विधिमंडळातही पाठपुरावा केला होता

पदवी आणि अनुभव असूनही प्राथमिक शिक्षक या श्रेणीतच गटबद्ध केल्याने पदोन्नती आणि वेतनवाढीचे दरवाजे बंद होते. आता सरकारच्या निर्णयामुळे या शिक्षकांना वरच्या वर्गात अध्यापनाची मान्यता मिळाली आहे. पुढील टप्प्यात आर्थिक लाभांच्या दुरुस्तीलाही मंजुरी मिळेल, अशी शिक्षकांची अपेक्षा आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर टीईटी अनिवार्य करण्यात आली असली तरी, निवृत्तीच्या उंबरठ्यावर असणाऱ्यांना काही अंशतः सूट देऊन बाकी सर्वांनी टीईटी मिळवणे आवश्यक आहे, असा न्यायालयाचा आदेश होता.या पार्श्वभूमीवर टीईटी अटीत शिथिलता देणारे कर्नाटक हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. अनेक वर्षांचा प्रशासकीय गोंधळ आणि नियमांच्या जंजाळातून बाहेर पडल्याने शिक्षकवर्गात समाधानाचे वातावरण आहे.

## राज्यात २७० लाख मे.टन ऊस गाळप

पुणे, ता.७ –

राज्यातील ऊस गाळप हंगामाने जोर पकडला असून सद्यस्थितीत आतापर्यंत सुमारे २७० लाख मेट्रिक टनाइतके ऊस गाळप पूर्ण झालेले आहे, तर ८.०५ टक्के निव्वळ साखर उताऱ्यानुसार २१ लाख ७५ हजार टनाइतके साखर उत्पादन हाती आले आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा उसाचे दुप्पट गाळप झाल्याचे साखर आयुक्तालयाच्या ताज्या अहवालात नमूद आहे. राज्यातील ऊस गाळप हंगाम १ नोव्हेंबरपासून सुरू झाला आहे. मात्र, दीर्घकाळ लांबलेल्या पावसामुळे पहिला पंधरवडा जेमतेम कारखान्यांकडूनच ऊस गाळप सुरू राहिले. राज्यात आतापर्यंत १०२ खासगी व १०१ सहकारी साखर कारखान्यांना ऑनलाईनद्वारे ऊस गाळप परवाने वितरित केले आहेत. सद्यस्थितीत ऊस गाळप परवान्यासाठी शासनाने निश्चित केलेली रक्कम न भरणे, अपूर्ण प्रस्ताव व अन्य मुद्द?यांमुळे केवळ १० कारखान्यांना गाळप परवाने देणे बाकी आहे.

### जाहीर नोटीसीस हरकतवजा उत्तर

आमचे अशिल श्री. इरगोंडा शिवगोंडा पाटील, रा. ८/१२७९, सहकार नगर, सांगली रोड, इचलकरंजी ता.हातकणंगले जि.कोल्हापूर यांनी दिले माहितीवरुन दाखविले कागदपत्राआधारे, त्यांचेकरीता ॲड. राहुल अशोक शिरगुरे रा. इचलकरंजी यांनी दै. महासत्ता ता.०३/१२/२०२५ इ. रोजीचे दै. महासत्ता पान नं.७ वर प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसीस हरकतवजा उत्तर देणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन -

जिल्हा व तुकडी कोल्हापूर, पोट तुकडी व तालुका हातकणंगले, मा. सह दुय्यम निबंधकसो, वर्ग - २, इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेतील इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.नं. १९८/ ४ क्षेत्र हे.०.३०.३३३ आर, रि.स.नं. १९७/१ क्षेत्र हे.०.२२.३३३ आर, रि.स.नं. १९७/२ अ क्षेत्र हे.०.२४.६६६ आर, रि.स.नं. ६५१/१ क्षेत्र हे ०.२५० आर, रि.स.नं.६५१/२ क्षेत्र हे.०.८३ आर, रि.स.नं. ६५२ क्षेत्र हे ०.०४.४९० आर, रि.स.नं. ६५४ क्षेत्र हे. ०.३१.०० आर, रि.स.नं. ६५५/२ क्षेत्र हे.०.२४.५ आर, रि.स.नं. ६५५ / ३ क्षेत्र हे ०.७५० आर, रि.स.नं. ६५५/४ क्षेत्र हे ०.२५० आर, रि.स.नं.६५३/ अ क्षेत्र हे ०.३.४८० आरच्या मिळकती व त्यातील तद्ंगभुत वस्तुसह व इजमेंटरी हक्कासह सर्व. सदरच्या मिळकती व त्याअनुषंगाने प्रसिद्ध झालेली जाहीर इशारावजा नोटीस ही प्रस्तुत उत्तरी नोटीसीचा वाद विषय आहे.

२) वस्तुतः वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या शेतजमिन मिळकती ह्या कै. शिवगोंडा आलगोंडा पाटील यांचे मालकी हक्काच्या व कब्जे वहिवाटीच्या मिळकती होत्या. कै. शिवगोंडा आलगोंडा पाटील यांनी त्यांचे हयातीत सर्व स्थावर मिळकतींसंदर्भात ता. २१/ ०२/२०११ इ. रोजी नोंदणीकृत मृत्युपत्र लिहुन ठेवले असून तद्नंतर ता.२१/०७/२०१३ इ. रोजी कै. शिवगोंडा आलगोंडा पाटील यांचा मृत्यु झालेला आहे. त्यांचे मृत्युपश्चात त्यांनी लिहुन ठेवलेल्या मृत्युपत्राचा अंमल वाद मिळकतींचे ७/१२ पत्रकी होणेकरीता मे.गावकामगार तलाठीसो, इचलकरंजी यांचेकडे सादर केले अर्जावरून फेरफार नं. ५१३७८ चा फेरफार मंजूर करणेत आला असून सदर फेरफाराविरुद्ध पिरगोंडा शिवगोंडा पाटील यांनी मे. उपविभागीय अधिकारीसो, इचलकरंजी विभाग, इचलकरंजी यांचेकडे आर. टी. एस अपील दाखल केले होते. सदर अपीलाचा न्याय निर्णय आमचे अशिलांचेवतीने झालेने नाराज होवून पिरगोंडा शिवगोंडा पाटील यांनी मे. अप्पर जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर यांचे कोर्टात सेकंड आर. टी. एस अपील दाखल केले होते. मे. अप्पर जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर यांनी सदरचे सेकंड आर. टी. एस अपील मंजूर केलेवरून आमचे अशिलांनी मा. अप्पर आयुक्तसो, पुणे विभाग पुणे यांचेकडे पुर्ननिरीक्षण अर्ज दाखल केलेला होता. सदरचा पुर्ननिरीक्षण अर्ज ता. २०/०५/ २०१९ इ. रोजी नामंजूर झालेचे कारणावरुन आमचे अशिलांनी मा.महसुल मंत्री महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांचेसमोर प्रकरण क्रमांक आर.टी.एस ३८१९/११२६२३/ प्र.क्र.१०७/ज–५अ प्रमाणे फेरतपासणी अर्ज दाखल केलेला होता सदरचा फेरतपासणी अर्ज मा. महसुल मंत्री महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई यांनी ता. २७/०५/ २०२५ इ. रोजीचे आदेशाने मंजूर करून फेरफार क्रं.५१३७८ चा फेरफार मंजूर केलेला आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी वाद मिळकतींचे ७/१२ पत्रकी करणेत आली असून फेरफार क्रं. ५१३७८ चा अंमल वाद मिळकतींचे ७/१२ पत्रकी अलाहिदा झालेला आहे.

३) श्री. उल्हास रायगोंडा पाटील यांनी सदर मृत्युपत्राबाबत निष्कारण वाद उपस्थित केला असून उल्हास रायगोंडा पाटील यांचे पुर्वहक्कदार कै. रायगोंडा शिवगोंडा पाटील यांचे मृत्युपश्चात उल्हास रायगोंडा पाटील यांनी सदर मिळकतीपैकी रि.स.नं. ६५४ या मिळकतीचे तारणावर छाया कॉर्नर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत, इचलकरंजी यांचेकडुन अनुक्रमे रक्कम रु.५,००,०००/- प्रमाणे एकूण रक्कम रु.१०,००,०००/- इतक्या रक्कमेचा कर्जबोजा केला असून सदर कर्जबोजाची नोंद सदर मिळकतीचे ७/१२ पत्रकी इतर हक्कामध्ये झालेली आहे. अशास्थितीत सक्षम महसुल मंत्रालयाने फेरफार क्रं. ५१३७८ चा फेरफार गुणदोषावर मंजूर केला असलेने त्यासंदर्भात व उपरोक्त संदर्भीय मृत्युपत्रासंदर्भात वाद उपस्थित करणेचा उल्हास रायगोंडा पाटील यांना कायद्याने हक्क व अधिकार येत नाही. केवळ जनमाणसात आमचे अशिलांची नाहक बदनामी करणेचे हेतुने उपरोक्त संदर्भीय जाहीर इशारा नोटीस प्रसिद्ध करणेत आली असून त्यावर कोणीही विश्वास ठेवू नये व गैरसमज करून घेवू नये म्हणून प्रसिद्ध केले जाहीर इशारावजा नोटीसीस हरकतवजा उत्तर सही ता. ०७/१२/२०२५

**ॲड. पवनकुमार अ. उपाध्ये,**

९/६३/११, 'दिप श्रेय', महालक्ष्मी व्हिलेज, साळुंखे मळा, आमराई रोड, इचलकरंजी. मो.नं. ९८२२४४३११७.

# निपाणीत घरफोडीचा प्रयत्न नागरीकांच्या सतर्कतेमुळे फसला

## पोलिसांवर हल्ल्याचा चोरट्यांचा प्रयत्न

निपाणी,ता.७ (प्रतिनिधी)–

**येथील माने प्लॉट शिक्षानगर परिसरात शनिवारी मध्यरात्री चोरट्यांचा घरफोडीचा प्रयत्न नागरीकांच्या सतर्कतेमुळे फसला.या टोळींमध्ये एका महिलेचा सहभाग असल्याचा अदांज व्यक्त होत आहे.**

माने प्लॉट शिक्षानगर भागात रावसाहेब जनवाडे यांचा बंगला आहे.खालील बाजूस जनवाडे तर वरील बाजूस अन्य कुटुंबीय वास्तव्यास आहेत. दरम्यान घरात कोणी नसल्याचे पाहून चौघा चोरट्यांनी घरफोडीचा प्रयत्न केला.यावेळी शेजारीच राहणाऱ्या प्रियांका कुलकर्णी यांच्या घरातील सीसीटीव्हीमध्ये सदर घटना कैद झाल्यानंतर शेजाऱ्यांना ही माहिती देण्यात आली.त्यानंतर पोलिसांना पाचारण करण्यात आले.



सीसीटीव्हीत कैद झालेले चोरटे.

पोलीस घटनास्थळी दाखल झाल्यानंतर चोरटे पळून जाण्यात यशस्वी झाले. तसेच चोरट्यांकडून पोलिसांवरही हल्ल्याचा प्रयत्न झाला. या चोरट्यांनी जनवाडे यांच्या शेजारील एका घरामध्ये चोरीचा प्रयत्न केला.मात्र त्यांच्या हाती काहीच लागले नाही.शहरात चोरट्यांकडून चोरीचे सत्र थांबले नसल्यामुळे नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# चिकोडी शैक्षणिक जिल्ह्यात १० हजार ७६७ परीक्षार्थींनी दिली टीईटी परीक्षा

निपाणी,ता.७( प्रतिनिधी)–

**चिकोडी शैक्षणिक जिल्ह्यात रविवारी शिक्षक पात्रता (टीईटी) परीक्षेसाठी दिवसभरात दोन पेपर सुरळीत झाले.यासाठी एकूण २८ केंद्रावर १० हजार ७६७ परीक्षार्थींनी दिवसभरात ज्या त्या केंद्रावर परीक्षा दिली.चिकोडी शैक्षणिक जिल्ह्याचे उपनिर्देशक (डीडीपीआय) सितारामू यांच्या नेतृत्वाखाली परीक्षा झाली.**

चिकोडी शैक्षणिक जिल्ह्यात चिकोडी, निपाणी, अथणी, कागवाड, रायबाग, हुक्केरी, गोकाक, मुडलगी या केंद्रावर या परीक्षेचे कामकाज चालले.

पहिली ते पाचवी व सहावी ते आठवी यासाठी ही परीक्षा सकाळी ९:३० ते दुपारी १२ व दुपारी २:२० ते ४:३० यावेळेत परीक्षा झाली.



**निपाणी: जी.आय बागेवाडी महाविद्यालयातील परीक्षा केंद्रावर परीक्षार्थींची झालेली गर्दी.**

यामध्ये सकाळी चिकोडीतील १२ तर एकसंबा येथील १ केंद्रावर ही परीक्षा झाली.दुपारी एकूण २८ केंद्रावर परीक्षेचे कामकाज चालले.यामध्ये चिकोडी १२, एकसंबा २, नणदी २, अथणी ४ व निपाणीताल ८ केंद्राची स्थापना करण्यात आली होती.

## लक्ष्मण माळी यांचे निधन



निपाणी,ता.७ (प्रतिनिधी)–

येथील शिवाजीनगर परिसरातील लक्ष्मण सखाराम माळी (वय ७८) यांचे निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना नातवंडे, परतंवंडे असा परिवार आहे.

## इलेक्ट्रिक बाईक अज्ञाताने पेटवली

कोल्हापूर ता.७ (प्रतिनिधी)–

**चौक, टिंबर मार्केट, शिवाजी पेठ येथे उभा केलेली इलेक्ट्रिक बाईक अज्ञाताने पेटवून नुकसान केले.शनिवारी ६ डिसेंबर रोजी रात्री हा प्रकार घडला.**

विक्रम प्रल्हाद पाटील (वय ४६) यांनी जुना राजवाडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे मोपेड पेटवणाऱ्याचा पोलीस शोध घेत आहेत.

## पाहुणी आली... डल्ला मारून गेली

कोल्हापूर ता.७(प्रतिनिधी)–


पाहुणी म्हणून घरी आलेल्या एका महिलेने नातेवाईकांच्या घरातील अडीच लाखांच्या दागिन्यांवर डल्ला मारला. या प्रकरणी मेहबूब खुदबुद्दीन सय्यद (वय २४, रा. मिणचे, ता. हातकणंगले) यांनी वडगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार संशयित आशिया दस्तगीर मुल्ला (वय २४, रा. कराड, जि. सातारा) हिच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

मेहबूब सय्यद यांच्या मिणचे येथील घरात दि. ५ सप्टेंबर रोजी आसिया मुल्ला ही पाहुणी म्हणून राहण्यास आली होती. या कालावधीत तिने सय्यद यांच्या घरातील एक तोळ्याचे मंगळसूत्र, एक तोळ्याचे गंठण, अर्धा तोळा कर्णफुले, सोन्याची अंगठी असे अडीच लाख रुपयांचे दागिने लंपास केले. हा प्रकार सय्यद यांच्या लक्षात दोन महिन्यांनी आला. त्यामुळे त्यांनी दि. ६ डिसेंबर रोजी वडगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. संशयित महिलेस अद्याप अटक केलेली नाही.महिला पोलीस नाईक कांबळे तपास करत आहेत.

# डॉ. एस.पी. पाटील आयुर्वेदिक कॉलेजमध्ये चौथी बॅचचा शिष्योपनयनम स्वागत समारंभ

कोरोची,ता.७–

**येथील डॉ.एस.पी.पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजमध्ये नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आयोजित चौथी बॅचचा शिष्योपनयनम कार्यक्रम झाला.**



प्राचार्य डॉ. विशाल पाटील यांनी,यशाच्या शिखरावर पोहोचल्यानंतर आई–वडिलांना विसरू नका. ते आयुष्यभर लेकरासाठीच कष्ट करतात.

पहिल्या दिवसापासून अभ्यासाची सवय लावा; शेवटच्या क्षणी केलेला अभ्यास टिकत नाही.पालकांविषयी कृतज्ञता, नात्यांचे जतन आणि सातत्यपूर्ण अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट केले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष डॉ.प्रदीप पाटील यांनी भूषविले.प्राचार्या.डॉ.प्रमोदिनी पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणजीत दिंडे पाटील व डॉ. सिमरन मुल्ला यांनी कॉलेज आणि हॉस्पिटलची माहिती दिली.

कार्यक्रमास डॉ. शुभांगी पाटील, डॉ.रणजीत पाटील, डॉ.प्रणीत पाटील,डॉ.अश्विनी पाटील, डॉ.संदेश आरेकर,डॉ.रबिया शिरगावे, डॉ.अनुराधा अथणे,डॉ.आनंद कांबळे, डॉ.करण हांडे, डॉ.अश्विनी गणबावले, डॉ. यास्मिन पिरजादे,डॉ. निखील पाटील, डॉ. शितल पाटील, डॉ. प्रिया मोहिते, डॉ. अमोल पाटील,डॉ. राहुल पवार, डॉ.गजानन कुलकर्णी, डॉ. स्नेहा माळी, डॉ. प्रशांत मळगे,डॉ. पूजा देशमुख, डॉ. ऐश्वर्या घाट, डॉ. रचना मगदूम, डॉ. अरुण जाधव, डॉ. अमित चौगुले, डॉ. स्वप्नील जाधव, डॉ. तौसीफ मोमीन, डॉ. शाहरुख शिकलगार, डॉ. पूनम देबाजे, डॉ. वर्षा सुतार, डॉ. इंद्रनील मगदूम, डॉ. रितिका रॉय, डॉ. शोभा जगताप, डॉ. अभिनंदन धोत्रे, किशोर निकम, अनिकेत कांबळे, किरण पाटील, विश्वजित पाटील, यश चव्हाण, अमोल पाटील, अभयराजे पाटील तसेच सर्व शिक्षक,कर्मचारी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

१) ता. हातकणंगले पैकी मौजे तारदाळ येथील गट नं. ५०४, एकुण क्षेत्र हे . २.७१ आर, आकार रू ४.८० पैसे यापैकी बिगरशेती भुखंड नं. ५ +१३+२२ F चे क्षेत्र ६१.४६ चौ. मी. ची खुली मिळकत यांसी चतुः सिमा पुर्वेस :- याच गट नंबरपैकी शिल्लक मिळकत, पश्चिमेस :- १५ फुटी रस्ता दक्षिणेस :- श्री चौगुले यांची मिळकत व उत्तरेस :- भुखंड नं. ५+१३+२२ C ची मिळकत - येणेप्रमाणे चतुः सिमेतील खूली प्लॉट मिळकत. २) वरील मिळकत ही प्रवीण प्रकाश रेडेकर करीता वटमुखत्यारधारक परशुराम रामचंद्र कोरवी रा . इचलकरंजी यांचे मालकी वहीवाटीची असून सदरील मिळकतीसंदर्भात त्यांनी आमच्या अशिलांशी संचकारपत्र करून संचकार दाखल रक्कम स्विकारलेली आहे. ३) सबब, सदरील मिळकतीवर कोणाचाही, कोणताही हक्क, करार, तारणगहाण दस्त, बक्षिस, वारसा हक्क, कोर्ट केसेस वगैरे हक्कसंबध असतील तर तो त्यांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावरती लेखी कागदपत्रासह कळवावे . म्हणुन दिली जाहीर नोटीस सही ता. ०७/१२/२०२५

**ॲड. पंकज आ. पाटील**

ऑफीस - श्री दत्त अपार्टमेंट, गाळा नं. १, सांगली नाका, इचलकरंजी
मो. न. ९०२१२३७६८७

### जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन–मौजे तिळवणी गट नंबर. ४९, ५० व ५१ ची बिगर शेती जमीन त्यापैकी प्रत्येक गट नंबर मधील प्लॉट नंबर - ८ याचे क्षेत्र चौरस मीटर ३२७.६२ + १६४.४४ + २३९.८६ ची जागा एकमेकास लगत असुन याचे एकुण चौरस मीटर - ७३१.९२ ची जागा सर्व यांसी एकत्रीत चतुः सिमा- पुर्वेस - श्री. शिंगे यांची मिळकत पश्चिमेस–२५ फुट रूंदिचा रस्ता व प्लॉट नं.१ची मिळकत, दक्षिणेस - प्लॉट नंबर ७ ची मिळकत, उत्तरेस- ओढा व गायकवाड यांची मिळकत येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत हि श्री. रंगराव कृष्णा सावंत रा - इचलकरंजी यांची मालकीची असुन त्यांनी आमचे मित्र यांचे कडुन संचकार रक्कम स्विकारून सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा देवून खरेदि देण्याचे ठरवीले आहे. वर नमुद मिळकतीवर अन्य कोणाचा कसलाही कर्ज बोजा हक्कसंबंध दावा करार वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्द झाले पासुन सात (७) दिवसाचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार समक्ष भेटुन नोंदवावी तक्रार न आल्यास दखल घेतली जाणार नाही म्हणून दिली जाहीर नोटीस

दि–०७/१२/२०२५

**श्री.श्रीकांत सिध्दू हणबर**

(स्टॅम्प व्हेंडर)

पत्ता - ए. एस. सी कॉलेज जवळ, इचलकरंजी
संपर्क- ९८२२२११०८१.

### जाहीर नोटीसीस हरकत

आमचे अशिल १) अर्चना संजय कोळी, रा. कोरोची २) मिनाक्षी महादेव सणगर, रा. इचलकरंजी ३) संमीता संभाजी शेणे रा. मांगूर यांनी दिलेल्या माहितीवरून, दाखविलेल्या कागदपत्रावरून, त्यांचे सांगणेवरून ता. ०४/१२/२०२५ इ. रोजी दै. महासत्ता या वर्तमानपत्राचे पानं नं. ७ वर ॲड. सचिन दा. सवदी यांनी त्यांचे अज्ञात अशिला करीता प्रसिध्द केलेल्या जाहीर नोटीसीस हरकत घेणेत येते की,

सदर नोटीसमध्ये नमुद मौजे कोरोची येथील क.ग.नं. ३२१ या मिळकती मध्ये आमचे अशिल व इतर यांचे दरम्यान अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नसताना आमचे अशिलांचे अपरोक्ष, आमचे अशिलांची सहमती नसताना परस्पर सदर मिळकती मधील काही क्षेत्र खोट्या कागदपत्राचे आधारे विक्रीचा बेकायदेशीररीत्या प्रयत्न करत आहेत. अशी वस्तुस्थिती असताना वर नमुद नोटीस व गट नं. ३२१ मधील क्षेत्राबाबत कोणीही, कसलाही व्यवहार करू नये, केलेस तो आमचे अशिलांचे कायदेशीर हक्कावर बंधनकारक राहणार नाही. तरी कोणाची फसवणूक होवू नये म्हणून दिली हरकत. सही.

ता. ०७/१२/२०२५

**ॲड. शहाबाज गुलाब ढालाईत**

५८३, मारूती मंदिरच्या पाठी मागे, गावभाग, कोरोची.
मो. ९५५२८१४६१४

## केआयटीमध्ये आज 'स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन-२५' चे आयोजन

कोल्हापूर.ता.७(प्रतिनिधी) -

**भारत सरकारच्या शिक्षण विभागाचा इनोव्हेशन सेल आणि ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन २५ चे आयोजन कोल्हापूर येथील केआयटी अभियांत्रिकी (प्रदत्त स्वायत्त) महाविद्यालयांमध्ये ता.८ व ९ डिसेंबर २०२५ रोजी संपन्न होत आहे.**

या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.चंद्रशेखर बिरादार,संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी ग्लोबल गीन ग्रोथ,बंगळूरू यांच्या हस्ते तर श्री.प्रसन्न डोईजड डिलिव्हरी हेड, नेलसॉफट यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. समारोपाच्या कार्यक्रमासाठी संदीप जोशी, व्हाईस प्रेसिडेंट ह्यूमन रिसोर्स टाटा ऑटो-कॉम्प सिस्टीम लिमिटेड हे मुख्य अतिथी असणार आहेत.ही अंतिम फेरी आहे.६ प्रश्नांचे ६ विभाग केले असून प्रत्येक विभागातील विजेत्या संघाला भारत सरकार कडून १.५० लाखाचे रोख पारितोषिक मिळणार आहे,अशी माहिती संस्थेचे संचालक व या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक डॉ. मोहन वनरोट्टी यांनी दिली.

## चला भ्रष्टाचार संपवूया कोल्हापूरात आज कार्यशाळा

कोल्हापूर,ता.७(प्रतिनिधी)-

**केंद्रीय अन्वेषण ब्यूरो, लाचलुचपत प्रतिबंधक शाखा पुणे व कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार ता. ८ डिसेंबर रोजी दुपारी ४ वा. कोल्हापूर चेंबरच्या कार्यालयात 'चला भ्रष्टाचार संपवूया' या जागरुकता कार्यशाळेचे आयोजन केले आहे.**

या कार्यशाळेत सीबीआय, लाचलुचपत प्रतिबंधक शाखा, पुणे च्या पोलीस निरिक्षक शीतल पाटील या व त्यांचे सहकारी व्यापारी-उद्योजक यांना भ्रष्टाचार निर्मूलन संदर्भात मार्गदर्शन करणार आहेत. तरी चला भ्रष्टाचार संपवूया या जागरुकता कार्यशाळेस व्यापारी-उद्योजकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष संजय शेटे यांनी केले आहे.



कबनूर ग्रा.पं.मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना उपस्थित प्रमुख मान्यवर.

## कबनूर ग्रा.प.मध्ये महापरिनिर्वाण दिन साजरा

कबनूर,ता.७(वार्ताहर)-

**येथील ग्रामपंचायत सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच सुलोचना कट्टी,माजी सरपंच सुधीर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.**

यावेळी उपसरपंच सुधीर लिगाडे,ग्रामपंचायत सदस्या रोहिणी स्वामी,सुनिता आडके,रजनी गुरव,समीर जमादार,सहिफ मुजावर ग्रामपंचायत अधिकारी संजय बर्डे,संजय कट्टी आदी उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना बौध्द समाजाच्यावतीने अभिवादन करण्यात आले.कबनूर सरपंच सुलोचना कट्टी व अर्चना नाईक यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीला पुष्पहार घालण्यात आला.अजित शिंदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.यावेळी नेताजी कांबळे,मोहन नाईक, भूषण राज, सत्यम कांबळे,बबन इंगळे,बी.जी.देशमुख,अशोक कांबळे,मधुकर फरांडे,सागर अद्वणी, श्रीकांत कांबळे,राजेंद्र फरांडे,दिलीप शिंदे, संजय कट्टी,सागर खांडेकर आदी उपस्थित होते.



## सै.टाकळीत महापरिनिर्वाण दिन साजरा

सैनिक टाकळी,ता.७(प्रतिनिधी)-

**येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व गर्ल्स हायस्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक विनोद पाटील व मुख्याध्यापिका एस. ए. अंबुपे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.**

शाळेतील विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्शांचे पालन करण्याचा संकल्प केला. ज्येष्ठ शिक्षिका एम.एम.धुमाळे आणि एस.ए.अंबुपे यांनीही मनोगते व्यक्त केली.सुत्रसंचालन आर.एस.खोपडे यांनी केले.आभार आर.एम.पाटील यांनी मानले.

# कोल्हापुरात रोटरी डिस्ट्रिक्ट इंटरॅक्ट कॉन्फरन्स युवा स्पंदन सोहळा उत्साहात

कोल्हापूर.ता.७(प्रतिनिधी)-

**रोटरी क्लब ऑफ करवीर, कोल्हापूर आयोजित रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१७० आयोजित वार्षिक 'डिस्ट्रिक्ट इंटरॅक्ट कॉन्फरन्स युवा स्पंदन २०२५-२६' हा भव्य सोहळा उत्साहपूर्ण, वातावरणात आनंद भवन, सायबर कोल्हापूर येथे यशस्वीरित्या पार पडला. महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा राज्यांतील विविध शाळांमधील ८०० जून अधिक इंटरॅक्टर्स व शिक्षकांनी या परिषदेत सहभाग नोंदवून नेतृत्व, सेवा आणि व्यक्तिमत्व विकासाचा अविस्मरणीय अनुभव घेतला.**


कोल्हापुरात आयोजित रोटरी डिस्ट्रिक्ट इंटरॅक्ट कॉन्फरन्स युवा स्पंदन सोहळ्याप्रसंगी उपस्थित चेअरमन दिलीप शेवाळे,अरुण भंडारे व इतर.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. रोटरी क्लब ऑफ करवीरचे अध्यक्ष रो. शितल दुग्गे यांनी स्वागतपर भाषण केले. इंटरॅक्ट कॉन्फरन्स इव्हेंट चेअरमन रो. दिलीप शेवाळे यांनी ही परिषद केवळ कार्यक्रम नसून युवकांच्या ऊर्जा, सेवाभाव आणि नेतृत्वक्षमतेचा उत्सव असल्याचे सांगितले.

प्रमुख अतिथी रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इंजि.अरुण भंडारे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत समाजकार्यात सक्रिय सहभागाचे महत्व पटवून दिले. प्रमुख पाहुणे पोलीस उपअधीक्षक, गृह विभाग, कोल्हापूर तानाजी सावंत यांनी विद्यार्थ्यांची जबाबदारी, संयम, वेळेचे महत्व, कोणती ही नशा न करणे, ध्येय निश्चिती करणे, पालकांशी असणारे नाते आणि सामाजिक भान याबाबत अत्यंत मार्मिक मार्गदर्शन केले. यावेळी असिस्टंट गव्हर्नर गौरव शहा, डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी गौरी शिरगावकर, डीसीसी निशिकांत नलवडे आणि डिस्ट्रिक्ट इंट्रॅक्ट रिप्रेझेंटेटिव्ह इशा कामत यांनीही मनोगते व्यक्त केली. प्रमुख पाहुण्यांचा स्मृतिचिन्ह व रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन आरुष गायकवाड आणि सही भोसले यांनी केले. आभार पंडित जाधव यांनी मानले.परिषदेत दिवसभर प्रेरणादायी आणि सक्षम व्यक्तिमत्व निर्मितीस पूरक असे सत्रांचे आयोजन करण्यात आले. डॉ.ज्योती जाधव, प्रो व्हाईस चान्सलर, शिवाजी विद्यापीठ यांनी शास्त्रज्ञ कसे होता येते याबाबत विद्वत्तापूर्ण मार्गदर्शन केले. कुमारी खुशी विनोद कांबळे यांनी रॉक क्लाइंबिंग व माउंटेनियरिंगवरील प्रभावी व्हिडिओ प्रस्तुतीकरणासह साहसी क्षेत्रातील संधींबाबत विद्यार्थ्यांना प्रेरित केले. प्रा.दयानंद देवमोरे यांनी सकारात्मक विचारसरणीचे सामर्थ्य प्रभावी शैलीत मांडत जीवनात यशस्वी होण्यासाठी सातत्याने नेहमी सकारात्मक रहा, असे म्हटले.

दुपारच्या सत्रात रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रम व नृत्य स्पर्धा सादरीकरणांनी वातावरण अधिकच उत्साही झाले. प्रमुख पाहुणे यतीश शहा यांच्या हस्ते ट्रॉफी आणि सर्टिफिकेट देऊन सन्मानित करण्यात आले. प्रमुख पाहुणे यतीश शहा यांनी यशासाठी आवश्यक अशा सात सवयी विद्यार्थ्यांना प्रेरक उदाहरणांसह समजावून सांगितल्या. सेक्रेटरी पंडित जाधव यांनी आभार मानले.

# पालकांनी मुलांना मोबाईल पासून दूर ठेवावे- रावळ

इचलकरंजी,ता.७-

**मराठा मंडळ सांस्कृतिक भवन येथे आदर्श विद्यामंदिर, सौ. हिराताई लोकरे बालमंदिर व रामभाऊ जगताप हायस्कूलचे संयुक्तिक वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले.या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रा.चेतन रावळ तर अध्यक्ष म्हणून गिरीराज मोहता उपस्थित होते.**

संस्थेचे सर्व पदाधिकारी व शिक्षकवृंद यांच्या हस्ते दीप्रज्वलनाने व नटराज प्रतिमा पूजनाने या सोहळ्याची सुरवात झाली.अतिथींचे स्वागत गोवर्धन बोहरा यांनी केले. यानंतर रमेश मर्दा व डी.एम.बिरादार यांनी पुषगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत केले. अतिथींचा परिचय रमेश मर्दा व सौ. सरिता गोनुगडे यांनी करून दिला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते


आदर्श विद्यामंदिरमध्ये आयोजित कार्यक्रमप्रसंगी वंदे मातरम्च्या पुस्तकाचे प्रकाशन करताना उपस्थित प्रमुख मान्यवर.

वंदे मातरम् या विद्यार्थी हस्तलिखित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. सौ.गीता खोचरे व मुख्याध्यापक अशोक शिंदे यांनी अहवाल वाचन केले. चेतन रावळ यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांनी स्वतःचे ध्येय निश्चित करून मार्गक्रमण करावे, पालकांनी इतर उपक्रमात मुलांना व्यस्त ठेऊन मोबाईलपासून दूर ठेवावे असा मौलिक संदेश दिला तर अध्यक्षीय भाषणातून गिरीराज मोहता यांनी विद्यार्थांना शुभेच्छा देऊन योग्य प्रकारे शिक्षण घेऊन शाळेचे नाव उज्वल करावे, असा संदेश दिला.तसेच शाळेस १ लाखाची देणगी जाहीर केली.

यावेळी विविध स्पर्धेत यश संपादन केलेले विद्यार्थी, पदाधिकारी, शिक्षक यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन जुवेरिया मुल्ला, अर्चिता कांबळे, नागेश चिल्लाळ, सौ.गीता साळुंखे यांनी केले.आभार सौ.सुजाता वडर यांनी मानले. यावेळी सौ.शकुंतला जाधव, विनायक सपाटे, सौ. शहनाज मोमीन, रजनीकांत राठोड, भूपाल कुरणे, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हुपरीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

हुपरी,ता.७(वार्ताहर)-

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त हुपरी येथे अस्थी पूजन व दर्शनाचा अत्यंत भावनिक आणि श्रद्धापूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांसह हजारो नागरिकांनी उपस्थित राहून महामानवाला आदरांजली वाहिली.**



चैत्यभूमी मुंबईहून आणलेल्या या पवित्र अस्थींचे पूजन विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सेवा समिती, समस्त बौद्ध समाज हुपरी आणि हुपरी नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय नरळे आणि पोलीस निरीक्षक एन. आर. चौखंडे यांच्या हस्ते अस्थींचे विधिवत पूजन करण्यात आले आणि त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी हुपरी पोलीस ठाण्याच्या वतीने आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना देण्यात आली. सायंकाळी शाहू नगर व सिद्धार्थ नगर भागातील नागरिकांनी कॅन्डल मार्च फेरी काढली.या फेरीत बौध्द समाजातील लहान मुले-मुली,युवक-युवती, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




























# सांगली महापालिकेवर महायुतीचा झेंडा फडकविणार

## भाजपच्या कोअर कमिटी बैठकीत निर्धार; वीस प्रभागांचा घेतला आढावा

सांगली, ता.७(प्रतिनिधी)-

**आगामी निवडणुकीत सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महापालिकेवर भाजपा महायुतीचा झेंडा फडकविण्याचा निर्धार उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या भाजपा कोअर कमिटीच्या बैठकीत व्यक्त करण्यात आला. या बैठकीत महापालिकेच्या संपूर्ण वीस प्रभागांचा आढावा घेण्याबरोबरच ही निवडणूक महायुती म्हणून एकसंघपणे लढण्याचे ठरले असल्याची माहिती भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष प्रकाश ढंग यांनी दिली.**

प्रकाश ढंग म्हणाले की, राज्यात महापालिकांच्या निवडणुका येत्या काही दिवसात होतील. त्यामुळे या आगामी महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने तयारी करण्यासाठी मिरजेतील शासकीय विश्रामगृहात राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक घेण्यात आली. तसेच महापालिकेच्या सर्व प्रभागातील इच्छुकांची यादी तयार करण्याचे काम सुरू आहे. जिल्हा कार्यालयात इच्छुकांचे अर्ज स्विकारले जाणार असून ती सर्व नावे भाजपाच्या प्रदेश कार्यालयाकडे पाठवली जातील, असे सांगण्यात आले.


मिरज येथे भाजप कोअर कमिटीच्या बैठकीवेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आम. सुधीर गाडगीळ व अन्य प्रमुख मान्यवर.

या बैठकीवेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी महापालिकेतील प्रत्येक प्रभागातील आढावा घेऊन आगामी महापालिकेची निवडणूक जिंकण्यासाठी कोअर कमिटीतील सर्व नेत्यांना सूचना केल्या. तसेच सविस्तर प्रभागनिहाय माहिती घेतली. यावेळी चंद्रकांत पाटील म्हणाले की, महापालिका क्षेत्रातील सर्व भाजपाच्या इच्छुक उमेदवारांनी घरोघरी जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने केलेली केंद्रातील कामे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात झालेली कामे यासंबंधीची माहिती घरोघरी जाऊन लोकांना समजावून सांगावी, असे आवाहन केले.

तसेच भाजपाचा जाहीरनामा काय असावा हे सुद्धा जनतेशी संवाद साधून आणि त्यांचे प्रश्न आणि सूचना लक्षात घेऊन सादर करणार आहोत, असेही चंद्रकांत दादा पाटील यांनी या बैठकीवेळी सांगितले. कोअर कमिटीतील नेत्यांनीही पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना प्रभागातील माहिती दिली. उमेदवार ठरवण्याच्या दृष्टीने आम.सुरेश खाडे, आम.सुधीर गाडगीळ, मकरंद देशपांडे, शेखर इनामदार, जिल्हाध्यक्ष प्रकाश ढंग या पाच जणांची समिती नेमण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला.

महापालिकेच्या अनुषंगाने बोलाविण्यात आलेली बैठक अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी आम.सुरेश खाडे, आम. सुधीर गाडगीळ, माजी आम. दिनकर पाटील, माजी आम. नितीन शिंदे, पश्चिम महाराष्ट्र प्रमुख मकरंद देशपांडे, प्रदेश उपाध्यक्ष शेखर इनामदार, माजी अध्यक्ष दिपक शिंदे, प्रदेश सदस्य निता केळकर, जयश्रीताई पाटील, पृथ्वीराज पाटील, पृथ्वीराज पवार, सुरेश आवटी, पांडूरंग कोरे, धीरज सुर्यवंशी यांच्यासह कोअर कमिटीतील सदस्य उपस्थित होते.

# म्हैसाळ योजनेच्या आवर्तनाला सुरुवात

मिरज, ता.७(प्रतिनिधी)-

**मिरज पूर्व भागासह कवठेमहांकाळ आणि जत तालुक्याच्या दुष्काळी भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या म्हैसाळ उपसा सिंचन योजनेच्या आवर्तनाला जिल्ह्याचे माजी पालकमंत्री व मिरजेचे आ.डॉ.सुरेश खाडे यांच्या हस्ते सुरुवात करण्यात आली.**

मिरज पूर्व भागासह दुष्काळी भागामध्ये बदलत्या वातावरणामुळे शेतीला पाण्याची टंचाई भासू लागली आहे. यामुळे म्हैसाळ योजना सुरू करावी, दुष्काळी भागातील तलावांसारखे जलस्रोत भरावेत, अशी मागणी भाजप किसान मोर्चासह पक्षाचे पदाधिकारी व शेतकऱ्यांमधून करण्यात येत होती. या मागणीच्या पार्श्वभूमीवर म्हैसाळ योजना सुरू करण्यात आली.


म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू करताना आ.डॉ. सुरेश खाडे, तानाजी पाटील, काकासाहेब धामणे यांच्यासह अधिकारी व शेतकरी.

यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा जिल्हा बँकेचे संचालक बाळासाहेब होनमोरे, भाजप किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तानाजी पाटील, भाजप विधानसभा क्षेत्र प्रमुख काकासाहेब धामणे, सागर वडगावे, बेडगचे सरपंच उमेश पाटील, लिगनूरचे सरपंच मारुती पाटील, एरंडोलीचे आत्माराम जाधव, पंचायत समितीचे माजी सदस्य किरण बंडगर, भाजप जिल्हा सरचिटणीस धनंजय कुलकर्णी, सलगरेचे माजी उपसरपंच सुरेश कोळेकर, ग्रामपंचायत सदस्य विजय पाटील यांच्यासह मिरज पूर्व भागातील शेतकरी, भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व म्हैसाळ योजनेचे अधिकारी उपस्थित होते.

**पाण्यासाठी शेतकऱ्यांवर आंदोलनाची वेळ येऊ देणार नाही-आ. खाडे**

आम्ही शेतकऱ्यांचीच मुलं आहोत. शेतीची आम्हाला जाण आहे. कधी पाणी लागते हे आम्हाला माहिती आहे. पाण्याच्या मागणीसाठी तुम्हाला यापुढे कधीही आंदोलने, मागणी करावी लागणार नाही. जोपर्यंत पाऊस पडत नाही, तोपर्यंत म्हैसाळ योजनेचे आवर्तन बंद होणार नाही, असे आश्वासन माजी पालकमंत्री आ.डॉ.सुरेश खाडे यांनी यावेळी दिले.

# अण्णासाहेब डांगे आयुर्वेद कॉलेजमध्ये १२ डिसेंबरपासून राष्ट्रीय सेमिनार

आष्टा, ता.७(प्रतिनिधी)-

**आष्टा येथील अण्णासाहेब डांगे आयुर्वेद वैद्यक महाविद्यालय, पदव्युत्तर विभाग व संशोधन केंद्र येथे ता.१२ व १३ डिसेंबर २०२५ या कालावधीत 'प्रबोधिनी' मेंटल हेल्थ अँड स्ट्रेस मॅनेजमेंट' या विषयावरील राष्ट्रीय सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे.**

संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.अण्णासाहेब डांगे, सचिव अ‍ॅड.राजेंद्र उर्फ चिमण डांगे, सहसचिव विश्वनाथ डांगे यांच्या मार्गदर्शनाने संपन्न होत असलेल्या सेमिनारमध्ये विविध राज्यांमधून अध्यापक, पदवी विभागातील विद्यार्थी तसेच पदव्युत्तर व पीएचडी विभागातील अभ्यासक आणि प्रॅक्टिशनर यांनी नावनोंदणी केली आहे. या सेमिनारच्या माध्यमातून ता.१२ डिसेंबर रोजी डॉ.वसंतमेघना मूर्ती (महाराष्ट्र), डॉ.सुहास कुमार शेट्टी (कर्नाटक) व डॉ.एस.गोपाकुमार (केरळ) यांचे मानसिक स्वास्थ्य व मानसिक ताणतणावाचे व्यवस्थापन या विषयावर उपयुक्त मार्गदर्शन होणार आहे. ता.१३ डिसेंबर रोजी ऑनलाईन पद्धतीने पेपर व पोस्टर प्रेझेंटेशन आयोजित केले आहे. आयुर्वेद क्षेत्रामध्ये प्रदीर्घ अनुभव असलेल्या तज्ञांच्या मार्गदर्शनाचा मानसिक स्वास्थ्य टिकविण्याच्या दृष्टिकोनातून सध्याच्या गतिमान जीवनशैलीत निश्चितपणे मोठा लाभ होईल, असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पराग देशमुखे यांनी व्यक्त केले. सेमिनार यशस्वी होण्याकरिता प्रशासकीय अधिकारी, शिक्षक व विद्यार्थी कार्यरत आहेत.

# आष्टा नगरपरिषदेचा वर्धापन दिन साजरा

आष्टा, ता.७(प्रतिनिधी)-

**आष्टा नगरपरिषदेचा १७२ वा वर्धापन दिन विविध उपक्रमांनी प्रशासन, सेवाभावी संस्था यांच्या कडून नगर परिषदेच्या मुख्य कार्यालयात उत्साहात साजरा झाला. मुख्याधिकारी अवधूत कुंभार यांच्या हस्ते केक कापण्यात आला. शहरातील राजकीय, सामाजिक, कृषी, सहकार, संस्कृती, कला क्षेत्रातील मान्यवरांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.**

नगरपरिषदेच्या विविध विभागातील आजी-माजी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रशासनातर्फे सेवानिवृत्त अधिकारी व स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यकाळातील अनुभव आठवणी व प्रशासनातील बदल याविषयी मार्गदर्शन केले.


आष्टा नगरपरिषदेच्या वर्धापन दिन कार्यक्रमप्रसंगी मुख्याधिकारी अवधूत कुंभार यांसह इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग.

मुख्याधिकारी अवधूत कुंभार म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळातील सहा डिसेंबर १८५३ रोजीची स्थापना असणारी आष्टा नगरपरिषद राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात जुनी नगरपालिका मानली जाते. नगरपरिषदेने शहराच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदानाची भूमिका बजावली आहे. यापुढील काळात कौन्सिल व प्रशासन, केंद्र व राज्य शासनाच्या सर्व त्या योजना प्रभावीपणे राबवून आष्टा शहराच्या विकासात महत्वाची भूमिका पार पाडेल. नागरिकांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी प्राधान्याने प्रयत्नशील आहोत.

दरम्यान, वैभवदादा शिंदे युवा मंचच्यावतीने सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक वैभव शिंदे यांच्या उपस्थितीत केक कापून नगरपालिकेचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. तर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे युवा नेते प्रवीण माने यांनी पालिकेच्या सभागृहात कर्मचाऱ्यांचा सत्कार करीत त्यांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रशासकीय अधिकारी रघुनाथ मोहिते, सचिन मोरे, अभियंता शेंडगे, दिलीप ढोले, चंद्रभागा चोरमुले, सेवानिवृत्त अधिकारी आर.एन.कांबळे, एस.डी. कांबळे पोपट हाबळे आदी उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त ठिकठिकाणी अभिवादन


कराडः डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादनप्रसंगी माजी आ.आनंदराव पाटील व इतर मान्यवर.

### कराडमध्ये मान्यवरांकडून आदरांजली

कराड, ता.७(प्रतिनिधी)-

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कराड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील त्यांच्या पुतळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवरांसह कार्यकर्ते आणि नागरिकांनी उपस्थित राहून आदरांजली अर्पण केली.**

विधान परिषदेचे माजी आ. आनंदराव पाटील यांनी, डॉ.आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. यावेळी आप्पासाहेब गायकवाड, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष निसार मुल्ला, शुभम लादे, किशोर आठवले, संतोष थोरवडे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते, युवा कार्यकर्ते आणि नागरिकांची उपस्थिती होती.


पेठ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करताना मुख्याध्यापक एस.बी.माने व सर्व स्टाफ.

### पेठ न्यू इंग्लिश स्कूल

पेठ, ता.७(वार्ताहर)-

**पेठ (ता.वाळवा) येथील कासेगाव शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त व क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त मुख्याध्यापक एस.बी.माने यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.**

यावेळी धनंजय बामणे, आर.पी.मोहिते, एस.पी.डबाणे, प्रकाश गावडे, एम.बी.भोपळे, वर्षाराणी बंडगर, शिला माळी, सरस्वती कदम, नलिनी पाटील, भारती गावित, एस.एम.नलवडे, मनिषा पाटील, राणी जामदार, चंद्रकांत खाडे, गुंडा जाधव, सुहास कुंभार, सक्षम सावंत यांसह विद्यार्थी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक एन.डी.पाटील यांनी केले. अर्चना ढवळीकर यांनी आभार मानले.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आ.डॉ.सुरेश खाडे व अन्य.

### मिरजेत मान्यवरांकडून अभिवादन

मिरज, ता.७(प्रतिनिधी)-

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनी मिरजेमध्ये विविध ठिकाणी अभिवादन करण्यात आले.**

मिरज भाजपा विधानसभा क्षेत्राच्यावतीने मिरज येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पालकमंत्री चंद्रकांत पाटील, माजी पालकमंत्री आ. सुरेश खाडे, तसेच भाजपा पदाधिकारी यांनी पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले. पृथ्वीराज पाटील, सुरेश आवटी, संगीता खोत, दीपक शिंदे, पांडुरंग कोरे, बाबासाहेब आळतेकर यांच्यासह अनेकजण यावेळी उपस्थित होते. डॉ.आंबेडकर यांच्या पुतळ्यास मिरज दर्गा खादीम जमाततर्फे पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा दक्षता समितीच्यावतीने अभिवादन करण्यात आले. याठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत बौद्धवंदना घेण्यात आली. महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाकडून ही अभिवादन करण्यात आले.

## तपोवन परिसरातील वृक्षतोड विरोधात

# कराडमध्ये पर्यावरणप्रेमींची सह्यांची मोहीम


कराडः प्रीतीसंगम बागेच्या प्रवेशद्वारासमोर सह्यांची मोहीम राबवून तसेच हातात फलक घेवून वृक्षतोडीला विरोध करण्यात आला.

कराड, ता.७(प्रतिनिधी)-

**नाशिक महानगरपालिकेकडून तपोवन परिसरात तब्बल १,८३५ वृक्षतोड करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला असून, त्यामुळे पर्यावरण समतोल धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत आहे. या निर्णयाविरोधात कराड शहरात पर्यावरणप्रेमींनी एकत्र येत प्रीतिसंगम बागेत व्यापक सह्यांची मोहीम राबवली.**

एन्व्हायरो फ्रेंड्स नेचर क्लबच्या पुढाकाराने झालेल्या या उपक्रमाला कराडकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने हजेरी लावली. पर्यावरण संवर्धनाच्या भूमिकेतून नागरिकांनी सह्या करून तपोवन बचावासाठी ठाम पाठिंबा दर्शवला.

यावेळी क्लबचे अध्यक्ष जालिंदर काशिद, निवृत्त अभियंता ए.आर. पवार, भानुदास वास्के, प्रसाद पावसकर, चंद्रकांत जाधव, एम.बी. शिंदे, चंद्रशेखर नकाते, रमेश पवार, तानाजी बुरुंगले, शाम मुसळे, सुभाष घाडगे, विजय खबाले आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. तपोवन परिसरातील वृक्षतोडीला विरोध करण्यासाठी क्लबतर्फे, तसेच कराडमधील निसर्गप्रेमी नागरिकांकडून सह्या संकलित करून प्रशासनाकडे औपचारिकरित्या निषेध नोंदविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. पर्यावरण रक्षणाचा संदेश देणाऱ्या या मोहिमेमुळे शहरात पुन्हा एकदा हिरवाई संवर्धनाची चळवळ उभी राहताना दिसत आहे.

# वंदे मातरम् गीताच्या सामूहिक गायनास सातारकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

सातारा, ता.७(प्रतिनिधी)-

**७ डिसेंबर २०२५ रोजी वंदे मातरम् या गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त गांधी मैदानावर आयोजित सामूहिक गायन कार्यक्रमास सातारकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**

यावेळी सौ. दमयंतीराजे भोसले यांची विशेष उपस्थिती होती. साडेआठ वाजता शंखध्वनीने कार्यक्रमास प्रारंभ झाला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते भारतमातेचे प्रतिमा पूजन करण्यात आले. मंदार ढवळे आणि इतर साथीदारांनी लता मंगेशकर यांनी गायलेल्या वंदे मातरम् गीतावर भरतनाट्यम आविष्कार सादर केला. त्यानंतर वंदे मातरम् या गीताचा इतिहास सांगण्यात येऊन पारंपारिक चालीत वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. कार्यक्रमाचे सर्व नियोजन हे नितीन सुपनेकर, सौ.मीना सुपनेकर यांनी केले. कार्यक्रमास शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.


सातारा : सामूहिक वंदे मातरम् गायनप्रसंगी उपस्थित मान्यवर.

कार्यक्रमाचे निवेदन राजेंद्र आफळे यांनी केले. कार्यक्रमाला राष्ट्र सेविका समिती, इनरव्हील क्लब (सिटी), ज्येष्ठ नागरिक संघ, इनरव्हील क्लब (सदरबाजार) आदी संस्थांनी सहाय्य केले. नियोजनात संकेत पुराणिक, महेश हवेले, अपूर्वा महाजनी, रुपाली गुजर, वैशाली फडणीस, अ‍ॅड.अमित द्रविड, डॉ. अच्युत गोडबोले, सारंग किरपेकर, मिताली लोहार आदींचा सहभाग होता.

## शिवस्मारक समितीच्या अध्यक्षपदी शंभूराज देसाई

पाटण, ता.७(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र शासनातर्फे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिवस्मारक आग्राच्या ऐतिहासिक भूमीत उभारण्यात येणार आहे. या शिवस्मारक समितीच्या अध्यक्षपदी राज्याचे पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांची निवड करण्यात आली.**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना आग्र्यात ज्या कोठी मीना बाजार परिसरात नजरकैदेत ठेवले होते. त्या ऐतिहासिक जागेवर आता राज्य शासनातर्फे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिवस्मारक उभारण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे शिवभक्तांचे स्वप्न पूर्ण होणार आहे. या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी जागा निश्चिती आणि स्मारक उभारणीसाठी गठित केलेल्या उच्चस्तरीय समितीच्या अध्यक्षपदी पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांची निवड केली.

# चांदोली परिसरात ताडोबातील वाघिणीमुळे घबराट

## मानवी वस्तीजवळ वावर, वन विभागाचे दुर्लक्ष; स्थानिकांचा आरोप

चरण, ता.७(वार्ताहर)-

**सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या चांदोली (ता.शिराळा) परिसरात गेल्या तीन चार वर्षांपासून वन्य प्राण्यांच्या वाढत्या संख्येमुळे स्थानिक नागरिक सतत भीतीच्या छायेत जीवन जगत आहेत. याच दरम्यान वन विभागाने नुकतीच ताडोबामधून एक वाघीण चांदोलीत सोडल्याने परिसरातील दहशत आणखी वाढली आहे. वाघ मनुष्यवस्तीच्या अगदी जवळ आल्याच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे सावट निर्माण झाले आहे; परंतु या संपूर्ण परिस्थितीकडे वन विभाग दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे.**



वन अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार नवी वाघीण सध्या आपला एरिया ठरवित आहे आणि म्हणूनच ती अधूनमधून गावालगत दिसत आहे. तथापि, वाघिणीला चांदोलीत सोडण्यापूर्वी 'स्पेशल ट्रिगर प्रोटेक्शन फोर्स' कार्यरत करणे आवश्यक होते. नागरिकांना अर्लट सूचनादेणारी व्यवस्था ताडोबाप्रमाणे येथे विकसित करणे गरजेचे होते. मात्र कोणतीही पूर्वतयारी न करता वाघ सोडण्यात आल्याने आज परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत.

चांदोलीच्या बफर झोनमध्ये येणाऱ्या उखळू पैकी जळकेवस्ती परिसरात पाळीव जनावरांचा परंपरागत पानवठा वन क्षेत्रालगत असल्याने वन विभागाने तेथील जनावरांना पाणी पिण्यास बंदी घातली आहे. परिणामी सुमारे ४०० पाळीव जनावरांसाठी पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या जवळील ओढे नाले प्रवाही असल्याने परिस्थिती इतकी तीव्र नसली तरी येणाऱ्या उन्हाळ्यात हा प्रश्न जीवघेणा ठरू शकतो. पाण्याची पर्यायी व्यवस्था आणि संरक्षणाची उपाययोजना तातडीने करण्याची गरज ग्रामीण भागातून व्यक्त होत आहे; मात्र वन विभाग याबाबत कुठलाही ठोस निर्णय घेत नसल्याची टीका वाढत आहे.

दरम्यान, जळकेवस्तीतील रहिवासी दीपक गावडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले की, या वाघिणीमुळे आमची सुमारे ४०० जनावरे पिढ्यान्‌पिढ्या असलेल्या पाणवठ्यावर पाणी पिऊ शकत नाहीत. त्यातच आमच्या जनावरांच्या कळपातील एक रेडकु गायब झाले आहे; ते जिवंत आहे की ठार मारले आहे याची चौकशी किंवा शोध घेण्यासाठी वन विभाग तयार नाही. वस्तीलगत वाघ जात असल्याचे ठसे आणि विस्टा स्पष्ट दिसत आहेत, पाळीव प्राणी सुद्धा निसर्गाचाच भाग आहेत, मग त्यांचा जीव धोक्यात येणे आणि त्यांना पाण्यापासून वंचित ठेवणे हा वन विभागाचा उपद्रव नाही का?'

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, वाघ संरक्षण आवश्यक असले तरी मानवी जीवित आणि पाळीव जनावरांचे सुरक्षित अस्तित्व हा तितकाच महत्त्वाचा मुद्दा आहे. लोकप्रतिनिधी, प्रशासन व वनविभाग तातडीने पुढे येऊन ग्रामस्थांच्या संरक्षणाची आणि पशूधनाच्या पाण्याच्या सोयीची काळजी घेतली नाही, तर परिस्थिती गंभीर स्वरूप धारण करू शकते.

# सोळाव्या वर्षी सुरू करा ५०० रुपयांची एसआयपी




गेल्या काही वर्षांत कमी रकमेपासून गुंतवणूक सुरू करण्याची प्रवृत्ती तरुणांमध्ये वाढताना दिसत आहे. विशेषतः तारुण्याच्या उंबरठ्यावर म्हणजेच वयाच्या सोळाव्या वर्षी सुरू केलेली केवळ ५०० रुपयांची मासिक एसआयपीही भविष्यात व्यवसाय उभारणीसाठी भक्कम भांडवल ठरू शकते, असे अनेक उदाहरणांवरून स्पष्ट होत आहे. पाचशे रुपये ही रक्कम छोटी वाटत असली तरी लवकर सुरुवात करण्याची वृत्ती आणि सातत्य राखण्याची तयारी यामध्ये महत्त्वाची ठरते.

आज अनेक विद्यार्थी मनोरंजन व छंदांकडे लक्ष देतात, परंतु काही तरुण कमी रकमेपासून का होईना, संपत्ती निर्मितीकडे पाऊल टाकताना दिसतात आणि ही विचारसरणी दीर्घकालीन आर्थिक स्वावलंबनाची पायाभरणी करते.

लहान रकमेपासून गुंतवणूक सुरू करण्यामागचा मुख्य आधार म्हणजे वेळ. जितक्या लवकर गुंतवणूक सुरू होते तितका जास्त परतावा मिळण्याची संधी मिळते. तसेच, कमी रक्कम असली तरी नियमिततेमुळे मोठा निधी निर्माण होऊ शकतो.

गुंतवणूक कुठे करायची हे ठरवताना कालावधी हा सर्वात महत्त्वाचा घटक ठरतो. पुढील तीन ते पाच वर्षांत व्यवसाय सुरू करण्याचा विचार असल्यास वाढ मिळवून देणारी आणि अस्थिरता मर्यादित ठेवणारी गुंतवणूक निवडणे योग्य ठरते. त्यामुळे संतुलित लाभ देणारे आणि बाजारस्थितीनुसार इक्विटी व डेटमध्ये आपोआप बदल करणारे 'बॅलन्स्ड ॲडव्हांटेज फंड' हे प्रारंभीचे योग्य साधन ठरू शकते. अशा प्रकारचा फंड ५०० रुपयांच्या एसआयपीसह ही संपत्ती निर्मितीचा स्थिर पाया घालू शकतो.

गुंतवणूक सुरू करणे हे पहिले पाऊल असले तरी संपूर्ण प्रवासात आर्थिक शिस्त आणि समज आवश्यक असते. सुरुवातीला शिकत-समजत केलेली छोटी गुंतवणूक भविष्यात मोठ्या उद्दिष्टांसाठी मार्गदर्शक ठरते. वय वाढत गेले की शैक्षणिक खर्च, आपत्कालीन निधी, मालमत्ता खरेदी, विवाह आणि पुढे निवृत्ती असे अनेक टप्पे समोर येतात आणि प्रत्येक टप्प्यासाठी स्वतंत्र धोरण आवश्यक ठरते. अल्पावधीच्या उद्दिष्टांसाठी डेट फंड, मध्यमकालीन गरजांसाठी हायब्रिड फंड, तर दीर्घकालीन उद्दिष्टांसाठी इक्विटी अधिक योग्य मानली जाते.

- चक्रवाढ परताव्याच्या गणितानुसार १० वर्षांत ५०० रुपयांची एसआयपी केल्यास एकूण गुंतवणूक ६००० रुपये दरवर्षीप्रमाणे एकूण ६० हजार रुपये होते, परंतु चक्रवाढ परिणामामुळे अंतिम रक्कम साधारण १ लाखाच्या आसपास जाते. म्हणजेच मूळ रक्कमेपेक्षा जवळपास दुप्पट वाढ नोंदवते.
- १५ वर्षांचा कालावधी ग्राह्य धरल्यास गुंतवणूक ९० हजार रुपयांपेक्षा थोडी अधिक होते तरी चक्रवाढ परिणामामुळे ती जवळपास २ ते २.२५ लाखांपर्यंत पोहोचते.
- यापुढे उत्पन्न वाढत जाईल तसा एसआयपीचा आकार वाढवणे, ठराविक अंतराने आपली गुंतवणूक तपासणे आणि उद्दिष्टांमध्ये आवश्यक बदल करणे यामुळे भविष्यातील व्यवसायासाठी लागणारा भांडवली निधी तर उभा राहीलच, पण आर्थिक स्वावलंबनाचा मजबूत पाया देखील तयार होईल.

# पर्याय 'डेट कन्सोलिडेशन'चा

*गेल्या काही वर्षांत वाढत्या महागाईने आणि वाढत्या आकांक्षांनी घरगुती अर्थकारणावर मोठा ताण आणला आहे. शहरात स्वतःचे घर मिळवण्यासाठी घेतलेले गृहकर्ज, मुलांच्या शिक्षणासाठी घेतलेले एज्युकेशन लोन, वाहनकर्ज, वैयक्तिक कर्ज अशा अनेक ईएमआयचा बोजा आता लाखो घरांवर पडलेला आहे. वेगवेगळ्या दरांनी वेगवेगळ्या तारखांना भराव्या लागणाऱ्या या देणींकडे लक्ष देणे अनेकांसाठी जिकिरीचे झाले आहे. या वाढत्या ओझ्यात 'डेट कन्सोलिडेशन' म्हणजेच 'कर्ज एकत्रीकरण' ही संकल्पना एक शहाणपणाचा मार्ग म्हणून पुढे आली आहे.*

### कर्ज एकत्रीकरण म्हणजे काय?

विविध कर्जे आणि क्रेडिट कार्डची बाकी रक्कम एकत्र करून एकच नवीन कर्ज घेणे आणि ते तुलनेने कमी व्याजदर असणारे घेणे ही प्रक्रिया केली जाते. त्यामुळे परतफेडीचा भार साधा, सुटसुटीत आणि नियंत्रित होतो. अलीकडेच साऊथ इंडियन बँकेने अशाच प्रकारची 'एसआयबी पॉवर कन्सोल' नावाची एक योजना आणली आहे. या योजनेचा उद्देश ग्राहकांकडे असलेल्या अनेक कर्जांना एकत्र करून त्यांना कमी व्याजदरात, एकाच ईएमआयमध्ये परिवर्तित करणे हा आहे.

### योजनेत काय मिळते?

या योजनेत ग्राहकांना घरकर्ज, वाहनकर्ज, शिक्षणकर्ज, वैयक्तिक कर्ज, घरगुती वस्तूंसाठीचे कर्ज अशी अनेक देणी एकाच कर्जात बदलता येतात. नव्या कर्जावर व्याजदर कमी मिळतो आणि त्यामुळे एकूण परतफेड अधिक व्यवस्थित होते.

ही योजना मालमत्तेवर आधारित आहे. म्हणजेच ग्राहक आपले घर किंवा व्यावसायिक मालमत्ता गहाण ठेवून त्यांच्या मूल्याच्या सुमारे ७५ टक्क्यांपर्यंत कर्ज घेऊ शकतात. त्यामुळे मालमत्ता विक्री न करता तिच्या मूल्याचा योग्य उपयोग करता येतो. या अंतर्गत १० लाखांपासून ते ३ कोटी रुपयांपर्यंत कर्ज मिळू शकते. परतफेडीची मुदत एकत्रित कर्जांसाठी १५ वर्षांपर्यंत आणि गृहकर्ज बॅलन्स ट्रान्स्फरसाठी ३० वर्षांपर्यंत ठेवता येते.

ही योजना ३० ते ५५ वयोगटातील पगारदार, स्वयंरोजगार व्यावसायिक आणि स्वयंरोजगार बिगरव्यावसायिक अशा सर्व गटांसाठी उपयुक्त आहे.




तज्ज्ञांच्या मते, कर्ज एकत्रीकरण म्हणजे विविध देणी एकत्र करून एकच देणे देणे. यामुळे एकाच ईएमआयवर लक्ष केंद्रित करता येते आणि एकूण व्यवस्थापन व्यवस्थित होते.

### ही योजना कशी कार्य करते?

ज्या बँकेकडून तुम्ही डेट कन्सोलिडेशन करणार आहात ती बँका तुमची सर्व पूर्वीच्या देणी स्वतःच चुकवते. त्याच्या बदल्यात ग्राहकाला त्यांच्या आर्थिक क्षमता लक्षात घेऊन एकच व्यवस्थित मासिक हप्ता भरावा लागतो. या प्रक्रियेत कोणतेही प्रोसेसिंग फी आकारली जात नाही. साधारणतः गृहकर्ज एकत्रीकरणासाठीचे व्याजदर ७.३५ टक्क्यांपासून सुरू होतात, तर इतर कर्जांसाठीचे व्याजदर ८.५ टक्क्यांच्या पुढे असतात.

याचा सर्वात मोठा लाभ म्हणजे एकूण व्याजखर्चात घट. उच्च व्याजदराची कर्जे कमी व्याजदराच्या एका कर्जात बदलल्याने हप्त्याची रक्कमही कमी होते आणि इतर खर्चांसाठी उपलब्ध रक्कम वाढते. अनेक तारखांना अनेक ईएमआय डेबिट होण्याची धांदल संपते. एका खात्यात फक्त एकच ईएमआय असल्याने बँकेत पुरेशी रक्कम ठेवून उर्वरित रक्कम नियोजन करून गुंतवणुकीसाठी वापरता येते. काळानुसार, अनेक असुरक्षित कर्जांऐवजी एक मोठे पण सुरक्षित कर्ज निर्माण होते. दीर्घकाळात यामुळे क्रेडिट स्कोअर सुधारतो आणि भविष्यात कमी व्याजदरांची संधी उघडते.

### कोणासाठी उपयुक्त?

हे कर्ज मालमत्ता-तारणावर आधारित असल्याने, चांगला क्रेडिट प्रोफाईल आणि तारण देण्याजोगी मालमत्ता असलेल्या ग्राहकांसाठी हे अधिक योग्य आहे.

स्वयंरोजगार व्यावसायिकांकडे अनेकदा १८ ते ३६ टक्के व्याजदराची बिझनेस कर्जे असतात. अशा वेळी मालमत्ता गहाण ठेवून ती सर्व कर्जे एका कर्जात एकत्र करणे फायदेशीर ठरू शकते. पगारदार व्यक्तींसाठी ही प्रक्रिया मुख्यतः बॅलन्स ट्रान्स्फरच्या स्वरूपात उपयुक्त दिसते.

### लक्षात ठेवण्यासारखे मुद्दे

- जुन्या कर्जांचे फोरक्लोजर करताना २ ते ४ टक्के शुल्क लागू शकते. तसेच कर्जाची मुदत वाढल्यास एकूण व्याजखर्च वाढतो. त्यामुळे निर्णय घेताना केवळ ईएमआय कमी होतो आहे याकडे लक्ष न देता एकूण व्याजखर्चाची तुलना करणे गरजेचे आहे.
- तज्ज्ञांच्या मते, सुरुवातीच्या काळातील कर्जे प्रथम एकत्र करावी, कारण व्याजाचा अधिक भार सुरुवातीच्या वर्षांतच असतो.

# दहा हजारांची एसआयपी की सव्वा लाख रुपये एकत्रित गुंतवावेत?

**दहा हजारांची एसआयपी की सव्वा लाख रुपये एकत्रित गुंतवावेत?**

भारतीय शेअर बाजाराने गेल्या काही दिवसांमध्ये नवे विक्रम नोंदवले. सेन्सेक्स आणि निफ्टीने गाठलेल्या उच्चांकामुळे आर्थिक वातावरण उत्साहवर्धक झाले असले तरी गुंतवणूकदारांसमोर एक जुना पण महत्वाचा प्रश्न पुन्हा उभा राहिला आहे. बाजार एवढा वर असताना वर्षातून एकदा मोठी रक्कम एकरकमी गुंतवावी की महिन्याला दहा हजार रुपये एसआयपीद्वारे हळूहळू गुंतवणूक करावी, याचा विचार प्रत्येकाने करावा लागतो. त्वरित कंपाउंडिंगची मोहकता आणि टप्प्याटप्प्याने प्रवेश करण्याची सुरक्षितता या दोन गोष्टींच्या दरम्यान निर्णय घ्यावा लागतो.




### एकरकमी गुंतवणुकीचा गणिती फायदा

शुद्ध गणिताच्या दृष्टीने पाहता एकरकमी गुंतवणूक नेहमीच पुढे असते. कारण संपूर्ण रक्कम वर्षभर गुंतलेली राहते आणि कंपाउंडिंगचा परिणाम अधिक मिळतो. वार्षिक १०%, १२% किंवा १५% परताव्याच्या गृहितकांवर विचार केला तर एक वर्षात १.२ लाख रुपये एकदाच गुंतवणे आणि तेच पैसे १०,००० रुपयांच्या मासिक एसआयपीद्वारे गुंतवणे या दोन मार्गांत शेवटी मिळणाऱ्या रकमेत फरक दिसतो. एकरकमी गुंतवणुकीला वेळेचा आधार मिळतो आणि वाढ अधिक होते. पण हा फायदा तेव्हाच ठोस दिसतो, जेव्हा बाजार सतत वर जात राहतो ह आणि अशी सरळ दिशा इक्विटी बाजारात क्वचितच दिसते.

### अस्थिर बाजारात एसआयपीचा ठोस फायदा

मार्केटमध्ये सुरुवातीला मोठी घसरण आली तर एकरकमी गुंतवणूक मोठा फटका खाते. २० ते ४०% घट लगेचच झाली तर दीर्घकालीन परतावा खूप कमी होतो. या जोखमीला 'सीक्वेन्स रिस्क' म्हणतात. याउलट एसआयपी अस्थिरतेचा फायदा घेते. दरमहा किंमत कमी असताना अधिक युनिट्स मिळतात आणि बाजार पुन्हा वाढला की त्या युनिट्सची किंमतही वाढते.

२००८ च्या आर्थिक मंदी किंवा २०२० च्या कोव्हिड संकटात घसरलेल्या एनएव्ही दरांवर घेतलेल्या युनिट्सने पुढील वर्षांत परतावा मोठ्या प्रमाणात वाढवला. त्यामुळे अस्थिर बाजारात एसआयपी ही सरासरी किंमत नियंत्रित ठेवणारी आणि भावनिक निर्णयांपासून वाचवणारी पद्धत ठरते.

### पगारदार गुंतवणूकदारांसाठी एसआयपी अधिक सुयोग्य

बहुतांश लोकांचे उत्पन्न मासिक असते, त्यामुळे एसआयपी ही नैसर्गिकरित्या त्यांच्या आर्थिक शिस्तीत बसणारी पद्धत आहे. वेळ साधण्याचा ताण राहत नाही, बाजार खाली असला तरी गुंतवणूक सुरूच राहते, आणि गोंधळाच्या काळात घाईगडबडीत विक्री करण्याची शक्यता कमी होते. वारंवार १०-२०% करेक्शन दिसणाऱ्या भारतीय बाजारात नियमित एसआयपी ही दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्यासाठी अत्यंत वास्तववादी वाटचाल मानली जाते.

### कधी निवडावी एकरकमी गुंतवणूक?

सर्व परिस्थितीत एसआयपीच सर्वोत्तम असते असे नाही. मोठी बाजारघट झाल्यानंतर, बोनस किंवा वारसा स्वरूपात अचानक आलेली रक्कम, किंवा १५ वर्षांहून अधिक कालावधीचा गुंतवणूक दृष्टीकोन असेल तर एकरकमी गुंतवणूक खऱ्या अर्थाने चमकते. बाजाराचे मूल्यांकन आकर्षक असेल आणि गुंतवणूकदाराची जोखीम झेलण्याची क्षमता जास्त असेल तर वर्षातून एकदा गुंतवलेली रक्कम उत्तम परिणाम देऊ शकते.

### दोन्ही पद्धतींचा संगम: सर्वात संतुलित मार्ग

केवळ एसआयपी किंवा केवळ एकरकमी यावर भर न देता दोन्हींचा योग्य मेळ बसवणे ही आजच्या बाजारासाठी अधिक व्यवसायिक आणि व्यवहार्य रणनीती ठरते. नियमित एसआयपी ही मुख्य गुंतवणूक म्हणून ठेवावी. त्यासोबत बाजार घसरला तर त्वरित एकरकमी गुंतवणूक करून संधीचा लाभ घ्यावा. तसेच दरवर्षी पगारवाढीनुसार एसआयपीमध्ये 'टॉप-अप' करून गुंतवणुकीची गतीही वाढवता येते. ही मिश्र पद्धत जोखीम कमी करते, प्रवेशाची सरासरी किंमत सुधारते आणि बाजारातील संधींचा वेळेत उपयोग करून घेण्याची क्षमता देते. दीर्घकालीन संपत्ती निर्माण करताना सातत्य, शिस्त आणि लवचिकता या तिन्ही गोष्टी एकत्र आणणारा हा सर्वाधिक प्रभावी मार्ग मानला जातो.



# तिमाही निकालांमध्ये आघाडी कोणाची?

गेल्या काही दिवसांत जाहीर झालेल्या वित्त वर्ष २०२६ च्या दुसऱ्या तिमाहीच्या निकालांमध्ये मध्यम आकाराच्या अनेक कंपन्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे आणि कोटक सिक्युरिटीजच्या अहवालानुसार मिडकॅप क्षेत्रातील तब्बल ८५ कंपन्यांनी अपेक्षेपेक्षा चांगले प्रदर्शन केले आहे. त्यापैकी आठ कंपन्यांची तिमाही कामगिरी विशेष ठळक ठरली आहे, कारण त्यांच्या नफ्यात, उत्पन्नात, ईबिट्डामध्ये आणि मार्जिनमध्ये एकाच वेळी स्पष्ट सुधारणा दिसली आहे. या कंपन्या आकाराने तुलनेने लहान असल्या तरी त्यांच्या निकालांनी गुंतवणूकदारांचे लक्ष नैसर्गिकपणे वेधले आहे.

गेल्या तिमाहीत नायका या एफएसएन ई-कॉमर्स व्हेंचर्सच्या मुख्य कंपनीने प्रचंड झेप घेतली आहे. वर्षाच्या तुलनेत एकत्रित नफा २४३ टक्क्यांनी वाढून २४ कोटींच्या पुढे गेला आहे. विक्रीत २५ टक्के वाढ, तिमाहीदरम्यान नफ्यात ४८ टक्के वृद्धी आणि ईबिट्डामध्ये ५३ टक्के वाढ झाल्याने मार्जिनही ५.५ टक्क्यांवरून ६.८ टक्क्यांवर गेले आहे. कामकाजातील कार्यक्षमतेत आणि खर्च नियंत्रणात झालेली सुधारणा ही कामगिरी अधोरेखित करतो.

दरम्यान ॲनंट राज लिमिटेड या रिअल्टी कंपनीने गेल्या महिन्यातील किंमतीतील दुरावस्थेनंतरही तिमाहीत मजबुत आकडे सादर केले आहेत. वर्षाच्या तुलनेत नफा ३१ टक्क्यांनी वाढून १२८ कोटींवर गेला आहे आणि उत्पन्न २३ टक्क्यांनी वाढले आहे. ईबिट्डामध्ये झालेली ४० टक्क्यांहून जास्त वाढ मार्जिनला २२ टक्क्यांवरून २६ टक्क्यांपर्यंत घेऊन गेली आहे. कंपनीने १२५ कोटींचे कर्ज फेडून नेट-कॅश पॉझिटिव्ह स्थिती मिळवली आहे, जे रिअल्टी क्षेत्रातील कंपनीसाठी महत्त्वाचे आहे.

बीएसई लिमिटेडनेही या तिमाहीत दमदार झेप घेतली आहे. महिन्याभरात शेअर किंमत २० टक्क्यांनी वाढलेली असताना वर्षाच्या तुलनेत नफा ६१ टक्क्यांनी वाढून ५५८ कोटींवर पोहोचला आहे. उत्पन्नात ४४ टक्के वाढ झाली असून ट्रान्झॅक्शन चार्जच्या कमाईतून मोठा फायदा मिळाला आहे. ईबिट्डामध्ये ७८ टक्के वाढ होऊन मार्जिन ५२ टक्क्यांवरून ६४ टक्क्यांपर्यंत गेले आहे. फोर्टिस हेल्थकेअर या हॉस्पिटल चेननेही गेल्या तिमाहीत मजबूत ऑपरेशनल कामगिरी केली आहे. नफा ८२ टक्क्यांनी वाढून ३२२ कोटींवर गेला आहे, तर उत्पन्न १७ टक्क्यांनी वाढले आहे. ईबिट्डातील वाढीमुळे मार्जिन २१ टक्क्यांवरून २३ टक्क्यांवर गेले असून ते आरोग्य क्षेत्रातील सुधारित मागणी अधोरेखित करते.

दरम्यान फोर्स मोटर्सने नफ्यात थेट १६० टक्क्यांची झेप घेतली आहे. उत्पन्नात ७ टक्क्यांची वाढ, तर ईबिट्डामध्ये २८ टक्क्यांची वाढ झाल्याने मार्जिन १४ टक्क्यांवरून १७ टक्क्यांपर्यंत गेले आहे. कंपनीची वाहन विक्री आणि ऑपरेशनल नियंत्रण हे दोन्ही घटक येथे महत्त्वाचे ठरतात.

ईआयडी पॅरीनेही या तिमाहीत अत्यंत मजबूत निकाल जाहीर केले आहेत. नफा ३९ टक्के, उत्पन्न २९ टक्के आणि ईबिट्डा ६१ टक्क्यांनी वाढल्याने ऑपरेटिंग प्रॉफिटमध्ये ७२ टक्क्यांची मोठी झेप दिसून आली आहे. कंपनी आपली मुख्य कामकाजे अधिक कार्यक्षम पद्धतीने हाताळत असल्याचे या निकालांतून स्पष्ट होते.

पारग मिल्क फूड्सचा नफाही ६० टक्क्यांच्या जवळपास वाढला असून उत्पन्नात १५ टक्क्यांची वाढ झाली आहे. कंपनीची यूएई सबसिडियरी अद्याप पूर्णपणे कार्यरत नसली तरी मुख्य कामकाजात स्थिर वाढ दिसते.

# अल्पकालीन दृष्टीकोनातून समभाग निवडताय ?

शेअर बाजारातील गुंतवणूक ही दीर्घकालीन दृष्टिकोन ठेवून केल्यास दमदार आणि खात्रीशीर नफा मिळतो, हे बाजार अभ्यासकांकडून, गुंतवणूक सल्लागारांकडून वारंवार सांगितले जाते. परंतु तरीही अनेक गुंतवणूकदारांची इतका काळ थांबण्याची मानसिकता नसते. असे अनेक जण मध्यम किंवा अल्पकालीन दृष्टीकोन घेऊन बाजारात उतरतात आणि शक्य तितक्या वेगाने नफा कमावून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतात. प्रॉफिट मार्ट सिक्युरिटीजचे आशिष बहेती यांनी अलीकडेच सीएनबीसीवरील कार्यक्रमामध्ये सद्यस्थितीत अशा गुंतवणूकदारांसाठी तीन समभागांची शिफारस केली आहे. हे तीन समभाग म्हणजे आयसीआयसीआय बँक, हिंदुस्तान झिंक आणि टाटा स्टील. या तिन्ही समभागांबाबत त्यांनी अल्पकालीन अंदाज मांडले आहेत. हे अंदाज गुंतवणूकदारांनी विचारलेल्या प्रश्नांवर आधारित आहेत. त्यानुसार आयसी आयसीआय बँकेचा समभाग अल्पकालीन ट्रेडसाठी योग्य पर्याय मानत आशिष यांनी तो खरेदीचा सल्ला दिला आहे.



आगामी तीन ते सहा महिन्यांच्या कालावधीत १४८० ते १५२० पर्यंत हा समभाग झेपावू शकेल अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली असून या समभागासाठी त्यांनी १३०० चा स्टॉप लॉस ठेवण्याचा सल्लाही दिला आहे. दरम्यान मेटल क्षेत्र गेल्या काही दिवसांत अत्यंत मजबुती दाखवत असून हिंदुस्तान झिंक त्यात विशेष ठळकपणे दिसत आहे. सिल्व्हरच्या किमतींतील हालचाली लक्षात घेता तीन ते सहा महिन्यांच्या कालावधीत या शेअरमध्ये ६०० ते ६५० पर्यंत वाढ होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. यासाठी ४८० चा स्टॉप लॉस ठेवण्याची त्यांनी सूचना केली आहे. तसेच मेटल क्षेत्रात नॉन-फेरस शेअर्स ज्या वेगाने धावत आहेत तितकीच गती फेरस शेअर्समध्ये दिसत नसली तरी टाटा स्टीलमध्येही अल्पकालीन वाढ होऊ शकते असे आशीष यांचे म्हणणे आहे. अल्पकालीन दृष्टीने या समभागाच्या किमतीत १७५ चा स्तर पाहायला मिळू शकतो असे त्यांनी नमूद केले आहे. यासाठी १६४ चा स्टॉप लॉस ठेवण्याचा सल्ला त्यांनी दिला आहे. अर्थात हा त्यांनी व्यक्त केलेला अंदाज असून कोणताही निर्णय घेण्यापूर्वी आपली जोखीम क्षमता आणि गुंतवणुकीची योजना लक्षात घेणे नेहमीच आवश्यक असते.

# ८० जीजी सवलत महत्त्वाची; पण...

अलीकडील काळात भाड्याने घर घेताना मिळणाऱ्या करसवलतींबद्दल अनेक शंका विचारल्या जातात आणि त्यात सेक्शन ८०जीजी ही सवलत विशेष महत्त्वाची मानली जाते. ही सवलत फक्त त्यांनाच मिळते जे लोक एचआरए घेत नाहीत आणि जे स्वतः ज्या घरात राहतात त्या घराचे भाडे भरतात. सवलत मिळण्यासाठी काही स्पष्ट नियम आहेत आणि ते नियम न पाळल्यास भाडे भरत असतानाही वजावट मिळत नाही.




सर्वात महत्त्वाचा नियम असा आहे की ज्या शहरात तुम्ही भाड्याने राहता त्या शहरात तुमच्याकडे स्वतःची मालमत्ता असू नये. त्या घरात तुम्ही राहात असाल, ते भाड्याने दिले असेल किंवा रिकामे ठेवले असेल या तिन्ही परिस्थितीत तुम्हाला ८०जीजी लागू होत नाही. हा नियम तुमच्या जोडीदारावर, तुमच्या अल्पवयीन मुलावर आणि तुमच्या एचयूएफवरही लागू होतो. याचा अर्थ असा की तुम्ही जिथे भाड्याने राहता त्या शहरात तुमच्या कुटुंबातील कोणीही मालमत्ता बाळगत असेल तर सवलत मिळण्याचा हक्क संपतो.

दुसरा नियम असा की भारतातील इतर कोणत्याही ठिकाणी तुमच्याकडे स्वतःच्या वापरासाठी रिकामं ठेवलेलं घर नसावं. जर तुम्ही एखादं घर माझ्यासाठी राखून ठेवलेलं या अर्थाने रिकामं ठेवत असाल, तर त्या घराचा पत्ता वेगळ्या शहरात असला तरी ८०जीजी लागू होत नाही. मात्र घर भाड्याने दिलं असेल, म्हणजे ते प्रत्यक्ष व्यावसायिक वापरात असेल, तर ही अडचण राहत नाही.

सवलतीची रक्कमही मर्यादित आहे. तुमचं भाडं वर्षभरात तुमच्या एकूण उत्पन्नाच्या दहा टक्क्यांपेक्षा जास्त असलं तरच वजावट मिळते आणि वजावट जास्तीत जास्त पाच हजार रुपये प्रतिमहिना किंवा एकूण उत्पन्नाच्या पंचवीस टक्क्यांपर्यंत मिळू शकते. शेवटचा नियम असा की ही सवलत फक्त जुन्या करप्रणालीमध्ये उपलब्ध आहे आणि नवीन करप्रणालीमध्ये ती मिळत नाही.

याचा सरळ निष्कर्ष असा की तुम्ही भाड्याने राहत असलेल्या शहरात तुमच्यासह तुमच्या कुटुंबातील कुणाकडेही घर नसावे आणि देशात कुठेही स्वतःच्या वापरासाठी रिकामं ठेवलेलं घर नसावं. घरं भाड्याने दिलेली असल्यास अडचण राहत नाही. हे दोन्ही नियम पाळले तरच सेक्शन ८०जीजी अंतर्गत वजावट मिळण्याची संधी उपलब्ध होते.

# क्रेडिट कार्ड बिलासंदर्भातील वाद सोडवताना...

क्रेडिट कार्ड वापरणे सोपे असले तरी अनेकदा आपल्या नकळतपणाने कंपन्यांकडून काही शुल्क किंवा चार्जेसची आकारणी करणे, चुकीची रक्कम बिलामध्ये नमूद केली जाते, डुप्लिकेट एंट्री किंवा व्यापाऱ्याची चूक, सायबर ठकसेनांकडून फसवणूक होणे यांसारख्या धोक्यांची टांगती तलवार वापरकर्त्यांच्या डोक्यावर सदैव असते. हल्ली एखाद्या सबस्क्रिप्शनचे ऑटो-रिन्यूअल आपल्या परवानगीशिवाय केले जाणे यांसारख्या गोष्टीही घडू लागल्या असून त्यावरुन क्रेडिट कार्ड वापरकर्ते आणि ते पुरवणारी वित्तसंस्था यांच्यात वादाचे प्रसंगही उद्भवत आहेत. अशा प्रकारचे वाद उद्भवल्यानंतर काय करावे?

### प्रथम: तुमचे स्टेटमेंट नीट तपासा

काहीतरी चूक आढळल्यावर तत्काळ तुमच्या बँकिंग ॲपमधील तपशीलवार व्यवहार यादी उघडा. अनेक बँका तारीख, वेळ, मर्चंट कोड, स्थान आणि व्यवहार प्रकार अशी तपशीलवार माहिती दाखवतात. जर काही चार्जेस शंकास्पद वाटत असतील तर अचूक रक्कम, तारीख आणि संदर्भ क्रमांक नोंदवून ठेवा. तक्रार नोंदवताना त्यांची गरज भासते.

### व्यापाऱ्याशी आधीच पुष्टी करा

जर व्यवहार दुकान, रेस्टॉरंट, प्रवास-बुकिंग किंवा ऑनलाईन सेवेशी संबंधित असेल तर व्यापाऱ्याशी थेट संपर्क साधणे उपयुक्त ठरते. अनेक वाद हे या टप्प्यावरच सुटतात, कारण व्यापारी किंवा सेवापुरवठादार तात्काळ तपासून चुका मान्य करतो आणि काही दिवसात हे पैसे आपल्या बँक खात्यात जमा होतात. पण व्यापाऱ्याने तसे करण्यास नकार दिला तर अधिकृत तक्रार करा.

### वाद तात्काळ बँकेकडे नोंदवा

क्रेडिट कार्ड देणाऱ्या बँकेकडे मोबाईल ॲप, फोन बँकिंग किंवा सिक्युअर मेसेजद्वारे वाद नोंदवण्याचा पर्याय असतो. तक्रार नोंदवल्यानंतर बँक तपास सुरू करते. कदाचित तुम्हाला बिलांचे फोटो, संभाषणाचे स्क्रीनशॉट्स, व्यापाऱ्याकडून आलेला ई-मेल किंवा लिखित स्पष्टीकरण अपलोड करण्यास सांगण्यात येईल. वाद नोंदविल्याबरोबर बँक पुष्टीपत्र देते आणि संदर्भ क्रमांक देतात. अनेक बँका तात्पुरते क्रेडिट देतात. त्यामुळे तपास चालू असताना तुम्हाला ते नुकसान सहन करावे लागत नाही.



### बँकेच्या तपासाचे वेळापत्रक लक्षात ठेवा

व्हिसा किंवा मास्टरकार्डसारख्या आंतरराष्ट्रीय पेमेंट नेटवर्कचा वापर झाला असल्यास बिले तपासण्यास साधारण ३० ते ९० दिवस लागू शकतात; या काळात एसएमएस आणि ई-मेल अलर्ट तपासत राहणे आवश्यक ठरते. बिलासंबंधात वाद असला तरी त्याची देय तारीख चुकवू नये. कारण त्यामुळे विलंब शुल्कआकारणी सुरू होते. गरज भासल्यास बिलातील ज्या एंट्री चुकीच्या वाटत आहेत तेवढी रक्कम वगळून उर्वरित बिल रक्कम भरावी. क्रेडिट कार्ड बिलासंबंधी वाद सुरू असताना तुमच्याकडे अतिरिक्त पुरावे मागितले जाऊ शकतात. ते जितक्या लवकर द्याल, तितक्या लवकर तपास संपतो. तपास पूर्ण होताच बँक निकाल लेखी स्वरूपात देते.

समस्येचे निराकरण झाल्यावर कार्ड सेटिंग्ज तपासणे योग्य असते. आंतरराष्ट्रीय व्यवहार बंद करा, कॉँटॅक्टलेस पेमेंट बंद ठेवा, ऑटो डेबिट थांबवा. तसेच लिंक असलेल्या ॲप्स-सब्सक्रिप्शन्स पुन्हा तपासा.

# डीकेटीईचा आयआयसी मीटमध्ये बेस्ट पोस्टर पुरस्काराने सन्मान

इचलकरंजी,ता.७ –

**डीकेटीईच्या टेक्स्टाईल अ‍ॅन्ड इंजिनिअरींग इन्स्टिटयूटने पुन्हा एकदा इन्व्होवेशन क्षेत्रात आपली भक्कम छाप उमटवत मोठे यश मिळविले आहे. एआयसीटीई आणि मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन, इंडस्ट्री इन्व्होवेशन कौन्सिल (आयआयसी) यांच्या संयुक्त विद्यमाने सिंबॉयसिस इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (पुणे)येथे आयआयसी रिजनल मीट – २०२५ मध्ये डीकेटीईने बेस्ट पोस्टर प्राईज पटकाविला. या पुरस्कारामुळे डीकेटीईची नवकल्पना व तंत्रज्ञानातील पकड प्रादेशिक पातळीवर अधिक अधोरेखीत झाली आहे.**



सिंबॉयसिस इन्स्टिटयूट येथे आयआयसी मीटमध्ये बेस्ट पोस्टर पुरस्कार स्विकारताना डॉ.टी.आय.बागबान व डॉ.ए.डी. काडगे.

स्पर्धेत देशभरातील सुमारे १५० हून अधिक इंजिनिअरींग कॉलेजसनी सहभाग नोंदवला होता. डीकेटीईने इन्व्होवेशन व स्टार्टअप इकोसिस्टीम मध्ये केलेल्या प्रभावपूर्ण उपक्रमांची सुस्पष्ट व आकर्षक मांडणी करण्यात आली होती. या पोस्टरची संकल्पना डॉ.टी.आय.बागबान यांनी केली. त्यांना डॉ.ए.डी. काडगे यांची साथ लाभली. पोस्टर डिझाईनमध्ये डॉ. एम.सी.बुर्जी, डॉ.जी.सी. मेकळके,आयआयसी आणि युक्ती सेल यांचे योगदान लाभले.

कार्यक्रमामध्ये विद्यार्थी व प्राध्यापकांनी नाविन्यपूर्ण कल्पना शोधणे, उद्योजकीय कौशल्यांचा विकास करणे आदी विषयांवर समविचारी व्यक्तींशी उहापोह झाला. या मीटमध्ये युक्ती इनोव्हेशन चॅलेंज या देशस्तरीय स्पर्धेमध्ये डीकेटीईतून निवड करण्यात आलेल्या ३ प्रकल्पांचे एआयसीटीईकडून फंडीग मिळण्यासाठी सादरीकरण करण्यात आले. यामध्ये प्रा.राजेंद्र हिरेमठ यांनी डीझीटलाईझड बस पास मॅनेजमेंट सिस्टीम, इटीसीमधील विद्यार्थी अद्वैत कुलकर्णी यांने आयओटी वर अधारित स्मार्ट कॉलर गुरांचे आरोग्य व सुरक्षीतता तर तनिशा गुलवाणी व अंकिता मोलकर यांनी ज्येष्ठांसाठी फॉल डिटेक्शन व प्रिव्हेन्शन सिस्टीम यांचे सादरीकरण केले.संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, उपाध्यक्ष प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ.सपना आवाडे, कार्यकारी संचालक रवी आवाडे व सर्व विश्वस्त यांचे प्रोत्साहन तर प्रा.डॉ.एल.एस.अडमुठे,डॉ यु.जे.पाटील, डॉ. डी.व्ही.कोदवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# मिरज तालुका व ग्रामीण भागात सर्रास गुटखा विक्री

## प्रशासनाची सोयीस्कर डोळेझाक

मिरज,ता.७(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र राज्यात गुटखाबंदी आहे. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील युवक पिढीच्या आरोग्यासाठी महाराष्ट्र शासनाने गुटखाबंदीचा निर्णय घेतला आहे. परंतु गुटखाबंदी असूनही मिरजेसह परिसरातील बाजारपेठा, उपनगरांमध्ये आणि मुख्य मार्गालगत गुटख्याची बेकायदेशीर विक्री सर्रास सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. मिरजेत किराणा दुकानात व टपरीवर राजरोसपणे गुटखा विकला जात आहे. याकडे अन्न व औषध प्रशासन मात्र डोळेझाक करत असल्याने याचे गंभीर परिणाम युवा पिढीवर होत आहेत.**

वास्तविक पाहता महाराष्ट्र राज्यात २०१२ पासून गुटखाबंदी आहे. तरुणांचे व एकूणच सामाजिक आरोग्य लक्षात घेवुन तत्कालीन सरकारने राज्यात गुटखविक्री, सुगंधी तंबाखू, सुगंधी सुपारी व इतर तत्सम पदार्थांच्या निर्मितीसाठी बंदी घातली होती. त्यासाठी कडक शिक्षेची व फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कायदेशीर तरतूद करण्यात आली आहे. किंबहुना काही ठिकाणी गुटखा विक्री करणाऱ्या दुकानदारावर अजामीनपात्र गुन्हा दाखल करून दहा वर्षांपर्यंत शिक्षाही करण्यात आली आहे. मात्र, आज मिरज ग्रामीण भागासह शहरी भागातही गुटखाविक्री होत आहे.

गुटख्याच्या एका पुडीच्या मूळ किमतीच्या दुप्पट किंमत वसूल करून किराणा मालाचे दुकानापासून ते पानाच्या टपरीपर्यंत आणि छोट्याशा हॉटेलपासून ते ढाब्यापर्यंत सर्वच ठिकाणी सर्रासपणे गुटख्याची विक्री होताना दिसत आहे. वास्तविक महाराष्ट्रातील युवा पिढी गुटख्याच्या सेवनामुळे विविध रोगांना बळी पडत होती. गुटख्याच्या व्यसनापासून महाराष्टातील युवक परावृत्त व्हावा, यासाठी गुटखाबंदी करण्यात आली होती. परंतु उघडपणे मिळणारा गुटखा, मावा आता तस्करीने विकला जात आहे. प्रत्येक खेडेगावात व शहरांमध्येही सहजपणे उपलब्ध होत असल्याने गुटखाबंदीचा मूळ हेतू बाजूला पडला असल्याचे दिसत आहे. यावर अन्न व औषध प्रशासनाचा पुरेसा अंकुश नसल्यानेच राजरोसपणे त्याची विक्री होत आहे.

**महात्मा गांधी चौक नव्हे 'लाल चौक'**

मिरजेतील मध्यवर्ती गांधी चौक हा शहरातील मुख्य चौक म्हणून ओळखला जातो. व्यापार वाहतूक आणि नागरिकांची सर्वाधिक वर्दळ येथे असते तोच चौक आज गुटखा आणि माव्याच्या पिचकाऱ्यांनी अक्षरशः 'लाल चौक' बनला आहे. सगळे नियम धाब्यावर बसवून गुटखा विक्री होत आहे. गुटखा माफियांवर पोलिसांचा वचक कमी आहे हे स्पष्ट असून किमान आचारसंहिता निवडणूक काळात तरी हे थांबले पाहिजे असे नागरिकांकडून बोलले जात आहे.

# श्री स्वामी समर्थांच्या पादुकांचा मिरजेत १० रोजी दर्शन सोहळा

मिरज,ता.७ (प्रतिनिधी)–

**अक्कलकोट राजघराण्याचे श्रीमंत मालोजीराजे भोसले द्वितीय यांना सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराजांनी प्रत्यक्ष कृपावंत होऊन आपल्या पवित्र पादुका प्रदान केल्या होत्या. या पवित्र चरण कमलाचे दर्शन विद्यमान नरेश श्रीमंत मालोजीराजे संयुक्त राजे भोसले तिसरे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आले आहे.**

या पादुका भाविकांच्या दर्शनासाठी ६ डिसेंबर पासून दौरा करणार आहेत.मिरज संस्थानचे युवराज श्रीमंत माधवराजे पटवर्धन महाराज यांच्या माध्यमातून मिरज येथे मिरजनगरीतील सर्व स्वामी भक्तांना श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पवित्र पादुकाचे १० डिसेंबर रोजी दर्शन सकाळी नऊ ते सायंकाळी आठ वाजेपर्यंत माधवजी देवालय किल्ला भाग मिरज येथे उपलब्ध होणार आहे. या सोबतच अक्कलकोट राजघराण्याचे श्रीमंत मालोजीराजे भोसले स्वामी भक्तांच्या सेवेसाठी श्री स्वामी समर्थांची १०८ फूट भव्य दिव्य मूर्ती ध्यानकेंद्र, चिकित्सालय, उद्यान, भक्तनिवास आणि इत्यादी अशा मूलभूत आणि पूरक सुविधांचा विकासाचे नियोजन करण्यात आले आहे.



# प्रभाग क्र. १० मध्ये हॉट मिक्स रस्त्याचा शुभारंभ

इचलकरंजी,ता.७–

**येथील प्रभाग क्र.१० मधील मुक्त सैनिक सोसायटी मधील रस्ता अनेक वर्ष मंजूर असून ही होत नव्हता, मा. उपनगराध्यक्ष रवी रजपुते यांच्या पाठपुराव्याने भाजपा पूर्व अध्यक्ष रंगा खवरे व मा. उपनगराध्यक्ष रवी रजपुते यांच्या उपस्थितीत शुभारंभ हॉट मिक्स रस्त्याचा शुभारंभ झाला.**

त्यावेळेस किरण पोवार, दयानंद तासगावे, पिंटू मांगले, किरण कुबेर, भानुदास तासगावे, चंद्रकांत, गणेश गोरे, दीपक कोळेकर, सर्जेराव पाटील, मोठे अण्णा, सादिक बागवान, रघुनाथ टेके, संतोष डोंगरे, सनी यादव, दिग्विजय यादव, महेश वेदांते, प्रकाश गायकवाड, अनुप आमने, चंद्रकांत जाधव, सुरेश सावंत, मुक्त सैनिक गणेशोत्सव मंडळ व मुक्त सैनिक नवरात्र उत्सव मंडळातील कार्यकर्ते उपस्थित होते.

# खाटांगळे येथे आमदार नरके यांच्या फंडातून विकास कामांचे उद्घाटन

सांगरूळ,ता.७ (वार्ताहर)–

**आम. चंद्रदीप नरके यांच्या फंडातून खाटांगळे (ता. करवीर ) येथील विठ्ठलाई मंदीर परिसर सुशोभिकरण करणे २५ लाख विठलाई मंदिर सभा मंडप बांधणे २५ लाख ,अंगणवाडी इमारत बांधकाम करणे ११ लाख २५ हजार , मागासवर्गीय वस्तीमध्ये सौरऊजा मिनी हायमास्ट बसविणे ५ लाख १६ हजार असा ६६ लाख ४१ हजार रुपये निधी मंजूर झाला आहे .या विकास कामांचा शुभारंभ केला.**

यावेळी बोलताना आमदार चंद्रदीप नरके म्हणाले,करवीर मतदार संघातील प्रत्येक गावात विकास कामासाठी निधी दिला आहे .



खाटांगळे येथे विविध विकास कामांचे उद्घाटन कार्यक्रमात आमदार चंद्रदीप नरके ,संताजी पाटील, राहूल खाडे ,निवास वातकर, प्रकाश पाटील व इतर

खाटांगळे गावातील ग्रामदैवत विठ्ठलाई देवी मंदिराबरोबरच व गावातील इतर विकास कामाला निधी दिला आहे. प्रास्ताविक सिंताजी पाटील यांनी केले. यावेळी कुंभीचे व्हा. चेअरमन राहूल खाडे, निवास वातकर संताजी पाटील, प्रकाश पाटील, विश्वास पाटील, भिकाजी पाटील, संभाजी पाटील ,पंडीत पाटील,तुषार पाटील, एकनाथ पाटील, अभिजीत खाडे यांचे सह ग्रामस्थ उपस्थित होते. आभार विश्वास पाटील यांनी मानले.

# मंदिरातील चोरीचा छडा : सराईत चोरट्याला अटक

सांगली, ता. ७(प्रतिनिधी )–

**वाळवा तालुक्यातील शिगाव येथील विठ्ठल–बिरदेव मंदिरात दीड महिन्यापूर्वी झालेल्या चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी सराईत चोरटा प्रकाश जगन्नाथ सदामते (वय ३२, रा. आमनापूर,ता. पलूस ) याला अटक केली आहे.त्याने चोरलेले देवीच्या गळ्यातील सुमारे ६० हजार रुपये किमतीचे अर्ध्या तोळ्याचे मनीमंगळसूत्र पोलिसांनी जप्त केले आहे.**



दीड महिन्यापूर्वी शिगाव येथील विठ्ठल बिरदेव मंदिरातील श्री लक्ष्मी देवीच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरून नेल्याची घटना घडली होती.हा प्रकार दिवसाढवळ्या घडला होता. याप्रकरणी आष्टा पोलिसात चोरीचा गुन्हा दाखल झालेला होता. या गुन्ह्यातील चोरट्याचा शोध घेऊन कारवाई करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवकुमार झाडे यांनी दिले होते. त्या अनुषंगाने सहाय्यक पोलीस निरीक्षक जयदीप कळेकर यांचे पथक आष्टा भागात गस्त घालत होते. त्यावेळी पथकातील अंमलदार अभिजीत ठाणेकर आणि सुरज थोरात यांना एकजण चोरीचे दागिने विक्री करण्यासाठी मिरजवाडी परिसरात येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा लावून सराईत चोरटा प्रकाश जगन्नाथ सदामते हा पोलिसांच्या तावडीत सापडला. त्याच्या अंगझडतीत त्याच्याकडे अर्ध्या तळ्याचे मंगळसूत्र आणि काही रोकड सापडली. अधिक चौकशी केली असता त्याने दीड महिन्यापूर्वी शिगाव येथील मंदिरात चोरी केली असल्याची कबुली दिली आहे.

# आम.यड्रावकर यांच्या माध्यमातून दत्तवाड ग्रामीण रुग्णालय इमारतीच्या कामाला गती

जयसिंगपूर, ता .७ (प्रतिनिधी)–

**७२ गुंठ्यांवर अत्याधुनिक इमारतीचे बांधकाम, ५० खाटांचे रुग्णालय, स्त्रीरोग व पुरुष वॉर्ड, दोन ऑपरेशन थिएटर, कन्सल्टिंग रूम्स, एक्स–रे, दंत, नेत्र, बालरोग विभाग, सर्व प्रकारच्या सर्जरी सुविधा, असणार गर्भवती महिलांसाठी विशेष व्यवस्था, शवविच्छेदन व एमएलसी सुविधा, महात्मा फुले जनआरोग्य योजना व योजनांचा लाभ, आयुर्वेदिक व होमिओपॅथिक उपचार सुविधा, महालॅबच्या माध्यमातून सर्व प्रकारच्या तपासणी सुविधा या कुठे खाजगी रुग्णालयात नाही तर दत्तवाड येथील ग्रामीण रुग्णालयासाठी आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या माध्यमातून १६ कोटी १५ लाखांच्या निधीतून ग्रामीण रुग्णालयाची इमारत साकारत आहे.**



दत्तवाड परिसरातील नागरिकांच्या आरोग्यसेवेला प्राधान्य देऊन सध्या युद्धपातळीवर उभारत आहे. ग्रामीण भागातही उत्कृष्ट आणि सर्वसमावेशक रुग्णालय उभारण्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी १६ कोटी १५ लाखांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. काही महिन्यांपूर्वी पालकमंत्री प्रकाश आंबेडकर यांच्या हस्ते या रुग्णालयाच्या पाया खोदण्याचा शुभारंभ झाला आणि त्यानंतर कामाला मोठा वेग आला आहे. ७२ गुंठ्यांवर उभारत असलेले हे रुग्णालय आधुनिक वैद्यकीय सुविधांनी परिपूर्ण असेल. ५० खाटांची क्षमता, स्वतंत्र स्त्रीरोग व पुरुष वॉर्ड, दोन अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, विविध तज्ञ डॉक्टरांसाठी कन्सल्टिंग रूम्स, एक्स–रे विभाग, दंत, नेत्र आणि बालरोग विभाग अशा सर्व सुविधा एका छताखाली उपलब्ध होणार आहेत. गर्भवती महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था, सुरक्षित प्रसूतीसेवा, नवजात बालकांसाठी विशेष देखभाल विभाग उपलब्ध होत असल्याने ग्रामीण भागातील महिलांसाठी हा विभाग अत्यंत महत्त्वाचा ठरेल. महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि योजनांचा लाभ या रुग्णालयात थेट मिळणार असल्याने ग्रामीण जनतेसाठी मोठा दिलासा मिळणार आहे.

# कंटेनरची ट्रॅक्टर–ट्रॉलीला धडक; चालक जखमी

कोगनोळी, ता.७ (प्रतिनिधी)–

**कंटेनर चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने कंटेनरने ट्रॅक्टर–ट्रॉलीला पाठीमागून जोरात धडक दिली. हा अपघात पुणे–बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारवरील आप्पाचीवाडी फाट्यावर शुक्रवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास घडला. कंटेनर चालक सचिन विश्वकर्मा (वय – ३३, रा. उत्तरप्रदेश) हा जखमी झाला.**



ऊसाने भरलेली ट्रॅक्टर–ट्रॉली कागलकडे निघाली असताना भरधाव आलेल्या कंटेनर चालकाचा ताबा सुटल्याने पाठीमागून ट्रॅक्टर–ट्रॉलीला धडक बसली. त्यामुळे कंटेनरच्या पुढील भागाचा चक्काचूर झाला तर ट्रॅक्टर–ट्रॉलीच्या मागील भागाचे नुकसान झाले. अपघातातील जखमी चालक सचिन विश्वकर्मा याला तात्काळ मदतकार्य हाती घेऊन रस्ते देखभाल अवताडे कंपनीच्या भरारी पथकाने मदत केली. निरीक्षक संतराम माळगे यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी करुन पोलीसांना पाचारण केले.

या घटनेची माहिती मिळताच निपाणी ग्रामीण पोलीस ठाण्याचे फौजदार शिवराज नाईकवाडी व पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमी चालकाला उपचारासाठी त्वरीत निपाणी येथील महात्मा गांधी रुग्णालयात दाखल केले.

# घाबरू नका ..पोलिस प्रशासन सदैव तुमच्या सोबत : गोपाळकृष्ण गौडर

## वाढत्या चोरींच्या पार्श्वभूमीवर निपाणीत बैठक

निपाणी,ता.७ (प्रतिनिधी)–

**शहर व उपनगरात गेल्या काही दिवसापासून चोरीच्या घटनामध्ये वाढ झाली आहे.या चोरींचा छडा लावण्यासाठी पोलीस प्रशासनसुद्धा प्रयत्न करत आहे.पोलिसांसह नागरिकांनीही जबाबदारीचे भान ठेवत जागरूक राहिले पाहिजे.कोणीही घाबरून जाऊ नये. पोलिस प्रशासन नागरीकांच्या पाठीशी आहे, असे मत चिकोडीचे पोलीस उपाधीक्षक गोपाळकृष्ण गौडर यांनी व्यक्त केले.**



निपाणी: नागरीकांच्या बैठकीत बोलताना डीएसपी गोपाळकृष्ण गौडर,शेजारी सीपीआय बी. एस. तळवार.

निपाणीत वाढत्या चोरीच्या पार्श्वभूमीवर उपाधीक्षक गौडर यांनी निपाणीला भेट देऊन शहर पोलीस ठाण्यात नागरिक व पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेऊन मार्गदर्शन केले.स्वागत उपनिरक्षक शिवानंद कार्जोळ यांनी केले.

गौडर पुढे म्हणाले, घरात सीसीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबरोबरच घरातून बाहेर जात असताना शेजाऱ्यांना माहिती देणे गरजेचे आहे.बाहेर जात असताना मौल्यवान वस्तू घरामध्ये ठेवू नये, सोने लॉकरमध्ये ठेवावे.आपल्या परिसरात अनोळखी व्यक्ती दिसून आल्यास तात्काळ पोलीस ठाण्याला संपर्क करा.

यावेळी सीपीआय बीएस तळवार, उपनिरीक्षक शिवानंद कारजोळ यांनीही नागरिकांना मार्गदर्शन केले.तसेच नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांचे त्यांनी निरसन केले.यावेळी नागरीक व मंडळांचे सदस्य उपस्थित होते.

# सागाव मुख्य पेठेतील वाहतुकीची कोंडी संपणार

शिराळा,ता.७ (प्रतिनिधी)–

**सागाव येथील तळ्याच्या पाळीचा रस्ता सागावच्या रहदारीच्या साठी अत्यंत आवश्यक परंतु तितकाच दुर्लक्षित राहिला होता. जवळपास पाच एकरातील तळ्याकाठी असलेल्या या बाह्य वळण रस्त्यावरून गावाच्या पूर्वेकडील शेकडो एकरामधील ऊस वाहतुकीसह शेतमालाची ने आण होत असते.गावच्या विस्तार वाढीमुळे हल्ली काही नव्याने घरी देखील या परिसरात होत आहेत.काळ्या मातीतून असलेल्या या रस्त्याला पावसाळ्यात वाहन तर लांबच चिखल तुडवत चालणे देखील अशक्यप्राय होत होते.**

आम. सत्यजित देशमुख यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी या रस्त्यासाठी दहा लाखाची तरतूद करून भूमिपूजन केले होते.निधीची उपलब्धता नसल्याने थोडे काम रखडले होते परंतु गावच्या सुदैवाने किरण गायकवाड व त्यांच्या सहकार्यानी हा मक्ता घेतला असल्याने मंजूर अंदाजपत्रकापेक्षा अधिक रकमेचे काम तेथे चालू आहे.सुरुवातीला मुरूम,सपाटीकरण,मोठी खडी,बारीक खडी असे वेगवेगळे स्तर होऊन जवळपास एक फूट उंचीने व पंधरा फूट रुंदीने जवळपास तीनशे मीटर लांबीच्या या डांबरी रस्त्यामुळे नागरिकांच्या सोयीबरोबरच गावाच्या वैभवात देखील भर पडणार आहे.



सरपंच सौ.अस्मिता पाटील यांनी भेट देऊन कामाची पाहणी केली.यावेळी श्री.गायकवाड यांनी रस्ते बांधकामाची तांत्रिक माहिती सांगून दिली.नागरिकांच्या अत्यंत गरजेचा हा रस्ता पूर्णत्वास येत असल्याचा आपणास मनस्वी आनंद होत असल्याचे सरपंच सौ पाटील म्हणाल्या.

# निपाणीत गांजा ओढणाऱ्या तिघांवर कारवाई

निपाणी,ता.७(प्रतिनिधी)–

**शहर व परिसरात विविध सार्वजनिक ठिकाणी गांजा ओढणाऱ्या तिघांवर शहर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक शिवानंद कार्जोळ यांनी कारवाई केली.**

ओम शहाजी भोई (वय २०) श्रेयश शाम इंगवले (वय २०) रा घट्टे ,गल्ली,निपाणी व प्रशांत संजय केसरकर (वय २७) रा.केसरकर मळा, निपाणी अशी कारवाई झालेल्या तिघांची नावे आहेत.या तिघांवर अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये कारवाई करून नोटीस दिल्याची माहिती उपनिरीक्षक कार्जोळ यांनी दिली.

# भिलवडीत ललित किर्तनाने श्री दत्त जन्मोत्सवाची सांगता

भिलवडी ,ता.७(वार्ताहर)–

**मंगळवार दि.२ पासुन सुरू असलेल्या श्री दत्त जयंती उत्सवाची सांगता शनिवार दि. ६ रोजी ललित किर्तनांने झाली. यावेळी शेकडो भाविक पहाटे १२ पासुन मंदीरात उपस्थित होते.**

रात्री १२.१५ ते १.१५ वा. धुपारती, पालखी, मंत्र पुष्पांजली पहाटे ५ ते ६.३० वा. लळीताचे किर्तन वासुदेव जोशी, यांचे झाले.यावेळी नितीन गुरव, संतोष जोशी यांनी तबला व सुर साथ दिली. दरम्यान ५ वा. ३० मि. काकड आरती, सकाळी ६. ३० वा. महापुजा, मंगल आरती नंतर श्री दत्त जन्मोत्सवाची समाप्ती झाली. गेली १५ दिवस श्री दत्त सेवा भावी मंडळाने योग्य व्यवस्थापन केल्यामुळे उत्सव काळात विविध धार्मीक कार्यक्रम संपन्न झाले. श्री दत्त सेवा भावी मंडळ ( ट्रस्ट) औदुंबर - अंकलखोपचे हेमंत मिरजकर, महेश चौगुले, अशोक शिंगटे, गोरव पाटील, ग्रांमपंचायत प्रशासन, पोलिस प्रशासन, पुजारी मंडळींचे सर्व नियोजनाबद्दल भाविकांनी समाधन व्यक्त केले.

## जाहीर लिलाव

पंचायत समिती भुदरगडकडील आरोग्य विभागाच्या जिल्हा परिषद मालकीची खालील इमारत निर्लेखन करण्यात येणार असून सदर इमारतीचा जाहीर लिलाव दि. १२/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता प्राथमिक आरोग्य केंद्र, मडिलगे अंतर्गत आरोग्यवर्धिनी उपकेंद्र कूर, ता. भुदरगड येथे आयोजित केला आहे.

| अ.नं. | इमारतीचे नांव | जाहीर लिलावाची शासकीय किंमत |
|---|---|---|
| १ | आरोग्यवर्धिनी उपकेंद्र कूर | १०,१५७/- |

लिलावाच्या अटी व शर्ती दि. १२/१२/२०२५ पूर्वी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय पं.स.भुदरगड येथे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

तालुका आरोग्य अधिकारी उपअभियंता (बांधकाम) गटविकास अधिकारी
पंचायत समिती भुदरगड



इचलकरंजी : श्री शंभूतीर्थ लोकार्पण सोहळ्यानिमित्त हजारो शंभू भक्तांच्या साक्षीने ढोल ताश्यांचा निनाद झाला. (छाया : छोटूसिंग)

# ढोल-ताश्यांच्या निनादात छ.संभाजी महाराजांना मानवंदना

इचलकरंजी, ता. ७ –

**श्री शंभू तीर्थाच्या लोकार्पण सोहळ्याच्या निमित्त रविवारी इतिहास, परंपरा आणि श्रद्धेने भरलेला भव्य कार्यक्रम पार पडला. विविध ढोल पथक, ताशा पथक आणि ध्वज पथकांनी तब्बल एक हजार ढोल-ताशांच्या निनादात हजारों शंभू भक्तांच्या साक्षीने छत्रपती संभाजी महाराजांना मानवंदना दिली.**

छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळा लोकार्पण सोहळ्यानिमित्त शहरात विविध धार्मिक व ऐतिहासिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. दररोज होत असलेल्या सर्व कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. रविवारी झालेल्या कार्यक्रमात स्वयंभू, शिव शंभू, ब्रह्मांडनायक, छत्रपती शासन, केसरी, हिंदवी स्वराज्य, शिवप्रेमी आणि वाद्य संस्कार यांसारख्या पथकांनी भाग घेतला. युवक, युवती आणि महिलांनी पारंपरिक ढोल वादनाची प्रात्यक्षिके सादर करून वातावरण भारावून टाकले. तसेच कोल्हापूर येथील छत्रपती संभाजी महाराज मर्दानी खेळ पथकाने विशेष प्रस्तुती देत प्रेक्षकांची दाद मिळवली.



**रस्त्याच्या दुतर्फा लावण्यात आलेल्या भगव्या कापडी पताकामुळे संपूर्ण परिसर भगवामय झाला आहे. (छाया : छोटूसिंग)**

प्रारंभी स्मारक समितीचे अध्यक्ष गजानन महाजन यांनी ध्वज पूजन केले. आमदार राहुल आवाडे यांनी ढोल पूजन, तर माजी मंत्री प्रकाश आवाडे यांच्या हस्ते शस्त्रपूजन पार पडले. यावेळी रवींद्र माने, मदन कारंडे, सागर चाळके, तानाजी पोवार, संजय कांबळे, सुहास जांभळे, संजय तेलनाडे, प्रकाश मोरबाळे आदींसह विविध मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी शंभू तीर्थपासून महात्मा गांधी चौकापर्यंत संपूर्ण परिसर जनसागराने फुलून गेला होता.

याप्रसंगी माय फाउंडेशनतर्फे दहा हजार लाडू प्रसादाचे वितरण, तर विविध संघटनांनी पाणी व्यवस्थेची सोय केली होती. कार्यक्रमाचे नियोजन श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानच्या धारकऱ्यांनी केले होते.

# ऑस्ट्रेलियाने दुसरी कसोटी जिंकली



ब्रिस्बेन,ता.७–

**दुसऱ्या अॅशेस कसोटीत ऑस्ट्रेलियाने इंग्लंडचा ८ विकेट्सने पराभव केला. ब्रिस्बेन येथे खेळल्या गेलेल्या या दिवस-रात्र कसोटी सामन्यात इंग्लंडचा दुसऱ्या डावात २४१ धावांवर आटोपला होता. आणि त्यांना ६४ धावांची आघाडी मिळाली. यामुळे चौथ्या दिवशी ऑस्ट्रेलियासमोर ६५ धावांचे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरादाखल, यजमानांनी दुसऱ्या डावात दोन विकेट्स गमावून ६९ धावा केल्या आणि विजय नोंदवला. यासह, ऑस्ट्रेलियाने पाच सामन्यांच्या अॅशेस कसोटी मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाने पाहुण्या संघाचा ८ विकेट्सने पराभव केला होता.**

वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने ऑस्ट्रेलियाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने एकूण आठ विकेट्स घेतल्या (पहिल्या डावात सहा आणि दुसऱ्या डावात दोन) आणि ७७ धावांची उपयुक्त खेळीही केली. स्टार्कसोबत, मायकेल नेसरने दुसऱ्या डावात पाच विकेट्स घेतल्या, ज्यामुळे संपूर्ण सामन्यात त्याचे एकूण सहा विकेट्स झाले. मिचेल स्टार्कला त्याच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

इंग्लंडने पहिल्या डावात ३३४ धावा केल्या. नाणेफेक जिंकल्यानंतर इंग्लंडने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि पहिल्या डावात ३३४ धावा केल्या. अनुभवी फलंदाज जो रूटने पहिल्या डावात सर्वाधिक धावा केल्या. त्याने २०६ चेंडूत नाबाद १३८ धावा केल्या. रूट व्यतिरिक्त, सलामीवीर जॅक क्रॉलीनेही ७६ धावा केल्या. जोफ्रा आर्चरने ३८ धावा, हॅरी ब्रूकने ३१ धावा, कर्णधार बेन स्टोक्सने १९ धावा आणि विल जॅक्सने १९ धावा केल्या.

ऑस्ट्रेलियाकडून मिचेल स्टार्कने पहिल्या डावात सहा विकेट्स घेतल्या, तर स्कॉट बोलँड, ब्रेंडन डॉगेट आणि मायकेल नेसरने प्रत्येकी एक विकेट घेतली. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ५११ धावा करून १७७ धावांची आघाडी घेतली. प्रत्युत्तरादाखल, ऑस्ट्रेलियाने त्यांच्या पहिल्या डावात ५११ धावांची मोठी धावसंख्या केली. यामुळे संघाला १७७ धावांची मोठी आघाडी मिळाली. पहिल्या डावात ऑस्ट्रेलियाकडून पाच खेळाडूंनी अर्धशतके केली. सलामीवीर जेक वेदरल्डने ७२ धावा, मार्नस लॅबुशाने ६५ धावा, स्टीव्ह स्मिथने ६१ धावा, अॅलेक्स कॅरीने ६३ धावा आणि मिचेल स्टार्कने ७७ धावांची अर्धशतकीय खेळी केली. याशिवाय कॅमेरॉन ग्रीनने ४५ धावा, ट्रॅव्हिस हेडने ३३ धावा आणि जोश इंग्लिसने २३ धावा केल्या.

इंग्लंडकडून ब्रायडन कार्सेने ४ आणि बेन स्टोक्सने ३ विकेट्स घेतल्या. जोफ्रा आर्चर, गस अॅटकिन्सन आणि विल जॅक्स यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली. इंग्लंडचा दुसरा डाव २४१ धावांवर मर्यादित राहिला. दुसऱ्या डावात इंग्लंडचा डाव २४१ धावांवर संपला. कर्णधार बेन स्टोक्सने १५२ चेंडूत ५० धावा केल्या. कर्णधाराव्यतिरिक्त विल जॅक्सनेही आपल्या बॅटने ४१ धावा जोडल्या. जॅक क्रॉली आणि ऑली पोप यांनीही चांगली सुरुवात केली, परंतु त्यांना मोठ्या धावसंख्येत रूपांतरित करण्यात अपयश आले. क्रॉलीने ४४ धावा केल्या, तर ऑलीने २६ धावा केल्या. पहिल्या डावात शतक झळकावणारा जो रूट दुसऱ्या डावातही चांगली कामगिरी करू शकला नाही आणि तो फक्त १५ धावांवर बाद झाला.

ऑस्ट्रेलियाकडून मायकेल नेसरने दुसऱ्या डावात ५ विकेट्स घेतल्या. मिचेल स्टार्क आणि स्कॉट बोलँड यांनी प्रत्येकी २ बळी घेतले, तर ब्रेंडन डॉगेटने १ बळी घेतला. ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या डावात ६५ धावांचे लक्ष्य ठेवले. इंग्लंडचा दुसरा डाव २४१ धावांवर संपल्यानंतर ऑस्ट्रेलियाला विजयासाठी ६५ धावांचे लक्ष्य देण्यात आले.

पहिल्या डावात ऑस्ट्रेलियाकडे १७७ धावांची आघाडी होती. परिणामी, इंग्लंडला दुसऱ्या डावात फक्त ६५ धावांचे लक्ष्य ठेवता आले. ऑस्ट्रेलियाने हे लक्ष्य १० षटकांत २ गडी गमावून गाठले. सलामीवीर ट्रॅव्हिस हेडने २२ धावा आणि मार्नस लाबुशेनने ३ धावा केल्या. अनुभवी फलंदाज स्टीव्ह स्मिथने नाबाद २३ आणि जेक वेदरल्डने नाबाद १७ धावा करून संघाला विजय मिळवून दिला. इंग्लंडकडून दुसऱ्या डावात गस अॅटकिन्सनने दोन्ही विकेट घेतल्या.

दोन्ही संघांमधील पाच सामन्यांच्या मालिकेतील तिसरा सामना १७ डिसेंबरपासून अॅडलेडमध्ये खेळला जाईल.

# भारतीय संघ टी-२० मालिकेसाठी कटकला पोहोचला; ९ डिसेंबरला द. आफ्रिकेशी सामना

कटक,ता.७–

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात पहिला टी-२० सामना ९ डिसेंबर रोजी कटक येथील बाराबती स्टेडियमवर खेळवला जाईल. सामन्यासाठी शहर आणि स्टेडियमची तयारी जवळपास पूर्ण झाली आहे. सुमारे ४५ हजार प्रेक्षकांच्या बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे आणि त्यांच्यासाठी सुरक्षा व सोयीसुविधांची चोख व्यवस्था करण्यात आली आहे.**

रविवारी भारतीय संघ कटकला पोहोचला. दोन्ही संघांना भुवनेश्वर विमानतळावरून चार बसमधून कटकला आणण्यात आले. येथे खेळाडूंनी सुमारे ४५ मिनिटे मैदानावर घालवली आणि नंतर हॉटेलवर परतले.

स्टेडियममध्ये त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. भुवनेश्वर ते कटकपर्यंतच्या मार्ग नकाशाची (रूट चार्ट) आणि वाहतूक योजनेची (ट्रॅफिक प्लान) सविस्तरपणे समीक्षा करण्यात आली आहे. सराव आणि सामन्याच्या दिवशी खेळाडूंच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. याच अंतर्गत, टीम बसच्या ताफ्याची (कारकेड) रंगीत तालीमही (रिहर्सल) करण्यात आली, जेणेकरून कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देता येईल.

**९ डिसेंबर रोजी पहिला टी-२० सामना**

कटक येथे भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात ५ सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना खेळला जाईल.

टीम इंडियाने एकदिवसीय मालिका २-१ ने जिंकली आहे, तर त्यांना २ सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-० ने क्लीन स्वीपचा सामना करावा लागला आहे.



# स्मृती मानधना - पलाश मुच्छलचे लग्न मोडले

नवी दिल्ली,ता.७–

**भारताची दिग्गज महिला क्रिकेटपटू स्मृती मानधनाने पलाश मुच्छलसोबत लग्नाबाबत मौन सोडले आहे. मानधनाने सोशल मीडियावर एक निवेदन जारी करून याला दुजोरा दिला. तिने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यामध्ये लग्न मोडले असल्याचे म्हटले आहे. मानधन आणि पलाशचे लग्न २३ नोव्हेंबर रोजी होणार होते. पण लग्नादरम्यान मानधनाच्या वडिलांची प्रकृती बिघडल्याचे उघड झाले. ज्यामुळे लग्न रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. आता १५ दिवसांनंतर, ७ डिसेंबर रोजी मानधनाने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आणि लग्न मोडल्याची कबुली दिली.**

मानधनाने तिच्या पोस्टमध्ये लिहिले आहे की, ''गेल्या काही आठवड्यांपासून माझ्या आयुष्याबद्दल खूप चर्चा होत्या. मला वाटते की, सध्या माझ्यासाठी बोलणे महत्त्वाचे आहे. मी खूप खाजगी व्यक्ती आहे आणि मी ते असेच ठेवू इच्छिते. पण मी हे स्पष्ट करू इच्छिते की, लग्न रद्द करण्यात आले आहे.भारतीय महिला संघाची उपकर्णधार मानधनाने लिहिले, मी हे प्रकरण इथेच थांबवू इच्छिते आणि तुम्हा सर्वांनाही असेच करण्याचे आवाहन करते. मी तुम्हाला विनंती करते की, तुम्ही सध्या दोन्ही कुटुंबांच्या गोपनीयतेचा आदर करा आणि आम्हाला आमच्या गतीने पुढे जाण्याची परवानगी द्या. मला वाटते की, आपल्या सर्वांच्या मागे एक मोठा उद्देश आहे आणि माझ्यासाठी, तो नेहमीच सर्वोच्च स्तरावर माझ्या देशाचे प्रतिनिधित्व करणे हा आहे. मला आशा आहे की, मी जोपर्यंत शक्य असेल तोपर्यंत भारतासाठी खेळत राहीन आणि ट्रॉफी जिंकत राहीन आणि ते नेहमीच माझे लक्ष राहील. तुमच्या सर्वांच्या पाठिंब्याबद्दल धन्यवाद. आता पुढे जाण्याची वेळ आली आहे.मानधनाने सांगितले की, तिचे आता एकमेव लक्ष तिच्या देशाचे प्रतिनिधित्व करणे आणि क्रिकेट खेळणे आहे.

# गॅरी कर्स्टन यांची नामिबियाच्या पुरुष राष्ट्रीय संघाचे सल्लागार म्हणून नियुक्ती

नवी दिल्ली, ता.७–

**भारताला २०११ मध्ये एकदिवसीय विश्वचषक जिंकून देणारे प्रशिक्षक गॅरी कर्स्टन यांची नामिबियाच्या पुरुष राष्ट्रीय संघाचे सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कर्स्टन पुढील वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषकाची तयारी करण्यासाठी मुख्य प्रशिक्षक क्रेग विल्यम्स यांच्यासोबत काम करतील.**



कर्स्टन यांनी क्रिकेट नामिबियाच्या निवेदनात म्हटले आहे की, क्रिकेट नामिबियासोबत काम करणे खरोखरच एक भाग्य आहे. त्यांचे नवीन अत्याधुनिक क्रिकेट स्टेडियम हे त्यांच्या राष्ट्रीय संघांना जगातील सर्वोत्तम क्रिकेट खेळणाऱ्या राष्ट्रांशी स्पर्धा करण्याची खात्री करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. नामिबियाचा वरिष्ठ पुरुष राष्ट्रीय संघ चांगली कामगिरी करत आहे आणि पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या तयारीत योगदान देण्यास मी उत्सुक आहे.

दक्षिण आफ्रिकेचे माजी सलामीवीर कर्स्टन यांनी २००४ मध्ये निवृत्त झाल्यानंतर कोचिंग करण्यास सुरुवात केली आणि २००७ मध्ये त्यांना भारताचे मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यांच्या कार्यकाळात भारताने २०११ चा एकदिवसीय विश्वचषक जिंकला. नंतर त्यांनी दक्षिण आफ्रिकेचे मुख्य प्रशिक्षक म्हणून आणि जगभरातील अनेक टी फ्रँचायझी लीगमध्ये संघांसोबत काम केले. २०२४ मध्ये त्यांनी पाकिस्तान पुरुष संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणूनही काम केले. २०२४ च्या टी विश्वचषकापूर्वी कर्स्टन पाकिस्तान संघाचे मुख्य प्रशिक्षक बनले.

# स्प्लिट कोचिंगच्या मागणीवर प्रशिक्षक गौतम गंभीर संतापले

विशाखापट्टणम,ता.७–

**सोशल मीडियावर सध्या सुरू असलेल्या स्प्लिट कोचिंगच्या चर्चेवर भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेत ०-२ असा पराभव झाल्यानंतर, काही क्रिकेट तज्ञ आणि आयपीएल संघाच्या मालकाने कसोटी आणि वन-डे, टी-२० संघांसाठी वेगळे प्रशिक्षक असण्याचा सल्ला दिला. गंभीरने उत्तर देताना म्हटले की, अशी विधाने आश्चर्यकारक आहेत आणि प्रत्येकाने त्यांच्या मर्यादेत राहावे.**

भारताने दक्षिण आफ्रिकेला २-१ ने पराभूत करत एकदिवसीय मालिका जिंकल्यानंतर, गंभीर पत्रकार परिषदेत म्हणाला, ''पाहा, (कसोटी मालिकेत) निकाल आपल्या मनासारखे नसल्याबद्दल बरीच चर्चा झाली होती. पण सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे कोणत्याही माध्यमाने किंवा पत्रकाराने एकदाही लिहिले नाही की, आमचा पहिला कसोटी सामना (कोलकातामध्ये) कर्णधार (शुभमन गिल) शिवाय खेळला गेला, ज्याने दोन्ही डावात (मानेला दुखापतीमुळे) फलंदाजी केली नाही.

गंभीरने आयपीएल फ्रँचायझी दिल्ली कॅपिटल्सचे मालक पार्थ जिंदाल यांनाही अप्रत्यक्षपणे लक्ष्य केले. ते म्हणाले की, अनेक लोकांनी अशा टिप्पण्या केल्या ज्यांचा क्रिकेटशी काहीही संबंध नाही. गंभीर पुढे म्हणाले, ''आयपीएल संघाच्या मालकानेही स्प्लिट कोचिंगबद्दल लिहिले. हे खरोखर आश्चर्यकारक आहे. लोकांनी त्यांच्या मर्यादित राहणे महत्वाचे आहे. जर आपण कोणाच्याही भूमिकेत हस्तक्षेप करत नसू तर त्यांनी आपल्यावर भाष्य करू नये.



भारताच्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या घरच्या कसोटी मालिकेतील पराभवानंतर, पार्थ जिंदाल यांनी व्हाईट-बॉल आणि रेड-बॉल फॉरमॅटसाठी स्वतंत्र प्रशिक्षकांची मागणी केली. त्यांनी एक्स वर लिहिले, घरच्या मैदानावर इतका भयानक पराभव... मला विश्वास बसत नाही! मी आमच्या कसोटी संघाला यापूर्वी कधीही इतके कमकुवत पाहिले नव्हते. जेव्हा रेड-बॉल स्पेशालिस्ट खेळाडू निवडले जात नाहीत तेव्हा असेच घडते. हा संघ कसोटी क्रिकेटमध्ये आपल्याकडे असलेली खोली आणि ताकद प्रतिबिंबित करत नाही. बीसीसीआयने कसोटी क्रिकेटसाठी एक विशेषज्ञ रेड-बॉल प्रशिक्षक नियुक्त करण्याची वेळ आली आहे.

गंभीरने कसोटी संघात सुरू असलेल्या संक्रमणाचा काळ आणि गिलची अनुपस्थिती ही संघाच्या पराभवाची प्रमुख कारणे असल्याचे सांगितले. ते म्हणाले, मी सबबी करत नाही. पण सत्य सांगणे महत्वाचे आहे. जेव्हा तुम्ही संक्रमण काळात असता आणि तुमचा कर्णधार, जो तुमचा मुख्य फलंदाज देखील असतो, तो उपलब्ध नसतो, तेव्हा निकालांवर परिणाम होणे स्वाभाविक असते. पण कोणीही त्याबद्दल बोलले नाही.

# सुरुची सिंगला सुवर्णपदक; मनु भाकर पदक मिळविण्यापासून वंचित

नवी दिल्ली, ता.७–

**प्रतिभावान नेमबाज सुरुची सिंगने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकत साऱ्यांचेच लक्ष वेधून घेतले. तर तिची सहकारी संयमने रौप्यपदक जिंकले. ज्यामुळे हंगाम संपणाऱ्या आयएसएसएफ विश्वचषक अंतिम फेरीच्या पहिल्या दिवशी भारताला चांगली सुरुवात मिळाली. पण दोन वेळा ऑलिंपिक पदक विजेती मनु भाकर निराश झाली आणि पदक मिळविण्यापासून वंचित राहिली.**

१० मीटर रायफल नेमबाजांच्या निराशाजनक कामगिरीनंतर सुरुचीने अंतिम फेरीत २४५.१ च्या शानदार गुणांसह सुवर्णपदक पटकावले. तर माजी ज्युनियर विश्वविजेत्या संयमने २४३.३ गुणांसह देशासाठी रौप्यपदक मिळवले. मनु भाकर अंतिम फेरीत पोहोचली पण १७९.२ गुणांसह पाचव्या स्थानावर राहिली. या वर्षाच्या सुरुवातीला सलग चार विश्वचषक सुवर्णपदके जिंकल्यानंतर, सुरुची सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये जगात अव्वल स्थानावर होती. ती उत्कृष्ट फॉर्ममध्ये होती. पात्रता फेरीत १२ नेमबाजांच्या एलिट गटात एकूण ५८६ गुणांसह दुसरे स्थान पटकावले.

मनू भाकर (५७८) सहाव्या स्थानावर राहिली, तर २०२३ ची ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियन संयम (५७३) पात्रता फेरीत आठव्या स्थानावर राहिल्यानंतर केवळ अंतिम फेरीत पोहोचू शकली. पण २१ वर्षीय नेमबाजपटूने संयम अंतिम फेरीत पूर्णपणे वेगळी दिसत होती. तिने बहुतेक अंतिम फेरीत आघाडी घेतली. पण एलिमिनेशन फेरीत चार वेळा ९.५ गुण मिळवून सुरुचीकडून अव्वल स्थान गमावले.

पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल स्पर्धेत माजी भारतीय वर्ल्ड चॅम्पियन रुद्राक्ष पाटील आणि पॅरिस ऑलिंपिकफायनललिस्ट अर्जुन बाबुता अनुक्रमे चौथ्या आणि सहावे स्थानावर राहिले. महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्पर्धेत एलावेनिल वलारिवन देखील अपयशी ठरली. पात्रता फेरीत ती नवव्या स्थानावर राहिली आणि आठ नेमबाजांच्या फायनलसाठी पात्र ठरू शकली नाही.